म. ग्रं सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २७६१

आठवणींचे पक्षी

— प्र. ई. सोनकांबळे

REFBK-0022711

- 6 DEC 1987

संदर्भ विभाग
22077

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

30 JAN 1980
11 OCT 1980
24 DEC 1980
18 JAN 1981
25 JAN 1981
15 FEB 1981
22 APR 1981
26 APR 1981
10 MAY 1981
23 SEP 1981
26 SEP 1983
4 MAR 1984
5 AUG 1984
18 OCT 1984

(क्र. मा. प.)





REFBK-0022711

आठवणींचे पक्षी

प्र. ई. सोनकांबळे

● प्रकाशक :

सौ. कुमुदिनी प्र. सोनकांबळे
चेतना प्रकाशन,
२५४ 'अनुभूती' नंदनवन कॉलनी
औरंगाबाद ४३१००१

● प्रथमावृती : २७ जानेवारी १९७९
३ रे दलित साहित्य संमेलन, औरंगाबाद

● सर्व हक्क प्रकाशकाधिन

● **किंमत १० रु.**

● मुद्रक :

ज. रा. बर्दापूरकर
व्यवस्थापक, जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
औरंगाबाद

ज्या चळवळीने आम्हा साऱ्यांना
ईथपर्यंत आणले व आमच्या
अनुभूतीला अभिव्यक्ती प्राप्त
करून दिली, त्या चळवळीचे
महान प्रणेते प. पू. डॉ. बाबासाहेब
आंबेडकर यांना विनम्र अभिवादन.

प्र. ई. सोनकांबळे

अनुक्रमणिका

क्रमांक	लेखाचे नाव	पृष्ठ क्रमांक
	मनोगत	
	प्रस्तावना	
१	बिन हिश्याचा हक्क	१
२	तूबी माणूस हैस	६
३	बिदवा	१३
४	परक्षा	१६
५	जातील हेवी दिवस	२२
६	दोन प्राणी उंट आणि मी	३१
७	कुपाटी	३७
८	शिकार	४५
९	चेलमा	४९
१०	आठवणींचे पक्षी	५२
११	अजूनही आठवतात आकडे २५, २६ मिळून ५१	५९
१२	हुरडा	६४
१३	आठवण छावणीची	६७
१४	उंटावरचा प्रवास	७०
१५	कथा आणि व्यथा	७६

मनोगत

लिहावं असं वाटून लिहीत राहिलो

तसं मी जास्त काही लिहलं नाही परंतु मला तसा नाद बऱ्याच दिवसाचा. आणि अेखाद्या गोष्टीचा नाद असला म्हणजे माणूस त्याचा सारखा ध्यास धरतो व त्यातूनच त्याला आवाज ऐकू येतो. तो त्या दिशेने जातो व त्या धडपडीतूनच त्याला अंधुक धुंदुक का होईना पण वाट गवसते तसंच झालं माझं.

जीवन म्हटल की अनेक गोष्टी आल्याच व माणसाला पदोपदी जवळपास अडचणीच्याच गोष्टीची गांठ पडतासल्यामुळे तो सदोदित अडचणीतून वर येण्याचा व सुखासमाधानाचा विचार करून तो त्या गोष्टी गाठण्याचा कसोसीने प्रयत्न करतो. अर्थात काहींना सुखसमाधान बिनाप्रयासे मिळतासते असे लोक म्हणतात व मानतात व ते थोडयाफार प्रमाणात खरेही असेल परंतु ज्याला सुखसमाधान मिळते त्याने प्रयत्न केले नसले तरी त्यासाठी कोणी ना कोणी प्रयत्न मात्र निच्छीतच केलेले असतात अशी माझी धारणा आहे.

जीवन हा शब्द जिवाशी अत्यंत निकडीचा आहे. जिथं जीवन तिथं जीव आलाच नि जिथं जीव तिथं जीवन आलंच जीवन म्हंटले की जिवाचे वन मग ते कुणाला सुंदर तर कुणाला खडतर दिसते. अर्थात वन म्हणजे आतिशय सुंदर असं हिरवगार वन–अरण्य जिथं की सारच हिरव पण तिथच हिरवं पिवळं आजना उद्या होतच व हिरव्या बरोबरही पिवळ वास करितासत.

जीवन या शब्दाचा अर्थ जगण्याशी व जिवंत जगण्याशी लई करून निगडीत असतो नि त्यासाठी माणसाला जीव जिवाणुला सारखी धडपट नि जिवाचे रान करावे लागते व त्या रानातून वाट शोधताना अनेक दगडधोंडे, काटेकुटे लागणार व मोडणार व त्या लागण्यातून व मोडण्यातून वेगळा आवाज ऐकू येतो. नि तो आवाज निच्छीतच कांहीतरी नवीन देऊन जाणारा असतो. 'जी' हा शब्द आदरार्थी वापरला जातो परंतु त्यालाच आज 'होजी'चे स्वरूप प्राप्त झाल्याचे

लोक म्हणतात. परंतु त्याचे कांही असो बनातून–बनातून जातापताना वर्डस्वर्थ किंवा टेनिसन सारख्या माणसांना आवाज ऐकू येतो.

जीवन म्हणजे पाणी व पाणी म्हणजे दलदल, ओलावा नि ओलावा तिथं मोहमाया व मायाजाळ व तिथून 'जवळ' हा शब्द आकार घेतो. कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट निपजू शकत नाही, वाढू शकत नाही व त्यासाठी जशी पाण्याची गरज, तशीच काळीभोर नसली तरी खडकाळ रुताड असलेली का होईना जमीन लागणाच व त्याचवरोबर हवा व भरपूर सूर्यप्रकाश ही हवा नसती ते रोप कसे येणार, कसे फोफावणार.

या अशा आशयातूनच जग पुढं आलं व त्याची इथपर्यंत वाटचाल झाली नि झाली ती पुढे जाण्यासाठीच नव्हे त्याला पुढे जावे लागते नि तो कसा काय मागे रहाणार. एकदा पुढे आल्यावर पुढच पाऊल पुढेचं पडणार. अशीच जडण-घडण होते साऱ्या जगाची.

भारत भूमी लई सुपीक. जिथं सगळच पीक चांगलं उगवतं व येतं म्हणूनच एखादा कवी म्हणून जातो की 'लई सुपीक आमची भूमी पीक पाहून लाजाल तुम्ही' हे कडवं जितकं सोप दिसतं तितकं ते अवघड. कारण आपण समजूनच घेत नाहीना. नि जे समजत नाही ते आवघड नक्कीच असतं. मी पहिल्यांदाच म्हटलं आहे की मी लई लिहिलं नाही पण नाद मात्र जरूर होता. कसं का होईना मोडकं तोडकं लिहिण्याचा बऱ्याच दिवसापासून. जगाच्या नकाशावर आपली भारत भूमी मोठी 'सुजलाम सुफलाम' संस्कृतीचे माहेरघर असलेली व एका आगळ्या वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी नि तिथं अनेक गोष्टीला वाव. वाव मात्र काही गोष्टीला नाही. ईथं देव, धर्म, जाती, रूढी, परंपरा, उच्चनीच, भेदभाव, वेदपुराण, गरीब श्रीमंत या गोष्टीला भरपूर खत पाणी मिळालेलं असतं व त्या गोष्टी खूप वाढलेल्या दिसतात. साऱ्यांनी त्याची पूजा अर्चा केल्यामुळे.

जग आज वेगळ्या स्पीडने पुढे जाताहे तर आपली स्पीड किवहुना त्याहीपेक्षा अफाट आहे असे दिसते, विचाराने मागे जाण्याची. आज स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या शब्दाचा सारखा स्टेजवर उच्चार करून जुनाट विचारां-कडेच आपण सारे जातासताना दिसतो नि याची मला राहून राहून जाणीव होते.

भारतातील अनिष्ट रूढी मोडून तोडून टाकून देण्याच्या प्रक्रियेत अनेक समाजसुधारकांनी भाग घेतला. भारतभर अनेकांनी भाग घेतला पण महा--

राष्ट्रात ज्यांनी भाग घेतला त्यात मला दिसतात. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील. यांपैकी सगळ्यांचे कार्य मोठे उठावदार व मोठे भरीव आहे नि महात्मा फुल्यांच्या कार्याला तर तोडच नाही. नि म्हणून तर दीनदलितांचे उद्धारकर्ते, त्यांची प्रेरणा, स्फूर्ती, त्यांची अस्मिता व त्यांचे सर्वच काही असणारे व मायबाप असलेले व हिंदु मनावर घनाघाती घाव घालून आपला बुलंद आवाज उठविणारे आमचे भाग्यविधाते प. पू. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना गुरू मानतात. गुरू मानले ते फक्त तीन लोकांना, महात्मा कबीर, महात्मा फुले व महात्मा गौतम बुद्ध यांना त्यांच्या विचार व आचाराबद्दल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाच्या माणसांनी अमाणुसकी विरुद्ध एक खूप मोठी चळवळ उभी केली. आवाज उठवला–आवाज चढवला. माणसाशी अमाणुसकीने वागतासलेल्यांचा आवाज उतरविण्यासाठी.

बाबासाहेबांना अभिप्रेत होते सहजीवन. नुसतेच सहभोजन नाही. सगळी माणसं माणसासारखी वागावीत असं त्यांना मनोमन वाटत होतं पण ते शक्य नव्हतं. कारण समाजात गरीब-श्रीमंत नि श्रीमंत गरिबात खूप खोलवर दरी एकमेकांना खाली वर, कमीजास्त लेखण्याची व पाहाण्याची हजारो वर्षांपासून निर्माण झालेली होती नि ही दरी चळवळ अगदी जिद्दीने व नेटाने पुढे नेल्याशिवाय बुजणार नाही व त्या चळवळीला निश्चित असे काही रूप-स्वरूप प्राप्त करून द्यावयाचे असेल तर समाजातील खालच्या थराला शिक्षण देणे, त्यांना शिकविणे जेणेकरून तळाच्या गाळाला तू लई सूपीक आहेस नि तुझ्या डोक्याच्या खडतर कवटीतून अतिशय खडतर अनुभव असल्यामुळे प्रखंड नि चांगले सत्य विचार येणार आहेत याची जाणीव करून देणे जेणेकरून शिक्षण घेऊन पुढे जाऊन मानाच्या, मान्याच्या जागा पटकावून आपली व समाजोन्नति करतील असे वाटून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्यापूर्वी म्हणजे १९४५ ला सगळ्या जगाशी दळणवळण चालते, विचार–विनिमय होतो त्या भारतातील एकमेव अशा कॉस्मापॉलिटियन व महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबापुरीत पी. ई. सोसायटी या शिक्षणसंस्थेची स्थापना केली व महाराष्ट्राचा एक अविभाज्य घटक असलेल्या मागास–मराठवाड्याचे केंद्र ठिकाण असलेले औरंगाबादी १९५० ला भारताचे पहिले राष्ट्रपती माननीय डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या शुभहस्ते पाया भरून मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. मिलिंद हे केवळ शिक्षणाचेच केंद्र बनावे, असे त्यांना अभिप्रेत नव्हते ते एक सांस्कृतिक, सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनावे व तिथले गुरु-शिष्यगण नागसेन मिलिंदसारखे

'इंटेलेक्चुअल ऑनेस्टी' असलेले निघावे अगे बाबासाहेबांना मनातून सारखे वाटे.

तेव्हा औरंगाबादला पदवीपर्यंतचे एकमेव कॉलेज म्हणजे मिलिंद महाविद्यालय म्हणून तिथं सारेसारेच यायला लागले. शिक्षणाला जणुकाय भेदभाव विसरण्याचे ते एकमेव ठिकाण ठरले व म्हणून अजूनही अशी प्रचीती येते की पूर्वी मिलिंदातून बाहेर पडलेले एकमेकांना मोठ्या आपुलकीने व जिव्हाळ्याने भेटताना दिसतात. अर्थात काहीजन बाहेरचं वारं लागल्यामुळे विसरतात ही गोष्ट निराळी.

असं होता होता मिलिंद नावारूपाला आले व गाजू लागले सारीकडे. मग कित्येक शतकानुशतके मुके असलेल्यांना वाचा फोडण्याचे व व्यक्त होण्याची दुर्लभ संधी प्राप्त करून त्या धुरंधर मुकनायकांनी दिली तिची जाणिव ठेवून आपल्या मुलामुलींना खूपस काही व्यक्त करायचं आहे व त्यांना सफोकेशनमधून बाहेर आणायचे आहे असे वाटून ध्यानी मनी पटून इंग्लंड अमेरिका उच्च विद्याभूषित असे तेजस्वी व कुशल व साहित्यप्रेमी म्हणजेच जीवनप्रेमी असलेले व अमेरिकेतील वास्तव्यात निग्रोंचा अभ्यास करून भारावून गेलेले त्यावेळेसचे धुरंधर प्राचार्य व जीवनभर मी एक अभ्यासक-विद्यार्थी म्हणणारे आदरणीय गुरुवर्य डॉ. म. ना. वानखडे सर यांनी आपल्या कल्पनेतून व्यक्त होण्यासाठी एक व्यासपीठ लागते कारण आपणास हे कार्य एक मोठी चळवळ रेटायचे म्हणून मिलिंद साहित्य सभा नंतर परिषद सुरू केली व तिच्याद्वारे एखादे मुखपत्र असावे कारण कॉलेज मॅगझीन तेवढे पुरत नाही असे वाटून आपली अस्मिता उंचावण्यासाठी अस्मिता नावाचे त्रैमासिक सहकाऱ्यांच्या साहाय्याने सुरू केले मग त्याचे काही टेकनिकल अडचणीमुळे अस्मितादर्श करावे लागले नि तिथूनच दलित साहित्याची चळवळ खऱ्या अर्थाने पुढे आली. आज तिचे लोण संपूर्ण भारतभर व भारताबाहेरही पोहचले आहे.

काही मंडळी कॉलेज मॅगझीनमधून थोडं बहुत लिहीत होती. त्यात मीही काही लिहलं. काही छापलं गेलं काही नाही. अर्थात मी पूर्वीपासूनच कॉलेज टाईप लिहीत नव्हतो. लिहीत होतो ते तोडकं मोडकं जीवनवादी व वास्तववादी. १९६४ साली कॉलेज मॅगझीनमधून आलेला 'वाटाड्या' माझा छापलेला पहिला लेख.

आता अस्मितादर्श त्रैमासिक निघाल्याचा गाजावाजा झाला. सारे मिलिंदातले व मिलिंदाबाहेरचेही आनंदून गेले की आपली अनुभूती अभिव्यक्त

करण्याचे साधन हत्यार मिळाले म्हणून. मीही लाजराबुजरा असलो तरी त्या पैकीच एक.

त्याचं असं झालं एकदा बोलावलं मोठ्या सरांनी म्हणजे आदरणीय गुरुवर्य प्राचार्य डॉ. म. ना. वानखडे सरांनी. त्यांच्याकडे जरासं भीतभीतच कचरतच कचेरीत जाण्यास निघालो. मधेच आडवल तिथं असलेल्या शिपायांनी व म्हटलं सायबांना भेटायचं तर लाईनीत उबा रहा. मला त्याला सायबानं बोलवलंय मला बोलण्याला असं म्हणू वाटू लालं पण मी थोडंच व्हतो आजच्या सारखा सायबानी न बोलवताच बोलवलंय म्हणून सांगणारा. तसाच लायनीत थांबलो. लाईन पुढची संपली. आला मजा नंबर तर तो गोरा गुमटा नाकेला व मोठा रूबाबदार व विद्वान आपला माणूस आपुलकीन बोलवतोय म्हणून आदरून आनंद व आदरयुक्त भीती वाटाय लागली. त्यांनी एवढा का उशीर म्हणताच मी म्हणालो लई लाईन व्हती. चपराशानं येऊच दिलं नाही म्हणून वेळ झाला. त्यांनी चपराशाला एक दोन शब्द सुनावले व म्हणाले की अरे ते कॉमर्स कॉलेजात प्राध्यापक आहेत. त्यांना कशाला लाईनीत थांबवलास. तर तो चपराशी म्हणाला सायब हा मुलगा आपल्या कॉलेजचा हैं. 'प्रोफेसर' सायब हैत हे मला माहिती नाही. तो म्हातारा माणूस. कस कळणार त्याला मज्यात बदल झालाय म्हणून. मला त्या म्हाताऱ्या माणसाला सायबानी सुनवावं असं मुळीच वाटलं नाही. मला म्हाताऱ्याची भीड तुटेना म्हणून लायनीत उभा राहिलो.

वेळ होती संध्याकाळची. जवळपास सहासातची. आंधार थोडा बहुत पडत होता. झाली सुरुवात बोलण्याला. मोठ्या सरांच्या ऑफिसात होते साहित्यप्रेमी व मार्मिक लिखाण करणारे आजचे मराठीचे थोर लेखक व समीक्षक आदरणीय गुरुवर्य प्रा. रा. ग. जाधव व माणसांनी माणसाशी जवळीकच्या भावनेने वागावे ह्या विचाराने भारावून गेलेले अेक विचारवंत माणूस गुरुवर्य प्रा. ल. बा. रायमाने सर.

सरांनी लावले वाचायला माझ्या वहितले. मी भीत व्हतो. लाजतबुजत व्हतो. तरी सर म्हणाले की आहो वाचाना जे लिहलं ते म्हणतच अरे बाबा वाचना रे म्हणाले. त्यांची एक वेगळीच ढब होती. मुलांना ते अरे म्हणत अर्थात आम्हाला खूप जवळ म्हणजे आपल्या वडीलधाऱ्या मोठ्या माणसांजवळ गेल्याचा एक वेगळा नि आगळा आनंद व्हायचा. वाचतासतांना काही ऑफिसातले कर्मचारी काही कामानिमित्त आलेले मोठे जागच्याजागी थरथरत व्हते. असा होता दरारा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा न बोलताही लोक घाबरत त्यांना.

मी माझ्या लिखानात माझ्या जीवनात आलेल्या अनेक खडतर व भयानक अनुभवाचं नागडं उघडं चित्रण माझ्या बोली भाषेत केल्याचे पाहून मोठे सर व बाजूचे दोन्हीही सर भारावून गेले व म्हणाले तुम्ही सारखं लिहीत चला. न लाजता. तुम्हाला खूप सांगायचंय. तुमच्या पोटात खूप साचलय. ते बाहेर येऊ द्या. म्हणजे मोकळ कॅथारसिस झाल्यासारखं वाटेल तुम्हाला. असे म्हणून मोठ्या सरांनी छोट्या सरांना बजावून सांगितले की ह्याचे लिखाण घेत चला आत्तापासून 'अस्मिता' ला म्हणून.

मला सरांयनी माझं लिहिलेलं वाचून दाखवायला सांगितलं व नंतर ऐकून झाल्यावर खूप चांगले असेच लिहा म्हटल्यामुळे व 'अस्मिता' मध्ये छापतो म्हणाले म्हणून खूप आनंद झाला. पण हेही वाटू लालं की लिहा म्हटले की लिहावेच का, कोणी काय म्हणेल कारण मी सत्य उघडकीस आणत होतो म्हणून. तरी लिहू लागलो.

'अस्मिता' - अस्मितादर्श मधून लिहिल्यावर खूप रेसपॉन्स मिळाला. माझे 'आठवणीचे पक्षी' खूप गाजले. अनेकांची पत्रे आली. कोणाची प्रशंशापर तर कोणाची हे काय मागचे उकरून काढतुयास म्हणून. कोणी भेटी अंती चांगले बोलायचे तर कोणी अर हे काय चाललय तुझ, बंधडक लिव्हलाईस आपलं मागच म्हणायचे. जरा नाराज व्हायचो पण आणखी लिहावं वाटून लिहीत राहिलो.

मान्यवरांनी माझ्याबद्दल अनेक ठिकाणी खूप चांगले लिहिले आहे. एवढेच काय काय हो पुस्तक खपून गेले का, आता एकही प्रत नाही. मी म्हणायचो पुस्तक बाहेरच आले नाही तर लोक म्हणायचे आले असेल कारण 'आठवणींचे पक्षी' चा गदगदा खूप झालता.

माझे लिखान अस्मितादर्शमधून, मराठवाडा दिवाळी-अंकातून, अभिव्यक्तीतून, अनुभूती, आम्ही, प्रबोधन, समाज, सिंहगर्जना, निकाय नि आयुध मधून आले त्या त्या संपादकांचा व वाचकांनी आपली अभिरुची दाखवली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

मी विचार करायला लागलो. प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र प्रेरणेने व गुरुवर्य डॉ म ना. वानखडे यांच्या प्रोत्साहनाने हे लिखाण करताना गुरुवर्य प्रा रा. ग. जाधव, प्रा. ल. बा. रायमाने यांनी खूप मोलाचे मार्गदर्शन केले. गुरुवर्य डॉ. श्री. म. पिंगेसरांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. ते तर म्हणायचे फार छान. त्याचे एक पुस्तक काढा. चांगले होईल.

माझ्या लिखाणाबद्दल अनेकांनी खूप चांगले लिहिले व चांगले उद्‌गार काढले. त्यात डॉ. म. ना. वानखडे, शंकरराव खरात, बाबूराव बागूल, प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. रा. भि. जोशी, अनंतराव भालेराव, नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. रावसाहेब कसबे, अर्जुन डांगळे, प्रा. म. भि. चिटणीस, श्री. घनश्याम तळवटकर, श्री. सी. एम्. वाघ, श्री. प्र. श्री. नेरूरकर, विजय तेंडुलकर, प्रा. डॉ. भाऊ लोखंडे, लोककवी कर्डक दादा, वि. दे. गायकवाड, प्राचार्य जोगिंदर पॉल आणि सौ. कृष्णा पॉल.

काही कारणामुळे असंच माझं तसं लिहिणं बंद झालं. पण अधून मधून मित्र मंडळी म्हणायची एकदाच पुस्तक येवू द्या बाहेर म्हणून राहून राहून आता ऐतिहासिक औरंगाबाद येथे भरणाऱ्या साहित्य संमेलनात 'आठवणींचे पक्षी' प्रकाशित करावे ठरवून घाईगडबडीत आमचे मित्र प्रा. दिलीप बडे यांनी अप्रतिम असे मुखपृष्ठासाठी खूप बोलके चित्र काढून दिले. नव्हे तर ऑफसेट प्रिंटिंगची संपूर्ण जबाबदारी त्यांनी सांभाळली त्याबद्दल शब्द ओठात येतात व पुटपुटतात वारे बडे तुम ऐसेही बडे हो जाव. हे केवळ प्रेमापोटी. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. कामाच्या घाईतसुद्धा कोंडी फोडणारे सुप्रसिद्ध लेखक व विचारवंत व समाज सेवक आदरणीय बाबूराव बागूल यांनी 'आठवणींचे पक्षी' ला प्रस्तावना देऊन मला उपकृत केले त्याबद्दल मी त्यांचे ऋणनिर्देश करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात रहातो.

'आठवणींचे पक्षी' चे काम, दलितसाहित्य संमेलनाचे काम असल्यामुळे वेळी अवेळी जागून मुलंबाळं सांभाळून मला सतत आधार देणारी माझी सुविद्य पत्नी सौ. कुमुदिनी सोनकांबळेनी प्रुफे तपासण्यात फार मोठी मदत केली हेही नमूद करावेसे वाटते. या प्रकाशनाच्या कामात अत्यंत आपुलकीने बोलून वेळ कमी असतानाही अत्यंत सुबक छपाई व्हावी म्हणून जयहिंद प्रेसचे ज. रा. बर्दापूरकर, रामकृष्णराव जोशी यांनी स्वत: व्यक्तिशः लक्ष घातले. घाबरू नका पुस्तक होईल म्हणून खूप दिलासा दिला. त्याबद्दल मी त्यांचा, चित्रकार औरादकर व तेथील कर्तव्यनिष्ठ कर्मचारी यांचा आभारी आहे. शेवटी 'आठवणींचे पक्षी' दलित साहित्य संमेलनात प्रकाशित होत आहे याचा मला खरा आनंद. आज आदरणीय गुरूवर्य डॉ. म. ना. वानखडेसर असते तर आनंद अधिक झाला असता पण .....

नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात माणसानी माणसांनाच छळलं, जाळलं, तोडलं, मारलं, उध्वस्त केल, राखरांगोळी केली त्याच्या जीवनाची नि हे पाहून, ऐकून संवेदनशील माणसाला भलं मोठं न बुजगारं दुःख झालं. आणि दुःख करणारे कळून आले. पण विचार येतो की आपण माणसाशी माणसासारख कधी वागायचं ?

प्राचार्य रे. पं. नाथ, प्राचार्य श्री. कृ. मोहगावकर, प्राचार्य म. आ. शिंदे, प्रा. त्र्यंबक महाजन व डॉ. शं. पि. गायकवाड, प्राचार्य जे. एम्. वाघमारे, प्राचार्य राजाराम राठोड, मोहमदभाई, डॉ. पुं. ह. गेडाम, प्रा. एस्. एम्. सूर्यवंशी, किशनराव गायकवाड यांची या कामी मोलाची मदत झाली त्यांच्या सहानुभुतीबद्दल अत्यंत आभारी.

या कामात माझे मित्र प्रा. मनोहर जिल्ठे, प्रा. अविनाश डोळस, प्रा. इंद्रजीत आल्टे, वामन निंबाळकर, प्रा. सुखराम हिवराळे, प्रा. भाऊ लोखंडे, प्रा. वापूराव जगताप, प्रा. सु. वा. राजभोज, प्रा. शं. रा. हणमंते, प्रा एस्. टी प्रधान, प्रा. बी. जी. रोकडे, प्रा. एस्. आर. वनसोडे, प्रा. वि. ना. कुंटूरकर, प्रा. डी. डी. चापोलीकर, प्रा. मनोहर गरुड, प्रा. साहेबराव गायकवाड, प्रा. सुरेश पुरी, प्रा. मोतीराज राठोड, प्रा. कमलाकर गंगावणे, प्रा. एम. जी. पुंडगे, प्रा. मदन मोरे, जी. जे. गायकवाड आदींची खूप मदत झाली व मार्गदर्शनही मिळाले त्याबद्दल मी या साऱ्यांचा आभारी आहे.

'आठवणींचे पक्षी' यात मी जीवनात आलेले लहानपणचे अत्यंत भयानक व खडतर असे अनुभव नागडे उघडे चितारले आहेत. त्यात हातचे काही राखून ठेवलेले नाही. वाचकांनीच ते ठरवावे.

प्रस्तावना

(१)

प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' हे पुस्तक दलित साहित्य संमेलनात प्रकाशित होत आहे ही फार महत्त्वाची आणि आनंदाची घटना आहे. कारण दलित साहित्याचे महत्त्व वाढविणारे हे पुस्तक ठरणार आहे.

हे पुस्तक मागेच प्रकाशित व्हायला हवे होते. म्हणजे दलित साहित्य चळवळीचे नेते, मार्गदर्शक डॉ. म. ना. वानखडे हे पुस्तक पाहू शकले असते. आणि पुस्तकाचे महत्त्व विशद करणारी प्रस्तावनाही लिहू शकले असते.

प्र. ई. सोनकांबळे त्यांचे विद्यार्थी. प्र. ई. वर त्यांचा लोभ होता. त्यांचे लेखन गुण, त्यांनी अनुभवलेले जीवन पाहून त्यांनी प्र. ई. ना लिहायला उत्सुक केले. त्याचे लेखन प्रकाशित व्हावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. ते पुस्तकरूपाने वाचकाच्या हाती पडावे म्हणून त्यांनी यत्न केले. आणि पुस्तक प्रकाशित होत असताना ते आमच्यात नाहीत याचे दुःख होते.

हे पुस्तक मागेच प्रकाशित व्हायला पाहिजे होते. याचे आणखी एक कारण होते. ते म्हणजे हे पुस्तक मराठवाड्याच्या दलित जीवनाचे वास्तव चित्रण आहे. मराठवाड्यातील दलित जीवन कसे आहे, दलित माणूस कसा आहे, मराठवाड्यातील सामंतशाही समाजव्यवस्थेने किती भयंकर दैन्य, दैस्य निर्माण केलेले आहे हे लोकांना दिसले असते आणि मराठवाड्याचा औद्योगिक विकास व्हावा हे अनेकांना पटले असते. महारवाड्याच्या औद्योगिक उद्धारासाठी काही प्रचारक ह्या पुस्तकाने तयार केले असते.

हे पुस्तक हे कार्य आताही करीलच पण नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात जी एकतर्फी दंगल उसळली, प्रचंड आर्थिक, भावनिक, सांस्कृतिक हानी करून गेली अन् त्यानंतर त्या दंगलीचे समर्थन करण्यासाठी दलितांवर जे आरोप करण्यात आले ते कळून येते.

आणि शाहीर अण्णाभाऊ साठे येथील सामंती वृत्तीतून येणारा मुजोर अन्याय, अत्याचार प्रकट करतात. इतरही लेखक ह्या अन्याय अत्याचारावर भर

प्राचार्य रे. पं. नाथ, प्राचार्य श्री. कृ. मोहगावकर, प्राचार्य म. आ. शिंदे, प्रा. त्र्यंबक महाजन व डॉ. शं. पि. गायकवाड, प्राचार्य जे. एम्. वाघमारे, प्राचार्य राजाराम राठोड, मोहमदभाई, डॉ. पुं. ह. गेडाम, प्रा. एस्. एम्. सूर्यवंशी, किशनराव गायकवाड यांची या कामी मोलाची मदत झाली त्यांच्या सहानुभुतीबद्दल अत्यंत आभारी.

या कामात माझे मित्र प्रा. मनोहर जिल्ठे, प्रा. अविनाश डोळस, प्रा. इंद्रजीत आल्टे, वामन निंबाळकर, प्रा. सुखराम हिवराळे, प्रा. भाऊ लोखंडे, प्रा. वापूराव जगताप, प्रा. सु. वा. राजभोज, प्रा. शं. रा. हणमंते, प्रा एस्. टी प्रधान, प्रा. बी. जी. रोकडे, प्रा. एस्. आर. वनसोडे, प्रा. वि. ना. कुंटूरकर, प्रा. डी. डी. चापोलीकर, प्रा. मनोहर गरुड, प्रा. साहेबराव गायकवाड, प्रा. सुरेश पुरी, प्रा. मोतीराज राठोड, प्रा. कमलाकर गंगावणे, प्रा. एम. जी. पुंडगे, प्रा. मदन मोरे, जी. जे. गायकवाड आदींची खूप मदत झाली व मार्गदर्शनही मिळाले त्याबद्दल मी या सान्यांचा आभारी आहे.

'आठवणींचे पक्षी' यात मी जीवनात आलेले लहानपणचे अत्यंत भयानक व खडतर असे अनुभव नागडे उघडे चितारले आहेत. त्यात हातचे काही राखून ठेवलेले नाही. वाचकांनीच ते ठरवावे.

O O

प्रस्तावना

(१)

प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' हे पुस्तक दलित साहित्य संमेलनात प्रकाशित होत आहे ही फार महत्त्वाची आणि आनंदाची घटना आहे. कारण दलित साहित्याचे महत्त्व वाढविणारे हे पुस्तक ठरणार आहे.

हे पुस्तक मागेच प्रकाशित व्हायला हवे होते. म्हणजे दलित साहित्य चळवळीचे नेते, मार्गदर्शक डॉ. म. ना. वानखडे हे पुस्तक पाहू शकले असते. आणि पुस्तकाचे महत्त्व विशद करणारी प्रस्तावनाही लिहू शकले असते.

प्र. ई. सोनकांबळे त्यांचे विद्यार्थी. प्र. ई. वर त्यांचा लोभ होता. त्यांचे लेखन गुण, त्यांनी अनुभवलेले जीवन पाहून त्यांनी प्र. ई. ना लिहायला उत्सुक केले. त्याचे लेखन प्रकाशित व्हावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. ते पुस्तकरूपाने वाचकाच्या हाती पडावे म्हणून त्यांनी यत्न केले. आणि पुस्तक प्रकाशित होत असताना ते आमच्यात नाहीत याचे दुःख होते.

हे पुस्तक मागेच प्रकाशित व्हायला पाहिजे होते. याचे आणखी एक कारण होते. ते म्हणजे हे पुस्तक मराठवाड्याच्या दलित जीवनाचे वास्तव चित्रण आहे. मराठवाड्यातील दलित जीवन कसे आहे, दलित माणूस कसा आहे, मराठवाड्यातील सामंतशाही समाजव्यवस्थेने किती भयंकर दैन्य, दैस्य निर्माण केलेले आहे हे लोकांना दिसले असते आणि मराठवाड्याचा औद्योगिक विकास व्हावा हे अनेकांना पटले असते. महारवाड्याच्या औद्योगिक उद्धारासाठी काही प्रचारक ह्या पुस्तकाने तयार केले असते.

हे पुस्तक हे कार्य आताही करीलच पण नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात जी एकतर्फी दंगल उसळली, प्रचंड आर्थिक, भावनिक, सांस्कृतिक हानी करून गेली अन् त्यानंतर त्या दंगलीचे समर्थन करण्यासाठी दलितांवर जे आरोप करण्यात आले ते कळून येते.

आणि शाहीर अण्णाभाऊ साठे येथील सामंती वृत्तीतून येणारा मुजोर अन्याय, अत्याचार प्रकट करतात. इतरही लेखक ह्या अन्याय अत्याचारावर भर

देतात. पण प्र. ई. सोनकांबळे प्रथमच तेथील दलित जीवन जनतेपुढे मांडीत आहेत. मराठवाडा कसा आहे ?

(२)

पोलीस कारवाई करीपर्यंत मराठवाडा निझामाच्या एकतंत्री राजवटीखाली होता. महाराष्ट्रात आणि भारतात नव्या ज्ञान-विज्ञानाचा, उद्योग धंद्याचा विकास होऊ लागल्यामुळे लोकहितवादी, म. फुले, डॉ. आंबेडकर, म. गांधी, नेहरू आदी डाव्या चळवळी लोकांची मानसिकता वाढवीत होते. पण मराठवाड्यात निझामी राजवट असल्यामुळे ह्या चळवळी, हे नवे विचार स्पर्श करू शकले नव्हते.

भांडवलशाही नवे वर्गसंबंध निर्माण करते. जुने त्या आरोपाचे निराकरण हे पुस्तक करणार आहे. दलितांची बाजू हे पुस्तक मांडणार आहे. सांगणार आहे. दंगलीला कारण नामांतर नाही, दलित नाही तर मराठवाड्यातील सामंतशाही समाजरचना, अर्थरचना आहे व तिने घडविलेली मानसिकता आहे.

प्र. ई. सोनकांबळे, अण्णाभाऊ साठे आणि मराठीतील इतर काही लेखकांनी मराठवाड्यातील सामाजिक, सांस्कृतिक जीवन आपल्या ललित कृतीतून व्यक्त केले आहे. हे जीवन कसे आहे ?

प्र. ई. सोनकांबळे यांनी दलित जीवनाचे दैन्य, दास्य आणि दुःख व्यक्त केले आहे. विषमता किती भयंकर स्वरूपात तिथे वावरत आहे अन् दलित जीवन भुकेच्या आगीतच कसे होरपळत आहे. म्हणजे दलित समाजाचे आर्थिक जीवन गुहा मानवाच्या जवळपासचे आहे. हे प्र. ई. चे पुस्तक वाचताना वर्णसंबंध, जाती संबंध ती खिळखिळे करते. ह्या भांडवलशाहीचे क्रान्तीकारी पाऊल मराठवाड्यात निझामाने शिरूच दिले नव्हते. त्यामुळे मोठे उद्योग नाही, मोठे दळणवळण नाही, त्यामुळे जुने जसेच्या तसे टिकून राहिलेले– विषमता. अस्पृश्यता.

मराठवाड्याला संतांची जन्मभूमी म्हणतात. जन्मले असतील संत मराठवाड्यात अन् त्यांच्या जन्मल्यामुळे कदाचित साहित्याचा फायदा झालाही असेल. गाणी भजन लोकांना गायला मिळाली असतील. पुजाऱ्यांना काही अधिक देवळे बांधून मिळाली असतील. एखादा देव ह्या संतानी अधिक लोकप्रिय केला असेल. वाङ्मयात आणून चिरंजीव केला असेल.

संत एवढेच कार्य करतात. ते वर्णव्यवस्था मोडीत नाहीत. ते जातिभेद मोडीत नाहीत. ते शोषितांची बाजू घेऊन शोषकांना वठणीवर आणीत

बिन हिश्याचा हक्क

तसं म्हंजे मुरदाड मी खात नव्हतो. कदीमदी हलाल मिळालं तर खात व्हतो. कारण मज्या मायीनं मला लहानपणीच पंढरीला न्हेलं व्हतं. मला काही तेवढ ठळक आठवत नाही. कारण मी व्हतो कडंखांद्याचाच. बाप मेल्यालं मला कळत पण नाही पण माईचा चेहरा वळकुन व्हतो.

आणलं बहीणीन मला तिच्या गावाला. माय मेल्यावर बर का. तसाच राहु लालो बहीणीच्या ईथ कसा बसा. मी परदिसा झाल्यालं बघून लोकांना जरा वंगळ वाटलं. मी घरी रहाण्यापेक्षा शाळतच दुसऱ्याबर जावून बसू लालो. पाटी ना पेन्सिल, ना घड कपडे व्हते मज्या अंगात.

अस व्हता व्हता थोडे दिवस गेल्यावर लागली बहीण बोलायला. कारण ईतके दिवस बोलली असती तर मला लई वाईट वाटलं असतं म्हणून तिने मला वंगळे शद्व बोलले नसतील असं मला वाटतं. गरीबाचे दिवस म्हंजे सदा सारखेच. कदी त्यांच्या घरी हरीपी येयाची नाही. गरीबी त्याच्या पांचवीलाच पुजलेली. आक्काच्या घरची गरीबी व त्यातच तिला दोनचार लेकरंबाळ. तिचा नवरा पण लई आळशी. कामच करायचा नाही. बहीण हमेशा मीनमीन लावायची पण त्याला बिचाऱ्याला घम नसायचा. बिचारी अक्का मातर कदी शेण काढायची तर बिदवा भरायची, तर कधी माती कामाला तर कदी दसकटा पळाटयाला जायाची. काय तरी करून पोराबाळाचं पोट भरत व्हती. मीही तसाच बहोणीसारखा हुन्नेरी बनलो. काई काई रानातून आणून बामणाच्या, पाटलाच्या वाड्यात देयाचो व ते जे देतील ते शिळे पाळे घेवून येऊन लेकराबराबरं मुचूमुचू खाऊन गळगळा जास्त पाणी पिवून पोट भरून घेयाचो.

तसं म्हंजे मी तेवढा मोठा नव्हतो म्हणून बहीणीचा सबाव बघुनच कदी कदी घरी रहायचो. तर मोकळं कदी बहीणीनं मला सोडल्याचे आठवत नाही. जरी काय काम नसले तर आदुन मदुन गावांत वंटरू फिंटरू मरायचेच व ते

वघूनज बहीण येयाची व मला घरी रहाण्यास मोकळीक देयाची पण त्या वगाराकडं जावं त्याचे पायफीय कापतासताना लोकांना मदत कर असं बजावून सांगायची बहीण. व असं ही म्हणायची की सागुतीचा वाटा आणल्यावर चांगलं कापून फिपून ठिव नसता जमलं तर मीठ मिरचू लावून चुलीवर ठिव म्हणायची. मी मनातल्या मनात म्हणायचो की काय ही ब्याद आली बाबा व वाटायचं जरा चांगलीबी कारण रानात जावून काम करण्यापेक्षा सागोती आणनं लई सोपं वाटायचं. पण सोप कसच मोटं अवघड आसायचं ते काम कारण जो तो म्हणायचा हा वाटा माझा तो वाटा माझा व म्हणायचे हा कोण दुदगा आलायरं पर नवीनच दिसतोय,

कोणी सांगायच की अरं हा त्या महाराच्या सुकुबाईचा भाऊ है. कोणी म्हणायचे अर जावू द्या परदिसं है विचारं. मला सगळ ऐकून कसं तरी बेकार वाटायचं. पण हे सगळं करावं लागत व्हतं मला नाईलाज म्हणून नाही करावं तर बहीनीचा सपाटा कदी चालू होईल हे मालूम नाही पडायचे. मांगाचे काही पोरं म्हणायेच अर तु शाळा शिकतुयाचकीर. मग कसा आलास मासासाठी. मी काहीच बोलयचो नाही. कदी कदी मोट जनावर मरायचं तर ते लोक खास करून सटवा मामा (लई घान रहायाचे सटवा मामाच्या ईतले पण आता घातलीया पंढरीची माळ त्यानं काही सांगू लागला की लोक म्हणतात, खावून खावून आंतडे रंगले मग काय बोलतूसर शहाणपणानं) ते म्हणायचे अर हा पाय धर तो पाय धर. मला पाय आवरायाच नाही सटक दिशा निसटायचा हातातून पाय व कातडयातलं रगत लोकांच्या अंगावर उडायच. मी जरा जपूनच रहायाचो कारण कपडयावर जर रगत पडलं तर शाळेतले लोक बोलतील वाटायचे पण अिकडं आक्का न आणलं तर बोलतिया वाटायचं. पण पाय न धरला तर लोक बोलतील वाटून मन नसताना धरावच लागायच. काही पोरं तर तितच मास लपून ठिवायचे व घराला फरार व्हायचे व कधी कधी माणसायनी कापायला सुरू केलं की पोरं मासाच्या टुकडयावरून भांडून घ्यायचे व तुला न मला घाल कुत्र्याला करून सोडायचे. आजू-बाजुला कदीकदी कुत्रे असायचे. ते लचकुन घेऊन पळायचे. अस व्हयाचं कदी कदी मासासाठी कोणी बाचावाचो करायचे तर कोणी मारामारी करायचे. जे त्यात हे माहाराला लयी व मांगाला कमी हमेशा वाद राहायचा. मांग लयी करून आतडे गोतडं व वजडीच जास्त कसली ही गचाळ घेऊन जायाचे व वांबाळ वांबाळ उबाळून खायचे, तवा ढोरंबी लई मरायचे व ते खावून माणसंही खूप मरायचे. कोणी सांगितलं तर ऐकायचे नाहीत कारण कोणता पुराडी काय देतोय, म्हणायचे लोक आर्दाकोर रोटी व लई डल्या खावून पोट भरायचं

पडलया आम्हाला अस सर्वजनच म्हणायचे एवढच का पण कुद बुद्धी कुणाचं जनावर घराला खेटल बिटल तर बाया म्हणायच्या आग हाल्या, अग वुई जाईचना गेलीया कोणांची हाईस. तुझा पायल्या टोना मज्या चुलीत गदगद शिजवीन, आण कदी शिजल कापून बाटे घालीन ग, असंच सगळ महारामांगाचं जीवन असायचं. मला आक्का बकळ म्हणायची आर खार जरा घे पोट भरून पण मी हातबर दुरच राहायाचो. दिलेली आर्दी चतकोर रोटी व कांदा फिंदा खावून टाकायचो, एक तर मज्या साठी खास काई करायची नाही आक्का एक तर नसायचं काही व दुसरं तर असं नाही केलं, तर कंटाळून आज ना उद्या मी करीन सुरू खायला वाटायच तिला. पण मी खाल्लोच नाही, कदीकदी मन जायच कारण किती दिवस उपासतापास काढांव वाटायच तस म्हंजे मी जरी खात नसलो तरी अशान तशा सुरूपात खायायचो म्हणाना थोड-क्यात कारण आक्काचे हात कितीही घिवलेले असले व रगटचानं पुसले तरी कुठं तरी नकावर तेलकट चोपडच रहायचं तिच्या हातची रोटी खावूनी वाटायचं. पण नाईलाज मला कसा तरी हिकच बसायचा त्याचा शिजाताना वास घेवून मी हमेशा रोटी नसली की चिचोके भाजून कडमकडम खायचो. तर कदी कदी भिजवून खायाचो. असं चालायच माझं नि माझ्या आक्काच्या घरच. ती जरी शिवीगाळ देयाची पण कदी कदी जवळबी करायाची. विचारीला खूप वाईट वाटायचं. अेक तर सागोती खावून पोट भरून घेत नाही म्हणून व दुसरं तर काही करून देयाला नाही. म्हणून ती खूप म्हणायची, आर बापु, चिचोक्यान पोट भरत नाही खार. आज जरा लईहै म्हणून सुके खांड केल्यात. आक्काला तस चाण्या करून ठेवायेची होती लई हौस. लोटकचटक वाळवून भरून ठिवा-यची व कसार विसार आली की तोंड वंगळ पडतय म्हणून भाजून खायाची. लोकबी कदी कदी मागायचे पण आक्का तशी देयायचीच नाही कदी तर मुस्कीलीन देयाची ते बी जरा जवळच्या माणसाला सगळचांना वाटायच की सूकी जरा लावून ठिवतीया, लई हुनेरी हैसकी काही काही वडीलधाऱ्या बाया म्हणायच्या.

हे सगळ वघून जगळपूरचा मामा लई सकू सकू करायचा कारण तो व्हता पोतराज व त्याला हवस लई मासाची पण तो दाजीच्या धाकामुळे भियाचा. जरा त्याच्या डोळचा देखत खायला. कारण त्याचा लेक म्हणजे मजा दाजी व्हता भजन्या व वारकरी पंथातला. जरा काई खावं वाटलं की चेऱ्याच्या सकूची आठवण येतीया असं पोतराजमामा म्हणायचा.

असं झालं हे सगळ मुरदाडाचं. आता वळतो जरा हलालाकडे. मुरदाड म्हंजे मेलेल्या ढोराची सागोती व हलाल म्हजे कापलेल्याची पण बकऱ्याची

फिकऱ्याची तर सागोती मिळतच नव्हती. मिळाली तरी फक्त हल्याची म्हणून तिला हलाल म्हणतात की काय असं वाटतय. सणवार झाला की कर येतासते व हरेक करीला खातवणी लोक, खास करून महारमांग, मुसलमान हल्या कापल्याशिवाय रहातच नव्हते. कारक हल्याशिवाय तेयला मजाच नाही वाटायची. हाल्या व शिंदी करीत हमखास ठरलेली व काही सुधरलं बिगडलं की पिवून खावून निशेत भाव्रावून जाऊन बायका पोरांवर चवताळून पडून झोडपून काढायचे. महारामांगाचा व्हता म्होरक्या हल्या कापणारा त्याच नांव हणमा गवंडी. गवंडी असल्यामुळे व्हती त्याची जरा पत. लोकांना त्याचा जरा भरवसा वाटायचा. म्हणन हल्या उदारीच देयाचे त्याला. पैसे मागुन जमा करून देयाचे मालकाला. मग काय पुसता हणमा मांगाची गत. तो जरा सबावान गरीबच व्हता पण जो तो त्याचेकडे आजकालच्यासारख वशीलाच लावायचा. तो नाही म्हंटल तरी परतच येयाचा. मज त्याचं चांगलं जमायचं कारण त्याचा लेक सांगायचा त्याला की म्या चांगला हुशार हौ म्हणूनशीन. गणू पण शाळेतच येत व्हता. तस मजी बहीण हणमा मा-ाला सांगायचीच. जरा चांगलं वंगळं बघून द्या म्हणून. तो म्हणायचा की सकु त्याचा काई घोरच करू नको. मी वंगळ कसं देईन लेकराला. येडीच हाईस सकू तू. बहीन म्हणायची जरा लेकराजवळ लाकोशीबी दे. जरा लेकराजवळ तांब्या देतेय म्हणायची.

हमेशा हल्या कापायचे ते कोष्टचाच्या शिवला. एक तर चेऱ्याची व सोरग्याची शिव असायची तिथं दुसरं तर बारकुसा व्हळ तिथं व्हायचा व आतडचातल चारट फिरट धिवायला सोपं जायाच. चुकवून घारोडचासारखे पोरसुर पडायचे त्या हल्यावर कापतासताना पाय धरायाची काही गरज नसता-नाही पोरं उगच धराय बगायचे व वशीलेबाजी तिथबी चालू रहाचीच. कुणाला धरू देयाचे तर कुणाला धुडकावून लावायचे मोठे माणस बर का. मी जरा भियाचोच तसं करायला. कारण एक तर कोष्टचाच शेत घेतलं व्हतं बामणाच्या बाबू मास्तरानं विकत व तो व्हता विण् मास्तराचा भाऊ. बामण लोकाला दिवस मावळला की फिरत येयाचो लई हावस. मला वाटायचे येतील बाबा मास्तरलोक. मग जवळ करतात तस करणार नाहीत वाटायच दुसरं कारण म्हंजे मी तस कुठल्याच धडपडीच्या गडबडीत पडायचो नाही, हमेशा मला वाटायच की मी परदीसा है. कोणी काई म्हणील मग मज्या बहीणीला वाईट वाटेल. उगीच गडबड कशाला वाटायच मला गणूकडे मातर वशीला लावावं लागायचा. चांगला वाटा मिळावं म्हणून जणूं काय तो हणामा डावळचाचा व तो ही शिकलेला पोरगा 'होलसोलच' व्हता त्या हल्याच्या सागोतीच्या हद्दी-पर्यंतचा. सगळे गणू गणू म्हणायचे त्याला. बापापेक्षा पोरगाच लई चडून

जायाचा पण मला मिळतय म्हणून मी त्याला चडून चालाईस न म्हणता लावूनच रहायाचो.

कापलं सवरलं की घालायचे वाटे पण वाटे घालण्याआगोदर चारट फिरट घिवायला मला बोलवायचे. व अेक घागऱ्या अर्जूना तर म्हणायचा अर ये काय भियालास. तू तुझ्या पोटाला खाशील आमच्या थोडंच खाशील. मला सागोतीचा चांगला वाटा गणूच देयाचा व लाकोशीपण दुसऱ्याच्या तांब्यातून जराजरा काढून देयाचा. हल्या कापल्याबरोबर जे रगत निघंत त्याच्या चिळ-चिळ चिळकांड्या सुटल्याबरोबर लोक तांबे लावून रगत गोळा करायचे पण मी भिकोरा तसाच बसायचो म्हणून गणूच कैवार घेयाचा माझा.

सांज झाल्यावर येयाचो घरी तरी घरी वहीण मिरचू फिरचू तळवून वाटच बघत बसलेली दिसायची. खांडून खुंडून आक्का जे चुलीवर ठिवायची ते कई केल्या जल्दी शिजायच नाही. कारण थोडच व्हतं ते मट्टन वजा आजच्या सारखं. थोडसं उकळलं की, आक्का मी मुरदाड खात नाही म्हणून-शनि थोडे खांड काढून देयाची खा म्हणून पण मी जरा ह्याला त्याला लाजायचो. आदोगर आपण कसं खावू म्हणून. कदी कदी तर तोडतासतांना तुटायच नाही व सटकदिशा निसटून खाली पडायचं खांड व डोळ्यात जायचं व मिरचू चूरचूर करायचं. असं व्हयाचं सागुतीच आणि माझं. डोळ्यांत उडलं तर बेहतर पण खावच वाटायच कारण यरवी तस हलाल मिळतच नाही म्हणून.

फिकऱ्याची तर सागोती मिळतच नव्हती. मिळाली तरी फक्त हल्याची म्हणून तिला हलाल म्हणतात की काय असं वाटतय. सणवार झाला की कर येतासते व हरेक करीला खातवणी लोक, खास करून महारमांग, मुसलमान हल्या कापल्याशिवाय रहातच नव्हते. कारक हल्याशिवाय तेयला मजाच नाही वाटायची. हाल्या व शिदी करीत हमखास ठरलेली व काही सुधरलं बिगडलं की पिवून खावून निशेत भाव्रावून जाऊन बायका पोरांवर चवताळून पडून झोडपून काढायचे. महारामांगाचा व्हता म्होरक्या हल्या कापणारा त्याच नांव हणमा गवंडी. गवडी असल्यामुळे व्हती त्याची जरा पत. लोकांना त्याचा जरा भरवसा वाटायचा. म्हणन हल्या उदारीच देयाचे त्याला. पैसे मागुन जमा करून देयाचे मालकाला. मग काय पुसता हणमा मांगाची गत. तो जरा सबावान गरीबच व्हता पण जो तो त्याचेकडे आजकालच्यासारख वशीलाच लावायचा. तो नाही म्हंटल तरी परतच येयाचा. मज त्याचं चांगलं जमायचं कारण त्याचा लेक सांगायचा त्याला की म्या चांगला हुशार हौ म्हणूनशीन. गणू पण शाळेतच येत व्हता. तस मजी बहीण हणमा मा..ाला सांगायचीच. जरा चांगलं वंगळं बघून द्या म्हणून. तो म्हणायचा की सकु त्याचा काई घोरच करू नको. मी वंगळ कसं देईन लेकराला. येडीच हाईस सकू तू. बहीन म्हणायची जरा लेकराजवळ लाकोशीबी दे. जरा लेकराजवळ तांब्या देतेय म्हणायची.

हमेशा हल्या कापायचे ते कोष्टचाच्या शिवला. एक तर चेऱ्याची व सोरग्याची शिव असायची तिथं दुसरं तर बारकुसा व्हळ तिथं व्हायचा व आतडचातल चारट फिरट धिवायला सोपं जायाच. चुकवून घारोडचासारखे पोरसुर पडायचे त्या हल्यावर कापतासताना पाय धरायाची काही गरज नसतानाही पोरं उगच धराय बगायचे व वशीलेबाजी तिथबी चालू रहाचीच. कुणाला धरू देयाचे तर कुणाला धुडकावून लावायचे मोठे माणस बर का. मी जरा भियाचोच तसं करायला. कारण एक तर कोष्टचाच शेत घेतलं व्हतं बामणाच्या बाबू मास्तरानं विकत व तो व्हता विण् मास्तराचा भाऊ. बामण लोकाला दिवस मावळला की फिरत येयाचो लई हावस. मला वाटायचे येतील बाबा मास्तरलोक. मग जवळ करतात तस करणार नाहीत वाटायच दुसरं कारण म्हंजे मी तस कुठल्याच धडपडीच्या गडबडीत पडायचो नाही, हमेशा मला वाटायच की मी परदीसा है. कोणी काई म्हणील मग मज्या बहीणीला वाईट वाटेल. उगीच गडबड कशाला वाटायच मला गणूकडे मातर वशीला लावावं लागायचा. चांगला वाटा मिळावं म्हणून जणूं काय तो हणामा डावळचाचा व तो ही शिकलेला पोरगा 'होलसोलच' व्हता त्या हल्याच्या सागोतीच्या हद्दीपर्यंतचा. सगळे गणू गणू म्हणायचे त्याला. बापापेक्षा पोरगाच लई चडून

जायाचा पण मला मिळतय म्हणून मी त्याला चडून चालाईस न म्हणता लावूनच रहायाचो.

कापलं सवरलं की घालायचे वाटे पण वाटे घालण्याआगोदर चारट फिरट घिवायला मला बोलवायचे. व अेक घागऱ्या अर्जुना तर म्हणायचा अर ये काय भियालास. तू तुझ्या पोटाला खाशील आमच्या थोडंच खाशील. मला सागोतीचा चांगला वाटा गणूच देयाचा व लाकोशीपण दुसऱ्याच्या तांब्यातून जराजरा काढून देयाचा. हल्या कापल्याबरोबर जे रगत निघंत त्याच्या चिळ-चिळ चिळकांडचा सुटल्यावरोबर लोक तांबे लावून रगत गोळा करायचे पण मी भिकोरा त्तसाच बसायचो म्हणून गणूच कैवार घेयाचा माझा.

सांज झाल्यावर येयाचो घरी तरी घरी वहीण मिरचू फिरचू तळवून वाटच वघत वसलेली दिसायची. खांडून खुंडून आक्का जे चुलीवर ठिवायची ते कई केल्या जल्दी शिजायच नाही. कारण थोडच व्हतं ते मट्टन वजा आजच्या सारखं. थोडसं उवळलं की, आक्का मी मुरदाड खात नाही म्हणून-शनि थोडे खांड काढून देयाची खा म्हणून पण मी जरा ह्याला त्याला लाजायचो. आदोगर आपण कसं खावू म्हणून. कदी कदी तर तोडतासतांना तुटायच नाही व सटकदिशा निसटून खाली पडायचं खांड व डोळ्यात जायचं व मिरचू चूरचूर करायचं. असं व्हयाचं सागुतीच आणि माझं. डोळ्यांत उडलं तर बेहतर पण खावंच वाटायच कारण यरवी तस हलाल मिळतच नाही म्हणून.

तुबी माणूस हैस

भीमराव बापू म्हणायचे, व्हते एक पाटील. तेयला व्हता एक मळा. मी तिथच पडून राहायाचो व जे काम सांगितलं ते करायचो. बामणाच शेण, बहीणीचं घरच काई काम, सगळं करून शाळा बी करायचो व त्या मळ्यात हमेशा राहायाचो. देवावरचं फुल चुकलं पण माझं त्या मळ्यात जाणं चुकायचं नाही. कारण तितले गडी एवढे चांगले व्हते की पुसता गत नव्हती. बाया मातर लई खराब. जेवण वाढा ह्याला परलु महाराजाला असं गडी सांगायचे पण त्या देयाच्याच नाहीत. दिल्या तरी थोडसं टाकायच्या. आंधारात कदी कदी दिसायच नाही. कदी पत्रावळीत तर कदी मातीवर खाली पडायच पण मी घेयाची व खाऊन घेयाचो नाईलाज म्हणून.

मळ्यात संत्रीमोसंबीचा बाग राखायचो, उसाभवती फेरी घालायचो. असं व्हता व्हता तेयची मज्यावर लई मर्जी बसली. ते मला विसरतच नव्हते. जरा दिसना गेलो की भीमराव बापू म्हणायचे कारं पोरहो आज परलू महाराज आला नाही कायरं ? बिचारं लई गुणवान हे पोर. शिवाजी उगच कार तू त्याला सतावतूस. अस करूनी बेटा. अस ते तेयच्या न्हनग्या लेकाला सांगायचे. तो ऐकायचा पण पुन्हा बिलींदरपणा करायचा. मला वाटायच की बाबा काई का व्हईना पण उरली सुरली भाकर देतंय शिवाजी महाराज गडचा मला. मग मी कशाला सांगू तेयच्या बापाला. असं वाटायचं मला. शिवाजी मला हमेशा राबवून घेयाचा. मळ्यातलं शेणतर काढायला लावायचाच. पण व्हळा जवळ दुपारी बसलेल्या जनावरचे पण शेण गोळा करून आण म्हणायचा. झाल शेणपाणी की मग जरा तोंड हिरमुसले करायचो व म्हणायची की मज्याकून काम करून घेतात. पण जरा भाकर मागाय गेलो तर चिडतो. शिवाजी बापू कसं करूं बाबा, कसं व्हईल मज. अस मनांतल्या मनांत कुडकुडत बसायचो. तर तेयला वाईट वाटून भाकर बिकर नसली की मग शिवाजी बापू जरा हुरडा भाजायचे व मला खारं परलू म्हणायचे .. मी इकडं तिकडं बघत गळागळा गिळून घेण्याचो व खमंग हुरडा खाल्यावर पाणी पिवं वाटायच म्हणून मी पाणी

पियाचो पण व्हयाच वेगळंच. पाणी पिलो की सगळ पोट दुखायचं. कारण मधले दाणे इतके फुगायचे की ते टचटच टोचल्यावाणी वाटायचं. असं हे सगळं माझ नि त्या मळचातल. मळचांत तेवढे संत्रे मोसंबी पण ईमानदारीनं सांगतो की कदी एक हातानं वंगळ मन करून तोडलो नाही की चांगल फळ खाली पडलं तर खाल्लोसुद्धा नाही. कदी कदी भीमराव बापू म्हणायचे. काय परलू महाराज आता तुझा भार है गडचा खात जारं बाबा पडलं सुडलं. काय व्हणार है पैसे लई कमवून. तुबी माणूस हैईस. पण मी तेयचं ऐकावं तर पोरं बोलतील वाटायचं म्हणून मी खायाचोच नाही. हमेशा ईकडं तिकडं फिरायचो. उसाच्या जवळच एक व्हतं पाण्याच डुबूक जिथ म्हसरड कुणाचेबी येऊन वसायचे तितच मी आंगोळ करायचो, तेबी हाताच्या वंजळीनच बर. सारी वंजळ भरून पाणी बी येत नव्हतं. नुसतं बेंदाडच असायचं म्हसाड गेल्यावर. मला जरा बरं वाटायच आंगोळ केल्यावर. पण दिवसमर आंग खाजायचं. घरी बहीण आंगोळ कर म्हणली तर करायचो नाही कारण कराव तर उगच लोक चिडवायचे की आता परल्याबी मजेत राहायला म्हणून. म्हणून मी हमेशा जिकडं गेलो तिकडंच रानात आंगोळ आटपायचो. अशी घाण पाण्याची आंगोळ व कुणबी दिलेली शिळी भाकर. बुरटा चढलेली–तार तुटलेली खायाचो व पावसात कुटबी आंगावर कपडे पांगरून नसताना जायाचो म्हणून नेहमी मला कवूळ, पांथरी नळ फुगणे असे रोग व्हायाचे.

आता झालं काय तर भीमराव बापूनं लावली व्हती हळद. तेयनी ती काढली व शिजवून वाळत घातली. त्याच्यानंतर काढला लसून व ठेवला कोठ्याजवळ. सारे घरला घेऊन गेले. मग ती जमीन नांगरली व बारीक सुरीक हळदीचे खोंब व लसणाच्या पाकोळ्या तशाच राहिल्या व्हत्या. तेयनी साँगितल की काय र जावू दे लईच लहान हैत त्या पाकोळ्या व खोंब हळदीचे. देईन मी तुला दुसरी थोडी हळद व लसून तुझ्या बहिणीसाठी. पंण मी बसलो नाही. रोज खोंब व पाकोळ्या ढोरं बघत बघतच गोळा करायचो व नयकलीचे दोन खिसे टच भरायचो व जरा कुडत्याच्या खिशात भरायचो कारण नयकल व कुडता वामण्याच्या लोकांनी जरा मोठ्या अंगाचा दिलेला राहायाचे. अस करून करून मी बहीणीच्या घरचे दोन मोठे डेरे भरलो. तेयनी आतां सारी माती नांगरून टाकलीया. तेयला काई परवा नाही. बहीणीला बरच वाटायच हे सगळं बघून, बहीणीन तिच्यातून निवडून निवडून काई हळद लोकांना विकून टाकली व्हती. मी म्हणायचो की मी खिशात भरून आणावं व तू विकावं हे बरं नाही गडचा–पण ती म्हणायची दुसर काई व्हईल बाबा.

एकदा लागला व्हता भीमराव बापूचा थळ. मग मी लईच हौशीत व्हतो. मी सारख बैलाच्या पाठीमागे चरक धरल्यावर फिरायचो लोक ऊस खायचे व म्हणायचे आर परलू खा की ऊस. मी ऐकायचोच नाही. पवरत येऊन बैलाच्या पाठीमागे फिरायचो. मला वाटायच की बाबा बापू मला फावून शाबासकी देतील. पण ते कदी फायाचे तर कदी फायाचेच नाहीत. माझं सारं ध्यान तेयच्याकडंच राहायाचं. जसं म्हणतात ना पाटलाचं घोड म्हाराला भुषाण. असेच मी तेयच्या पुढं पुढं करायचो मजे गुण तेयला आवडायचे.

मग येरी वेळेला कदी मिळायचं तर नाही पण सनावाराला ते मुद्दाम मज्याजवळ बसून जेवू घालायचे. मी जरा लाजायचोच. रोज चरक हाणून हनून थकायचो व गुंगी येयाची म्हणून दूर जावून झोपायचो. पण हिवबी वाजायचं व दूर निजावं तर मळ्यातच व्हतं एक पिंपळाचे झाड. त्याच्याखाली व्हता मर्सूबा व व तिथंच सतबा मामाच्या रामूदाजीला बाहीरल झालं म्हणून मोठी लठ शेळी कापली व्हती म्हणून मला जरा दूर निजण्याची भिती वाटायची.

एका दिवशी चरकाच्या जवळच झोपलो. झोपलो कशावर तर उमाच्या चिपाच्या ढिगाच्या कपारीत व ईकडून तिकडून पाचोळा लावलो. गरय गरम जे झोप आली ते काई उमज आलीच नाही तर झालं काय तर तेयचा व्हता एक लई मारका बैल. तो व्हता तांबडा बांडा. मला आता त्याचं नांव आठवत नाही. तो जे चरकाचा सुटला ते मुसमुसतच चिपाच्या ढिगाऱ्याकडं आला. मला वाटलं, उठावं तर मारतैय बैल, गडद्यानं उठावं तर तुडवून जाईल वाटलं. तर मी उठलोच नाही. त्याच्यावर तीन चारही बैल असे जोरात मज्यावून उदळत गेले की मला उठावं वाटून सुदा उठताच येईना झालं. जरी चिपाखाली मी दडून व्हतो तरी ते बैल इतके रागीट मुसमुसलेले मारके व्हते व जडबी व्हते. माझी पाट वात झाल्यासारखी झाली. सगळं आंग ठोकून काढल्यासारख दुखू लागलं. पण करणार काय मी बिचारा प्राणी व्होतो. सकाळी पाटलाला समजलं तेयला वाईट वाटलं. बिचारे हळहळ चूं चूं करू लागले.

एकदा काय झालं तर दिलो चैर सोडून आलो जगळपूरला. दाजीनं दुकान करून देयाचं ठरविलं. तेयनं बोलनं केलें की मी तेनच्या इथं दहा वरीस राहावं व तेयनी माझं लगीन करावं. मला वाटलं व्हईल खात्या बित्याची माहिती पण झालं ते दुसरंच. दुकान फिकान जमलंच नाही. फुकटच्याफाकट तेयनी राबवून घेण्याचं ठरविले व हमेशा माज्यावर कडक नजर ठिवू लागले म्हणून तिथं मला राहावं वाटना झालं. व लोक म्हणू लागले आरं ह्या पोराला किशननं

उगच ठेवलंय. दुकान का बिकान हे. ह्याच लगीन बी होत नाही. आन काय बी नाही. उगं ह्यान ह्याला फसवलं. इकडं हडोळतीला आले व्हते बदलून चेऱ्याचे विनायकराव गुरुजी. लोक तेसला विणू मास्तर म्हणायचे. तेयची मजी लई वळख नव्हती, पण जरा व्हती कारण तेयच्या ईतं व्हती मजी आत शेण काढीत. कदी कदी तिच्या वारचं मी शेण काडाया जायाचो. व सुटीत बिटीत आले की तेयची माय तेयला सांगायची. अर विणु हे पोरग लई गुणाच हाय. म्हाराच्या गंगाचा भाचा हाय. तेयच्या आईला हामी हरीमाय म्हणायचो. तीच तेवडी वळख.

विणू गुरुजीला मी शाळा सोडून जगळपूरला गेलोय म्हणून कळालं तर तेयनं जगळपूरच्या व चे-यावून जाणाऱ्या पोरायला सांगीतलं की आर त्या गंगाच्या भाच्याला आणा. म्हणून मला पोरोयपाशी कळवलं की विनायक गुरुजी तुझं सार करणार हायत म्हणून. तुला एक पैसा लागू देणार नाहीत. मला बरं वाटलं पण वाटू लागलं करतो म्हणल की जावंच का बाबा. आता करतील. व नंतर म्हणतील. मग कुटुन देवू बाबा असं वाटू लागलं तरी कस का व्हईना ठरवलो मनात जायाचं पण ईकड दाजीन दहा वरीष राहायाच बोलणं केलं व्हतं मग कसा जावु व गेलो तर बाईला मारील व हमेशा तुझा भाऊ मला फसवून खावून पिवून बुडवून गेला म्हणून टुमणं देईल. विनायक गुरुजीचं म्हणण व्हतं की मी चेऱ्यावून तिथल्या पोरायसंग येणं जानं करावं व जे फीस बिसला लागतील ते पैसे ते देतील, पण मला वाटू लागलं चेऱ्याला तरी कसा जावू. बहीण व अत्या म्हणतील जवा घर जळून गेलं तवा नोकरी तर केलीच नाही व आता काम लई लागलं म्हणून भिवून पळून गेला व व आता कसा येयालाय वाटू लागलं. तरी तसाच दोन्ही बहीणीच्या नवऱ्यांची व सासऱ्यांची लाज न धरता आलो एकदाचा चेऱ्याला. चारऱ्या सुमाराला जरा गावात व बामणाच्या गल्लीत फिरलो व कानोसा घेतला व लोक सुदा म्हणू लागले आरं परलाद जा कीरं ईणूमास्तर हडोळीतला आला म्हणून ते तुझी सोय करतो म्हणतात म्हणं. आर फुकटच्या फाकट व्हयालंय तर काय दुकायलं तुझं जा भाडचा.

ठरल जाण्याचं हडोळतीच्या शाळंत. काही लोक म्हणत व्हते की आर आता इकके दिवस झाले. उद्या परवाला दिवाळीची सुठी लागणार है आता काय फायदा हाय उगच नाफास व्हयल जावू नको. तेथला काय लागलंय ईणू मास्तरला असं म्हणू लाले. मला बी पटू लाल, पण ठरलं तसं गेलो. वार व्हता सनवार. फक्त सकाळीच शाळा. दुपारून शाळा बंद. मला वाटलं जमलं तर बरं नसता सोमवारी जावं वाटलं. मी आदीच जाताना चेऱ्याच्या ईतल्या गुरू-

माईच्या व मारूतीच्या व शिववरच्या पिराच्या पाया पडून, गालाला बोट लावून तोबा तोबा करून गेलतो. देव मला शरीक करतो वाटून देव जाणे काय कुणाला ठाऊक कसली ती महीमा झाली. मी शरीक झालो हजरीवर नाव तुझं टाकलय म्हणून विनायकराव गुरुजीनी सांगितलं. मला भरवसा वाटना गेला. तेयनी सांगितलं की आर जा प्रल्हाद पोराय संग, आजपासून बावीस दिवस दसऱ्यापासून ते दिवाळीपर्यंत सुटी हाय आणि म्हणाले जाण्याअगोदर भेट मला भिव वाटूलाल की काय म्हणतात की काय ? तेयचा व्हता एक दोस्त. तेयच व्हत नांव शेळके गुरुजी. व्हते ते कुमटचाचे. लई धिप्पाड मास्तर व्हते. ते मॅट्रिक पास पण लई रागीट व्हते. शिकवित इंग्रजी, पोर लई भियाचे मोठा मास्तर म्हणून. मला विनायक गुरुजीन बोलावल तेयच्या खोलीत. शाळातच बर का. शेळके गुरुजी व ते बसले व्हते. तेयनी शेलके गुरुजीला सांगितल, आर शेळके तू ह्या हमच्या गांवच्या पोराला शरीक करून घे. ते म्हणाले आर आता एवढा उशीर, आजपासून दिवाळीची सुटी लागणार. शेळके मास्तर ते जरी धिप्पाड व्हते व सगळे तेयला भित व्हते तरी ते शेळके गुरुजी, विनायक गुरुजी जरी सडपातळ व्हते तरी तेयला फार जरवायचे. कारण विनायकराव गुरुजी मराठी फारच सुंदर बोलायचे व व्हते लई चलाख व दुसरे कारण म्हणजे हेडमास्तर चेऱ्याच्या दत्तामास्तराचे मेव्हणेच व्हते. म्हणून शेळके गुरुजी विनायक गुरुजीला भीत व्हते. तेयनी मला विचारले कारं पोरा तुला अंग्रेजी बाराखडी येते का. तर मी म्हणालो नाही गुरुजी. ते म्हणाले मग कसं विनायकराव ? विनायक गुरुजी म्हणाले आर लेलो यार, ते कदी कदी दोस्तान्यात हिंदीतबी बोलत व्हते तेयनी सगळ केल.

मी आलो चेऱ्याला वापस. त्याच दिवसापासून बावीस दिवसाची सुटी लागली. पण कस का व्हईना एकदा वनवन फिरून हावस मिटली. पारण फिटल गडचा वाटलं. मनाच नसल तरी डोळचाच. पाचवीत गेलो म्हणून. मी पाचवीला बऱ्याच दिवसानंतर शरीक झालेला बघून बऱ्याचं लोकांना वरं वाटलं तर बऱ्याच लोकांना बुरं वाटलं. मला कोणीबी काई म्हटल तरी मी तसच गप्पच बसू लालो. दिवस जावू लाले. तीन चार दिवसान विनायकराव गुरूजी हडोळतीहून चेऱ्याला आले. मी आदोगरच चांगले लाल हिल्याल डोळे झक्क उघडलेले सीताफळ बघून ठिवलेच होते. मी येरी कुणालाबी देयाचो मग विनायकराव गुरुजीला कस देवू नये वाटूलाल. तेयला सिताफळ दिले पण लोक म्हणतील की लाळ घोटणा करू लाला म्हणून वाटूलाल. पण तसच मन घट्ट केलो. गुरूजी म्हणाले आरे कशाला आणलास. तुही खा, मी नगच म्हणालो. पण तेयनी एक खापा दिलीच. तेयन खावे असे मनात वाटायचं. ते खुष झाले व म्हणाले वा मज्या

शाबास बेटा, कुठून आणलास येवढे गोड सीताफळ. मी अै औ करू लागलो व म्हणालो रानांतून गुरूजी.

गेले बावीस दिवस. झाली शाळा सुरू. दुसऱ्या पोरायला शाळा जुनी वाटत व्हती पण मला सारं नवच नव वाटू लाल. कारण शरीक व्हते वेळेस शाळा फायलो व्हतो. तेव्हा सुटी म्हणून जरा पोर कमीच व्हते आले शाळला. पण आता लईच बुच बुच. पोरच पोर जिकड तिकड दिसू लालती. झालं शिकवणं सुरू. वर्गात पोर जिकड तिकड दिसू लालती. वर्गात येवू लाले मास्तर. एकावून एक चड. आज पर्यन्त चेऱ्यात दोन किंवा तीनच मास्तर फायलो व्हतो. आता इत तर लईच दिसू लाले व वाटू लाल किती मास्तर हायात गडचा ह्या शाळत लई भारी हाय ही शाळा नहीरं. पोरहो अस विचारू लालो. पोर जरा मला माहीत नव्हतं म्हणून लई फुगुन जावून बोलायचेच नाहीत व बोलले तरा जरा घुतकारतच. मग जरा जरा झाल्या वळकी पोरांच्या व मास्तरांच्या तेवी तोंडओळखी बरं. मला काही साऱ्या मास्तरांचे नाव आठवत नाहीत. पण गणिताला व्हते रामलिंगप्पा, म्हराठीला व्हते विनायकराव गुरूजी इंग्रजीला व्हते शेळके गुरूजी, ते व्हते– क्लास टिचर– मला इंग्रजी मुळीच येत नव्हती व गणित थोडं जमत नव्हत पण तीन चार महिने घरी राहून सारं विसरून गेलं व्हतं व अगोदरच चेऱ्याच्या शाळत पायाच कच्चा व्हता. खरं म्हणजे चवतीचा पुरा कोरस शिकवला नव्हता व मला तेवढं गणित जमायचबी नाही. जमायच तर कामापुरतं म्हणजे नाफास व्हत नव्हतो.

आली परीक्षा सामाई फक्त महिन्याला शाळा सुरू झाल्यावर सारे म्हणू लाले. आर हे काय पास व्हतय म्हारग सारे शिकवूलाले पण मज्या मनांत भिवच वाटायचं. कोण विचारील का म्हणून जरा दबूनच बसायचो. शेळके गुरुजी लई कडक व्हते. तेयनी मला विचारलं, वाचरे धडा काडून. तेयला माहित व्हत की मला काईच येत नाही म्हणून पण मुद्दामच विचारले. तवा सातवा धडा चालू व्हता. मी उभा राहिलो. ते म्हणाले उद्या साऱ्या बाराखडचा काढून आणलास तर बेहतर नसता बग. मी घाबरलो व दिवस मावळता चेऱ्यात आल्यावर भीमन्ना कारभाऱ्याच्या दिगंबराजवळ त्यानं नको म्हणतांना सुदा त्याला विचारून घेतलो, बाराखडी काडून घेण्यापेक्षा धडा घोकून पाट करून न्हेव वाटलं व म्हणून नुसता अक्षराचा पता नसताही Tara is a girl. तारा एक मुलगी आहे. Mohan is a boy. मोहन एक मुलगा आहे. Leela is a girl. लीला मुलगी आहे. Raju is a boy. राज एक मुलगा आहे. अस घोकून घोकून मुगपाठ केलो, व

उद्या शाळत गेलो पण पाच सहा दिवस शेळके गुरुजीने विचारलं नाही. मग एका दिवशी विचारल, कारे आणलासका बाराखडच्या काढून. तर मी म्हणालो बाराखडी नाही तर सातवा घडा पाठ णरून आलो. तेयनी वाचायला लावल. मी सार घोकल्यासारखं वाचू लालो. तेयला कळाल की मला बारखडच्या जमत नाहीत व मी पुस्तकांत वळी न बघता उग पुस्तक हातात घेऊन वाचतोय म्हणून परंतु तेयला नवल वाटल. व तेयनी विनायकराव गुरुजीला बी सांगितलं की पोरगा हुशार दिसतोय. म्हणून गुरूजी म्हणाले आरे शेळके तो मज्या गांवचा है कितीबी झालतर. सायन्स तेवढ जमना झालं पण गणित कांहीच येयना आली परिक्षा. दिली परिक्षा भितभितच तपासले पेपर्स. मला मिळाले १८७ मार्क्स सहा विषयाला १८० ला पास असतया. मला तर १८७ मार्क्स मिळाले. मी एकूण मार्कात पास झालो पण गणितात फक्त ५ मार्क्स भेटले व इंग्रजीत २९ व अधिक १ म्हणून ३० सगळचात पास फक्त गणितात नापास. आता पर्यंद गणित तेवढ जरी जमत नसल तरी नापास नव्हतो. म्हणून वाईट वाटू लाल. तरी तेवढच बर वाटलं टोटलात पास हाव म्हणून. जे चेऱ्याचे पोरं पावसाळचात पेरणीपासून शाळत जात व्हते ते कोणीच पास झाले नाहीत. फक्त भटाच्या प्रबाकरला सोडून सगळचांना नवल वाटलं. एक तर बिन अंग्रजी बाराखडीच घडा वाचण्याचा व दुसर म्हणजे एका महिन्यात १८७ का व्हईना मार्क्स घेऊन पास व्हण्याचं. वार्षिकलाबी पास झालो व रूळ सोडून गेलेली गाडी पुन्हा रूळावर आली. जर का मी हा दाजी काय तो दाजी काय म्हणील म्हणून थांबलो असतो तर मजी शाळा बिनपाण्याची तशीच वाळली असती का नाही बर तुम्हीच सांगा म्हणूनशीन मला वाटतं व व्हटात येतात शब्द म्हणतात " कुऱ्हाडीचा दांडा गोतास वैर.

कसं विसरूं विनायकरावा तुम्ही केल जग स्वैर मजसाठी."

बिदवा

गोष्ट सांगायची म्हंजे अशी की मी हमेशा शाळा नसली किंवा संपली की कुठना कुठं कामावर जात असे. अन कामावर जाण्याचा हेतू हाच असायचा की मज्या बहिणीवर जो मजा बोजा पडतोय तो थोडाफार कमी पडावा किंवा तिला निदान वाटावं की माझा भाऊ लगेच आयत खायला बसत नाही, काही तरी त्याच्या म्हनग्या जिवापरमान करतोय. मी जरा आक्काला भिऊनच रहायचा कारण आक्का लई प्रेमळ पण कधी कधी लईच खविस व वंगळपणे बोलायची व जे शिव्या किंवा जे शब्द आजच्या नवीन डिक्शनरीत सापडणार नाहीत ते खास ठेवणीचे सनाटून माझ्यासाठी वापरायची व ते ऐकून मला खूप अवघड वाटायच व कशाला ईच्या ईत पडलोय गड्या बिनदिकीच उगीचच वाटायच पण नाईलाज. व दुसरीकडं सतनागत म्हणून मी निश्चच चिटकून राहावयाचो. व पुन्हा कधी तिने असे खास ठेवणीचे शब्द वापरू नये म्हणून खूप मन लावून कुठना कुठं कामावर जावून काम करायचो. व दिलेला थोडा लई मुशारा आणायचो. मुशारा आणल्यानंतर कधी आपल्याला चांगल म्हणाव म्हणून अक्काला दाखवलं की, ती म्हणायची की अरं खायला लागतं नाही कारं दुदग्या. केलाच तर मला काय अशान है. पोटासाठी कुणालाबी काम करावच लागतय. ती सबावान जरा आरकटच है. अर्थात प्रेमळ पण तशीच. तिचे बोलणं ऐकून मला बाईट वाटायचं, कारण मला कळायचं नाही. परंतु मी जस जसा मोठा होवू लागलो तस तस मला कळायला लागलं की तिच्यावर दाजी व आत्याचा धाक है म्हणून. व म्हणून ती मला बोलतीया नसता कशाला बोलली असती बिचारी. कारण ती व मी एकाच कुसातले शेवटी. परंतु कुसातून बाहेर पडल्यावर ह्या साऱ्या गोष्टी, आणि त्या येणारच. कारण आपण सारे मानसं दोन घाटासारख्या पायावर उभे राहिलेल्या कणसासारखे.

असा हा प्रकार माझा नि माझ्या बहिणीचा व तिच्या घरच्यांचा, असं हे चालतांना सुद्धा मी शाळा कधी बुडविल्याचं मला आठवत नाही. मग कधी

शाळेत जावू नको म्हणून बहीण रागावली असेल किंवा कधी खूप रागावून रोटीबी दिली नसेल. कधी असून, तर कधी नसून तरी मी गावातली (तिच्या) व पर गावातली शाळा कधी बुडवलीय असं मला तरी आठवत नाही.

माजी बहीण खूप मरमर काम करायची. तसाच माझा पण सवाव बनला. तिच्या घरी राहण्यानं. म्हणून अनेक तऱ्हेच्या कामासारखं तिच्यावर साऱ्या गावातल्या रस्त्यावरची माती सावडून गोळा करून केरकचरा काढून व त्याला भल्या मोठ्या चाळणीने गाळून घेण्याच्या कुंभाराच्या कामावर जात असे. त्याला आमच्याकडे बिदवा गोळा करणं म्हणतात. अर्थात या बिदव्यात अनेक प्रकारची घाण असते. परंतु सर्व मातीमोल झाल्यामुळे ती घाण कधी पुसट दिसते तर कधी दिसतच नसते. कारण ती मातीशी एकजीव झालेली असते.

हे बिदवा गोळा करण्याचे काम करत असताना पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे हाताने किंवा खराट्याने हाय नाही ती माती रस्त्यावरची गोळा करायची व मोठे मोठे ढीग लावायची व मग ते करत असताना मातीच माती साऱ्या अंगावर उडतीया व लोकांच्या (येणाऱ्या जाणाऱ्या) अंगावर उडतीया व ते बोलतात म्हणून हाताने गोळा कायला लागायचो. परंतु मग हातात कचरा काडी किंवा चिपाडाची चुयटी शिरली म्हणजे अगदी जिबाळं लागल्यासारखं व्हायचं. सारखा जीव चूरचूर कायचा. पण शेवटी पोट व त्यासाठी हे करावच लागणार.

मी असं हे बिदव्याचे काम करतासतांना जे माझ्याबरोबर किंवा मज्या म्हागे पोरं होते ते हसायचे व चिडवायचे की हा परल्या पलू रस्यावरची घाण फुफ्फू गोळा करतोय. मला वाटायचं वाईट. पण असंही वाटायचं की हेही दिवस जातील म्हणून हिम्मत येयाची. कारण मी जे बिदव्याचे काम करत होतो ते फक्त माझ्या पोटासाठीच नव्हते. कारण माझे पोट तर होतेच पण त्या घाण अशा मातीच्या फुफाट्यातून अनेक अशी रंगाढंगाची लोटकी, चेटकी, मडकी व खापरं तयार व्हायची कुंभाराच्या सुंदर अशा गोल चाकातून म्हणजे पर्यायाने त्याच्या कला कुशल असलेल्या डोक्यातून व मला वाटायचे की, किती महान आहे ह्या कुंभाराचे काम. जो की रस्त्यावरील घाण फुफाट्याला हा एवढा चांगला आकार देतो व लोटके, चेटके, मडके व खापरं तयार करुन त्याला आगीतून तावून सुलाखून काढून प्रत्येकाला कसोटीला उतरवून मग अनेकांच्या म्हणजे मी मी म्हणणाऱ्याच्या किंवा सोवळं वोवळं करणाऱ्याच्या देव देवाऱ्यात किंवा त्यांच्यावरही म्हणजे त्यांच्या घरावर बसवुन गरीब श्रीमंतांना थंडी, वारा

आणि उन्हापासून संरक्षण करण्याचे काम करण्यासाठी तयार करतो. खरोखरच धन्य तो कुंभार तुळशीराम गोरा कुंभार. दिसायला गरीब गाय व वेडा परंतु पिवून खाऊन हमेशा वेडा बेभान होऊन काम करायचा.

काम मातीचे व माती कामाचो कारण शेवटी माणूसही मातीच व मातीच माणूस व माणसापेक्षा श्रेष्ट कारण मातीच जगवतेना साऱ्या प्राण्यांना. माणसांना आपले सारे कष्ट उपसून व स्वतः झिजून म्हणूनच ती काळीमाती व तिच्या धनावर पोसले जाणारे आम्ही सारे तिचेच धन आरंभापासून ते शेवटपर्यन्त.

बिदवा गोळा करण्याचा, केरकचरा दूर करण्याचा व भल्या मोठ्या चाळणीने चाळून अगदी बारीक सोजी सारखी फुफाटारूपी माती तयार करण्याची व डोक्यावर नेऊन कुंभार तुळशीरामदादा व त्याची बायको विचारी वेडपट गबळी जिजाबाईने सांगितल्यावर सर्व मातीचा आळा करून तिच्यात घाण सांडपाणी ओतून कालवाकालव खोऱ्याने करण्याचो. शेवटी पायाने तुडवायचो अगदी घोटून घोटून असा चिकन करण्याचो कुंभाराने मडके, खापरं चाकावर तयार केल्यावर त्याला उन्हात ठेवण्याचा, आव्यात घालण्यासाठी हाताने उचलून नेवून नीटशीर ठेवण्याचा व आवा भरला की त्याला लिपण्याचा व अगीत दोन चार दिवस भाजून झाल्यावर नंतर ते हळूच काढायचा व ते खनखन वाजत असतांना बाहेर छपरीत ठेवण्याचा व जे भट्टे असतील त्यांना त्यांच्या सांगण्यावरून बाजूला (बाळीत) ठेवण्याचा व गिऱ्हाईक आल्यावर चांगले वंगळे दाखवण्याचा व कधी गरज भासली तर ज्याच्या त्याच्या घरी नेऊन देण्याचा अधिकार व हक्क मात्र माझा नि आमचा व एकदा काय ते मडक, लोटकं, चेटकं किंवा खापर ज्यांच्या त्याच्या घरात किंवा घरावर बसले की मग सारा अधिकार त्यांचाच. मग त्याला म्हणजे घेणाऱ्याला तर नाही पण घेतलेल्यांनाही शिवायची कुणाची माय येली नाही.

असा हा प्रकार पाहून सारं काही पोटासाठी करण्याने मन कसे होत असेल ते दुसऱ्यानेच ठरवावे. अगदी मन खिन्न होते व काहीच सुचत नाही कारण एक तर हे पाहून व पोट आहे म्हणून परंतु ज्यांनी एवढे कष्ट घेतले त्याची काही कदर करायची नाही हे पाहून घेऊन माणसाची नव्हे तर चार पायाचे दोन हात व दोन पाय झालेल्या घाटासारख्या पानावर उभे राहिलेल्या कणसाची किंवा विचार करणाऱ्याला नक्कीच येणार किंव की काय वागतो हा माणूस शेवटी माणसाशीच म्हणून.

O O

परीक्षा

एकदा झालं काय. मी नेमीप्रमाणं गावात फेरी घातली व पाहिलं कोठे काय काम निघतंय गड्या. कोन मला काम सांगल याच्याकडंच माझं ध्यान असायचं. मला रस्त्यावरूनच एका म्हतारीनं पाहिलं. ती व्हती म्हराठ्याची. तिचं नाव गंगाबाई नि होता तिचा कान फुटका, नि थोडीशी गेंगानीही पण व्हती ती. तिच्या लेकाच नाव व्यंकटी पाटील. त्याची मजवर थोडी फार मर्जी व्हती. कारण मी म्हणायचो भारूड त्याला ते आवडायच. तो व्हता देवाचा वारू.

म्हातारीनं मला सांगितलं की, 'अरं आमच्या वतलात कुत्रं मरुन पडलंय. जरा काढून तर टाक रं. देईन तुला अर्दी चतकोर भाकर'. मला वाटलं, चला बर झालं काम मिळालं गड्या. मन काबून ठेवलो नि त्या कुत्र्याच्या शेपटाला धरलो, धरलो तसंच शेपटाचा शेवटचा भाग माझ्या हातातच आला. कारण तो होता सडका. मला वास येत व्हता पण लालूचही व्हती, चतकोर का व्हईना मिळण्याची. त्या म्हातारीनं म्हनलं, 'अरं ही घे दोरी नि बांध गच्च शेपटाला नि घेऊन जा ओढीत' तसा केलो पण त्याचे सालवे सालवे निघत व्हते व लोक मज्याकडे किळसवाण्या नजरेनं बघत व्हते. व म्हणत व्हते की, काय रं घान चालवलीय रस्त्यानं, नुसता वास थिजून सुटलाय. ने जल्दी सगळे लोक नाक धरूनच जात होते. मी सुद्धा नाकाला माझ्या फाटक्या तुटक्या कुडत्याचा पदर लावीत व्हतो पण बराच वास गिळावा लागला कारण थोडं गुदमरल्यासारखं झालं की नाक सोडायचो व हवा बमदिशा येयाची व तोंडात थुका गोळा व्हायचा. पण थुकावं तर लोक म्हणतील की, 'येवढा चीळ वाटतोय तुला मग करतुस कशाला हा धंदा' म्हणन तसाच थुंका पण मवल्यामधीच गिळायचो. दूर नेलो कुत्रा. वाटेत भेटला मांगाचा गणू. त्याला आम्ही गण्या म्हणायचो, तो व्हता साळतच. पण नुकतीच त्यानं सोडली व्हती व लागला

व्हता गवंडीपण शिकायला. तो म्हणाला, 'अरं जाऊ दे. आता आला फज्ज्या. मी त्या कुपाटीला टाकणार तर तितं व्हत्या पांदणीवर परसाकडच्या बाया. त्या म्हणाल्या,' 'जरा दूर टाक रं. नसता वाटावर जाता येता नुसता वास घान दरवळंल' मी थोडं पुढ गेलो व लवणाच्या कोपऱ्यात टाकलो तो कुत्रा.

आलो आता घरी वापस. वास तर जाईचना हातचा. म्हातारीनं हातावर पाणी घातलं पण वास यायचा तो यतच व्हचा. तशीच चूळ पण भरली तर तितक्यात तिची सून आली व म्हणाली, 'आता लई नवसाचा झालाईच रं' एवढं म्हणून ती घरातच गेली. पुन्हा नाही पाहिलं. मर्दीनीनं. मला आशा वाटत व्हती की घरात गेली बाई. आणील काई. पण झालं काय तर ते दुसरंच. म्हातारीनं मोप बोललं व्हतं. पण तिचा हातच चालना व जवानही व्हईना. देग म्हणून म्हणायची. मी तसाच उभं राहयलो. तर ती सून आली व म्हणाली, जा की रं आता. मी म्हातारीकडंच लक्ष देत व्हतो. मी थोडा थांबलो व म्हणालो, गंगामाईनं मला बोलणं केलंय की आर्दी चतकोर देतीय म्हणून. ती सून डोळे मोडीत कपाळा आटचागाटचा पाडीतच बुटबुटत गेली मध्ये व आणली एका चिवटी मदली अर्दी भाकर जी की आमच्या गरीबाच्या चतकोरी येवढी सुद्धा नसल. व तिच्यावर आवघे मौजकेच भेंडरं. मला म्हणाली बलूतं घेतात माझ्या मांग लेकाचे व भाकरही मागतात. निग जा, ती बाई गांवातल्यागांवात दिली व्हती बरं का.

झालं काय एकदा तर मी राहायाचो काम करीत दत्ता मास्तराच्या इतं. ते माझे गुरुजी सगीरचे बरं का. व्हता व्हता झालं काय. एक दिवस, बोलावलं त्यांनी सटवा मांगाला. म्हातारा तो माणूस. त्याला मी मामा म्हणत व्हतो. तो व्हता गवंडी. बांधायला लागला तो, व करायला लागलो मी चिकूल. पण पाणी वतल्यावर एकदम खोऱ्यानं तोडायचो. मला समजायचंच नाही, पाणी इकडून तिकडून जायाचं. बाया काही बोलायच्या चाल की रे पाणी म्हणून. व्हता व्हता झाला चिकूल मी थै थै चिकलांत नाचायचो. जणू गोरा कुंभार. गोऱ्या कुंभाराला नाचतासताना भानच राहिल नाही तसच त्यानं आपल्या रांगत्या मुलाचा रगडून चिकुल केला म्हणतात. तसा मी खोऱ्यानं तोडायचो व नाचायचो. मध्येच झाले काय? आली लक्ष्मीबाई. मी तिला मोठी बाई म्हणायचो. कारण व्हत्या तिच्या वरून लहान जावा. ती आली व लगेच्यालमे कडकडनं चिकुल लागली घेयाला. मी भानात नव्हतो. तिचा हात तुडवला गेला. खरोखरच आजाणपणे. कारण मुद्दाम तुडवावे तर मी लहान व्हतो. तेवढी नव्हती जाणीव मला. बाई गप्पच बसली व बसायचा प्रयत्न करू लागली झालं काय. आली तितं धाकटी बाई. शिरीधर मास्तराची बायको. नाव

तिचं पुष्पाबाई व म्हणाली, 'प्रल्हाद लागला, प्रल्हाद लागला,' मोठी बाई म्हणाली, 'आग नको म्हणू तसं वनवासी आहे बिचारं' ती म्हणाली, 'मलाच दिसलं नाही.' कायण ती व्हती एका डोळ्यानं आंधळी. फुल पडलेली. तरी काही केल्या पुष्पाबाई बसेना. ती फारच चपळ व्हती. तिनं तोंडाचा पट्टा सुरू केला. तिथल्या छोट्याशा भितीवरून मी उडी जे मारली पुन्हा बराच वेळ तितं आलोच नाही. लक्षीमबाई पाठीमागच्या आडावर आंगोळ करून आली पाणी भरण्याला. तिनं पाहिलं मला व बोलावलं पण मी लाजतच व्हतो. काय म्हणतात की बाबा म्हणून.

लक्षीमबाईकडे काहीच गुन्हा नव्हता. कारण ती मला वोटीत आणून कदी हुरडा तर कदी शेंगा देत असे व दुसऱ्या जावा नसल्या म्हणजे भरपूर जेवायला देई. कारण तिला मजी किव येयाची. कारण ती अंधळी एका डोळ्यानं व तिचा भाऊ शेषकुमार माऊलगांवचा व्हता माझ्या वर्गात.

एकदा असं घडलं की, एक व्हत घर, त्या घरधन्याच नांव व्हत गवरदीन. तो व्हता म्हतारा मुसलमान. त्याच्या पोराचे नांव रूकमदीन व शाबुदीन. सगळ्यापेक्षा शाबुदीन जरा मजवर खुष. कारण व्हता तो जरा जंतरमंतरवाला व मला नेमी काम सांगायचा. व्हते त्याचे हाडोळतीला पावणे. मी इकडच्या बातम्या तिकडं व तिकडच्या इकडं कळवतासे न करावं तर काय करील कुणास ठाऊक. व हडोळतीच्या व्हतो मी साळंत. साळंत आडावर पाणी नाही मिळालं की त्या पावण्याच्या घरी पाण्याचा कदी कदी अर्दी मुर्दी भाकरीचा आधार व्हत व्हता. म्हणून मी सहसा काम चुकवायचो नाही. झालं काय एका दिवशी व्हत त्यांना जायाचं बोळक्यला. तितं व्हती त्याची चुलतबहीण. तिला नव्हता कोनी व तिच्या बापाच सगळं काही त्यांना झालं म्हणून ते तिच्या पोराच्या सुंत्याला जाणार व्हते. ते निगाले गाडी घेऊन बर का तर महारच नव्हता गावात. दुसरे व्हते पण कौन बी तयार होईना. त्यानी मलाच तयार केलं. मी म्हणालो, की बाबा । माझी सातवीची बोर्डाची परीक्षा अहमदपूरला आहे, ते म्हणाले, अर उद्या येतो चाल. मला नग म्हणवना. अेक तर परीक्षा एकीकडं व दुसरीकड मर्जी सोडवंना. करावं काय ? दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते म्हणाले, चल चलरं बेटा. नुसते खांड खायला मिळतील तुला मला लोभ वाटला व झालो तयार जाण्याला. गेलो गावापासून बराच दूर. वाजंत्रीही व्हते संग. आलं जवळ बोळकं व्हती अंदारी रात्र. मग झालं काय. गांव जवळ जवळ आलं व उतरटीही लागली. बैल पळणार. मला बैलाच्या पुढची दांडी धरायला सांगितली. माझा जीव भितच व्हता. कारण मी आतापर्यंत गाडीची

दांडी कदीच धरली नव्हती. कारण बैल मारतील अस वाटू लागलं पणझालं काय, धरलो दांडी. मागून काही तरी वाजल बैल बुजले व पळण्याच्या बेतात आले तर मग काय झालं. गेली मज्या अंगावून, मी गाडीखाली सापडलो व अंगात काटेच काटे घुसले. लोक व्हते ते मुसलमानाचे पण ते सुद्धा माणसंच बिचारे त्यांना माझी किव आली. चू चू करू लागले. मला अनेक आठवणी येऊ लागल्या. पण करणार काय. नाईलाजाला बेईलाज बसलो तसाच चुंबीत. आलो जवळ जवळ सोडली गाडी. कडबा टाकला बैलाला. लागले लोक जेवायला फिरवली वाड नुसतं पाणी कोरड्याशाच आणि भात व रोटचा. मला वाटलं बोटचा काई येइचनात. गडचा सगळेजन जेवू लागले. आल्या बोटचा फारच कमी, मी त्या बोटीकडच बघत व बोटी न खाता फक्त पाणीच चाकीत मांकीत खावू ल गलो. कारण त्यावेळेस मला वाटायचं की सगळ्याच्या बोटचा सरल्यावर आपण खाव्या मग सारे मजकडे बघतील व मी देणारच नाही पोरायला. ही ती माझी पोरकट बुद्धी.

गेली रात्र. सकाळ झाली. आली न्याहरीची वेळ तर झालं काय आली व्हती तितं अेक मांगाची म्हातारी. ती व्हती महारोगी. तिच्या घरून आणल्या व्हत्या ताटल्या, परगांवच्या महारायला व वाजंत्र्याला जेवायला. मला ते कळाले रात्री खाल्लो पण दिवसा कळल्यामुळ जीव धजचना. नुसती मळमळ सुटली व कवा पळून जावं इतुन वाटलं पण केलो काय गेलो. रानांत बैलाला कडबा घालायाच्या निमतानं, शोधले पळसाचे पान पण ते गांव नुसते माळरानाचे व पळसाचे झाड कमी व झुडपच जास्त व्हते. पान फाटलेले नसता कोणते निबर. जरा ही दुरण लावायला गेला की ते पान चुई नसता काडी टोचल्यावर फाटून जायाचे. बरं झाली कसं तरी जाळभाज त्याची. घरी आलो तर चेऱ्याचा केरबा जना आत्याचा आला नव्हता. बोळक्याला, कारण तो व्हता येलमाच्या नवकरीवर. तो म्हणाला, जेवाहो या ताटल्यात, मी नग म्हणालो. लोक म्हणू लागले, कायरं झालंय त्या ताटलीला ? मला ती ताटली ह्या बाईची है व मी खात नाही त्यीत असे म्हणू वाटनाच गेलं. कारण म्हणाव तर पोटाचा प्रश्न व्हता. थोडसं पानावर व कपडचाच्या कोपऱ्यात भात टाकून तसंच खालो. पाणी पिऊच वाटत नव्हतं. कारण तितं नुसत्या नारूच्या पाप्याच्या इहिरी. जिकडं तिकडं माणसाला नारूच-नारू व्हते. व तितंच महारोगाच्या (रक्तपिती) बाईची ती ताटली. नसता न प्यावं तर तिकट खाल्यामुळं जीभ वढतच होती.

बरं, झाली तयारी. आलो वापस चेऱ्याला बहिणीच्या गांवी. पण आता आलाच प्रश्न की बाबा बहिण विचारील कुठं गेलताच म्हणून. म्हणून

मी तसाच गावच्या बाहेरून येलमाच्या व सुताराच्या घरामधल्या वाटनं झालो, चालता हडोळतीला. कारण व्हती परवाच परीक्षा. तीहि अहमदपुरला तालुक्याच्या गावाला. पुस्तक बिस्तक काईच न घेता देवाच्या नांवावर हडोळतीला आलो व पोरायला भेटलो. तितं व्हता कोमटचाचा दासू. त्याचं आडनांव कोडगिरे. त्यानं सोय केली व एक दऊत व टाक पण दिली तो गेलो आरपारातल्या घरात झोपायलां. मी राहिलो ढालजला. तेही बरंच वाटलं मला.

उजडला दिवस. झाली सगळ्यांची तयारी. पोरांची वरं का. सगळ्यावर मीही निगालो. वळसंगीच्या पोरायनी (देशमुखाच्या राजपाल व सुधाकरांनी) आमच्याकडून ये म्हणून सांगितले व्हते. पण बोळक्यामुळे जाऊ शकलो नाही. आणि वाटलं व्हतं की, 'ये म्हटलं की जावच का बाबा' म्हणून गेलोच नाही. आलो एकदाचा अहमदपूरला. राहिले सर्वच पोरं एकाच ठिकाणी. जितं पयलं नाजर साब राहात व्हते. व्हते संग पिंपळेगुरुजी. मला राहा म्हणून बाहेरं कुठतरी गेले व्हते म्हणे. माझ्माजवळ पीटकुट काहीच नव्हतं व पैसे तर विचारूच नका. म्हणून मी इकडं तिकडं उगीच काम ना काजाचं भटकायचो व कदी तरी त्याच्याकडं जायचो. गुरुजी मजवर रागावयाचे, कुटं गेलंताच म्हणून. जवळ जवळ सर्व वेळ राहायचो व जेवणाची वेळ झाली की कुठंही मांजरासारखं पाऊल काढत घेयाचो. पोरायला कळूच देत नव्हतो.

असं व्हता व्हता झालं काय तर मी सहज गेलो गुणाल्याच्या वाड्याकडं. तित व्हता दासू व राजपाल नि सुधाकर. दासू म्हणाला, 'प्रल्हाद जेवण झालं काय रे' मी उच्चारलो 'हं झालं' तो म्हणाला खरंच का ? सांग नारे 'उगी उपाशी राहू नको' शेवटी जेवणास तयार झालो. दासूनं मला एवढं खायला दिल की जरी वर नको म्हणत व्हतो तरी अंतरी बरंच झालं वाटत व्हतं, शेवटी थोडासा चतकोरीएवढा म्हणाना कुटका उरला व ते सारे म्हणाले दे ठिऊन पण मला तो कुटका टाकूच वाटना. कारण 'आली सुगी फुगले गाल. नि गेली सुगी मागचे हाल' अशीच मजी अवस्था व्हईल म्हणून तो कुटका मी नयकलाच्या खिशातच ठिवला. ठिवला तो कुणालाच कळू न देता. दुसऱ्या दिवशी इतिहास भूगोलाचा पेपर व्हता. तर पेपरला जाण्याच्यापूर्वी तो तेंवढाच कुटका कुटं खावा कुटं नाही. विचार करीतच व्हतो शेवटी तहसील कचेरीच्या मागील संडासाच्या पाठीमागं गेलो व तितं बसून तो संपवला व तसं करीतासतांना इकडं तिकडं बघतच व्हतो, की बाबा आपला तेवढासा कुटका व तेही तितं खातासताना कोणी बगितलं तर हसल, याचकडं माझं लक्ष राहायचं. पाणी कुटं पिवं तर गेलो देशमुख वाड्याच्याजवळच्या इहीरीवर. व्हत्या शेंदीत बाया

पाणी. मी याचना केली. एका मावशीला आली दया. घातलं तिनं पाणी. पिलो वंजळीनं. हात न धुताच बरं का. गटागट पाणी पिऊन भाकरीनं नसले तरी पाण्यानं भरून घेतलं पोट तुडुंब. तहसील कचेरी व त्या आडाचा अंतर जवळ जवळ आर्धा मैल आहे. मग मी गेलो भुगोलाच्या पेपरला.

झाले सारे पेपर–पर्चे. आम्ही झालो मोकळे. गुरुजीनं सगळ्यांना सिनेमा, कन्सेशन घेऊन दाखवायचं ठरविलं. पण तेवढे तरी पैसे मजजवळ कुठचे. सर्व मुलं तयार झाली. मी फक्त पाठीमागं उभा राहून ऐकु लागलो. व सिनेमाचा मला एवढा शौकही पण नव्हता. तिकट दर व्हता फक्त चार आणे. खाली बसायाचा बरं का. सर्व मुले गेली. पिंपळे गुरुजी म्हणाले, पल्या कुठे गेला. बोलवा त्याला. मी पुढे गेलो व सिनेमात सर्वांबर घुसलो व पुढच्या मातीच्या सीटवर जावून बसलो. झाला सुरू सिनेमा. येऊ लागले चित्रे पडद्यावर. मला येऊ लागली डुलकी. पोरांनी इकडनं तिकडनं धक्का बुक्का करायचं. झाले पोर गुंग सिनेमात. मी गेलो बसलो. घाला सुरू सिनेमा. पोरानी, 'अर उठ. अरं उठ प्रल्हाद' म्हणून उठवलं. मी डोळे पुससतच बाहेर पडलो. सिनेमा होता दो आंखे बारा हात.

O O

जातील हेबी दिवस

मजे दोन दाजी. एकाचं नाव धोंडिबा व दिसन्याचं नाव किसन. धोंडिबा थोरल्या अक्काचा नवरा तर किसन न्हनग्या वाईचा. धोंडिबा चेन्याचा तर किसन जगळपूरचा. ते व्हते दोगं सक्के मावसभाऊ. कारण तेयच्या माया म्हंजे मज्या बापाच्या सक्या बहिणी म्हंजे मज्या आता. दोगीबी मज्या बापावून वडील. मी माय बाप मेल्यापासून धोंडिबाच्या ईतं न्हात व्हतो. तो गरीब सबावाचा. राकायचा लोकाचा हुंट पातीनं. लोकाचे पैसे. हेयची निसती अंगमेहनत न्हायची व जे किराया लागला आर्दा मिळायचा, तेयला. त्याच्यात काई भागायचंच न्हाई. आक्का निसतं वन वन करायची, पसाकुसा मिळंल म्हणूनशीन दाजी हुंटावर बसून टेलत गैरादयावनी कुटंगी फिरायचे, व किराया लागला काय न लागला तेयला परवा नव्हती. काम तर करायचच न्हाई पण पोरायसंग जे असंल ते गळागळा गिळायला हजरच न्हायचा. म्हणूनशीन अक्का त्याच्यावर लई चिडायची व शिव्या देयाची. दाजी तसाच निघून जायचा, पण कदी कदी असं व्हायच की त्याची माय म्हंजे मजी आत जे लावून देयाची व म्हणायची,

'अर धोंड्या तुला सकीनं काय काय बोललीरं, तुजा खाना फराब व्हवू दे. त्याला संसार करता येत न्हाई मग लेकरं कशाला हळजाव, निसपुरी भाड्यानं. गोसायनं.'

मग दाजी लई मायच ऐकून चिडायचा व मज्या आक्काला जे बेहद मारायचा ते कधी कधी तिचं डोस्कं फुटायच व रगत भळ येयाचं भाईर. भईन मेलो मेलो रे बापरे म्हनीत शिव्या देत खाली बसायची. तरी माय लावून देयाचीच व दाजी लगावायचाच. मला लई वंगळ वाटायचं. पण करणार काय. मला वाटायचं की अपून बी त्याला मारावं पण मजा जीव व्हता न्हनगा.

मी, चेन्याच्चा आक्काला मारलं की जगळपूर एक कोस असल्यामुळं जगळपूरच्या भईनीकडं पळून जायचो पण जगळपूरला गेलो तर बी थेट घरी

जायाचोच न्हाई, कारण तितल्या दाजीचा सबाव जरा अलक व्हता. ते निसते डोळे वटारायाचे व घुमकारतच बोलायचे व तेयला मज जानं बरं वाटायचं न्हाई, व वाटलं तरी मी तेयला खसपटासारकं वाटायचो. कोनी लोकानं म्हनल,

'आहो किसन, तुमचा म्हेवना आलाय का ?' ते म्हणायचे,' हं हं. आलय ते पोरगं. त्याला काय लागलय येतंय तसच.'

मला लई भिव वाटायचं तेयचं. म्हणून मी मऱ्याआईच्या देवळातच घरी न जाता बसायचो व देऊळ सापसूप करायचो व लोकानी निवद बिवद, बोन नारोळ ठिवल्यालं खावं वाटायचं पण खायचो न्हाई, कारण वाटायचं खावं तर मरूमाय काई करील बाबा. म्हणून तसच बसायचो अेका कोपऱ्यात दडून. कोणी आलं की लई दबायचो व मनात तर वाटायचं की कोण तर बगावं गड्या मला व बाईला सांगावं. मग कोनी पोरसुरं बगायचे व बाईला सांगायचे.

'आये काकू' परलादमामा आलाय. काई म्हणायचे, 'आये मुगताबाई तुजा भावू आलाय. माय, त्या मरूमायीच्या देवळात बसलाय, चल म्हणलं तर येतच न्हाई.'

मग भईन येयाची तेबी दाजीला दबत दबत. कारण तेथचा कारण तेयचा लई दरकार व्हता तिला व दिसरं म्हंजे दाजी म्हंजे लई चंद्रा, व बाई म्हंजे लई साळीभोळी. येडसर बिचारी. गरीब गाय तिला कुटं जाऊ देयाची न्हाई. तिचा जीव लई तुळतुळ तुटायचा. दाजी निसते भारुंडबिरुडं म्हनीत व वाटनंबिटन हं हं हा हा करीत ऱ्हायचा. ते सागुती फिगुती खात नव्हते, व गळ्यात जानवबी व्हतं. म्हणूनशीन उतीमलोक तेयला जरा जवळ करायचे. ते लई फुगून गेल्यावनी करायचे. व ते गरीबाला बोलायचे नाहीत. तेयला आगास पाताळ एक झालं व्हतं. तेयला दिसत न्हवतं. बाई येऊन देवळात, 'चल रं बापू' म्हनायची. मी जायाला जरा भियाचो. कारण त्या दाजीचं तसं डोळे वटारून बगनं व भईनीवर कातावनं बगून नकोच वाटायचं मग कदी कदी तिच्या म्हांग म्हांग दडून दडून जायाचो, व अेका कोपऱ्यांत बसायचो तितल्या लोकायला लई आदत व्हती. बायापोरी म्हनायच्या,

'परलादनं काय आनलंय माय मुगताला. आता सन जवळ आलाय.'

तेयला म्हाईत व्हतं की मजे मायबाप मेलेत व मीच लोकाच्या वळणी-वस्तरी पडलोय म्हणून. बाईच्या जीवाला कातर लागायची व मला वाटायचं मी लहान व मजेच दिवस देवाऱ्यावर न्हाईत. मी काय आणू. दाजी जेऊन

भाईर गेला की मग हालक मी बाईसंग मुच् मुच् जे असलं ते कांजीभाजी खाऊन घेयाचो, व म्हारोवडचातल्या गुरू म्हाराजाच्या देवळाजवळ सगळे लोक निजायचो तित बाजूला दूर निजायचो. लोक म्हणायचे 'अरे कोन हाय. आंदारात आलंय. तितं पडलयं' कोणी म्हनायचं, 'अरं, त्या किसनादाचा म्हेवना हाय. किसनचा म्हेवना.' तसं काई म्हणायचे. तर कोनी म्हणायचे. 'अरं, त्या ईर मामाचं न्हनगं पोरगं हाय. त्याचा बाप असताना लई अंबल व्हता. किती लोक येयाचे ईरमामाकडं जाणतपणाच्या नादानं पण आता त्याच्याच लेकराला कसे दिवस आलेत. आन हा किसन तरी त्याला बरं बगतोय का. किसन खाऊन पिऊन चांगला हाय तर ह्यानं ह्या पोराला ठेवून घेवं. पण कसा घेईल तो मुलकुचा चेंगट हाय.'

मी रातरबर करमायचो तितं व सकाळ व्हताचं कदी भईनीला कळवायचो तर कदी कळवाचोच न्हाई. तसंच चेऱ्याला निगून जायचो. भईन बिचारी हुडकीत न्हायाची. मग कोणी तरी तिला सांगायचं.

'आगं, मुगताबाई, परलाद गेला चेऱ्याच्या वाटनं.' मग ती हुरहुर करीत पानी गाळीत बसायची. असं कदी कदी व्हयाचं तर कदी कदी मऱ्याईच्या देवळातून भईन मला न्हेयाला आली तरी येतो चल म्हणून जायचोच न्हाई व वापस चेऱ्याला तितूनच म्हागी फिरायचो. कदी कदी दिवस असल्यावनी वाटायचं पण बुक्याच्या मळचात तर बेंबऱ्याच्या माळावर दिवस मावळायचा. मग मला भिव वाटायचं व झुडपा फिडपात खूसपूस केलं की 'आलरं, बापरे' वाटायचं काईतरी. सुताराच्या माळावरच्या वडाजवळ तर लई भिव वाटायचं. कारण लोक सांगायचे तितं लई मोटं भूत हाय म्हणून. लई भेगी भेगी चालायचो व काई वाजलं की दचकायचो व कदी कदी तर घुबडं घुमायचे. मला वाटायचं लई वाईट दिसतंय गडचा वक्त. भेगी चलताना कदी चिपाडानं पाय कापायचे तर कुजलेले काटे मोडायचे व काडलं तरी मदीच खुडाचे. मला खूप वाईट वाटायचं उगंच आलो म्हणून बाईच्या घरला न जाता. भाकरीला लात देऊन आलो म्हणून असं झालं काय की वाटायचं.

झालो चवती पास. आला ईचार. कस करावं वाटू लालं तवाच झाली एक गम्मत. ती म्हंजे आक्कानं आनलं व्हतं जगळपूरच्या बाईला कोनी निगायला. व तिला वाटलं की कांजी भाजी खावून व्हईल कसंतरी बाळातपण. कचेवले जातील दिवस. निगाली कोणी बाई. झाली तिला पोरगी घर व्हतं निसत केंबळाचं बाळतीनसाठी रातभर चिमणी ठिवायचे. जे चिमणीनं अेका

दिशी घर पेटलं ते काई केल्या आटपंना झालं. लोक झटले. पाण्यानं ईजवू लाले पण करावं काय नाईलाज. वारं बरंच व्हतं. जे हवा भडकली ते सार घर जळून खाक झालं. जे ते चूं चू करू लाले. सारा म्हारोडा म्हणू लाला. 'उगीच आणली ह्या सकीनं भईनीला, दुसऱ्या वाया म्हणायच्या " भयनीचं तिला कोडकौतिक करू वाटलंग. बरी केली आणली आता हमच्या घराला आग लागली म्हंजे तिचं पोट थंड व्हईल. " काई म्हणायच्या, आगं म्हणूनि. येळ कुणालावी येतीया. घरची गरीबी लई पण अक्काला लई सब व्हती. लोटके चेटके भरून ठिवायची, हुंटाच्या गादीमदला रूबी व्हता." " सगळ्याची राख रांगोळ झाली. आदिच कपडे नसायचे व व्हती पावसाळ्यात थंडी पाण्यात हिवात व्हईल वापराय म्हणून ठिवलेल्या भारावर चिंद्याची गोदडी ती बी खाक झाली. पोर लई मुतायचे तिचे तरी बी गोदडी हिवात तर लई आपरूक वाटायची. सारं घर जळाल पण माणसाला कायबी झालं न्हाई. देवाजवळ मारोजा हाय ग माय.

जिकडं तिकडं हाच बोबाटा झाला. सारे म्हणू लागले, सकीचं घर जळालं. सकीचं घर जळालं. कोणी म्हणायचे. कशाला आणली असंल भईनीला रांडण. जसं व्हईल तसं व्हवू देयाची व्हती तिच्या तिच्या घरी. कायी बाया म्हणायच्या आग माय वडील घाडील हाय तिनं म्हणूनशीनी आणली असंल करून बगावं म्हणून. लोक ये जा करीत न्हायचे व बगून चू चू करायचे व कोणी म्हणायचे, " सखू ये गं मज्या घरला. देईल तुला काई तरी. " तर कोणी म्हणायच्या " अगं, सकूबाई ये गं माय मज्याकडं. कापडं मिपडं देईन तुज्या लेकराबाळाला." असं व्हता व्हता दिवसामागं दिवस लोटले. कोणी कापड दिले. कोणी थोडच्या दाळी, कोणी दाणे तर कोणी तांदूळ दिले. घरातली जळलेली काळीभोर गठुड्यान असलेली थोडशी उडदाची व मुगाची दाळ भईनीनं काई टाकून दिली न्हाई. ती कशी तरी लागायची. म्हणूनशीनी आक्कानं तिला लोकायनी दिलेल्या त्या दाळीत मिसळून टाकली. व तसंच एक व करप लागली तरी तसाच मुकाट्यानं खावं लागायचं. दिवसा म्हागं दिवस चाले. जे थोड्या थोड्या मातीच्या व शेनकुडाच्या भिंती व्हत्या, त्या जरा सारवून घेतलो. व त्याच्यावर आर्ध्या घरावर पळाट्याचा ताटवा व अर्धे घर जाळणातले लाकडं वाकडे तिकडे व धांडाळ चिपाड टाकून जरासा फाटक फाटकं आदार केलो व न्हावू लागलो. तवा उनाळा भरकांडीत व्हता. लई उन लागायचं. आमी लई करून तर बामणाच्या चिंचखालीच दुपारी न्हायचो.

सगळे लोक म्हणायचे की आता सकीच्या नवऱ्यानं हुंट सोडून देवं व जे लागलं ते काम करावं पण दाजी लई हट्टी. तो काई लोकाचा हुंट सोडून

देईनाच. जरा काम करा बाबा म्हटलं की तो म्हणायचा मज मी हुंटाचं काम करतो तुमचं तुमी बगा. तेयला दिसरं काम करुच वाटायचं न्हाई. खाया मिळंना तर मिळंना पण हुंटावर बसून टैलत फिरावं वाटायचं. किराया लागो कि भागो तेयला काई परवा न्हवती. बिचारी आक्काच जरा धडपड करायची. लेकरंबाळ हायत म्हणून. कोणाचं शेन काडायचो, तर कोणाच्या ईत लाकडं आणून टाकायची. तर कुणाच्या ईत गवत आणून टाकायची. मी बी संग न्हायचो. मला कदी कदी नगं म्हणावं वाटायचं. पण आक्का शिव्या देईल वाटायचं म्हणूनशीन तसंच चुंबीत जायचो कुटं बी. जित आक्का न्हेहेल तितं.

दाजी, जरा गैरादी व्हते. ते काम करीतच नव्हते. पण जे आणलं ते पोराय संग मातर खायला हजर न्हायचे मग कदी कदी आक्काचं व त्याचं जुपायचं. दाजी लई मऊ न्हायचा पण कदी कदी राग आला की असा भंगीट व्हायचा व आक्काला लई मारायचा, व त्याची माय म्हंजे–मजी आत, बापाची भईन लई लावून देयाची 'अर धोंड्या तुला सकीनं असं म्हणलं तसं म्हणलं' म्हणून मी रडत कुटबी निघून जायचो.

जरा मिरूग सितळाई पडली. म्हजे पाणी पावूस सुरू झाल न्हाई तर जरां थंड वाटू लागलं. सगळे म्हणू लागले.

'आगं सकू ह्या तुज्या भावाला शाळा बिळात जाऊ नको म्हनं. ठिव त्याला नोकर कुठंतरी. 'भईन म्हणायची, जी,' माय जरा न्हणगा हायजी जीव त्याचा. 'लोक म्हणायचे.' आगं तसं पोमाळून ठिवू नको त्याला. चांगला बारा तेरा वर्षाचा हाय. त्याला काय झालंय दुदग्याला. 'मला बाया म्हणायच्या,' अरं परल्या। न्हातूसकारं नौकर किसंड्रा पाटलाच्याईतं नसता अप्पा मोऱ्याच्याईतं. मी गप्पच बसायचो. भईनीला जरा बरं वाटायचं कारण पैसे मिळतील व त्याच पोटबी भाहीर पडलं म्हणून.

मग ठिवलं आक्कानं नौकर मला. दाजीनं काई ध्यान दिलच न्हाई. मुकाटचानं बसलं. मला समजनाचं गेलं. किसड्रावापूनं मला आडीच रुपये देऊ केले. म्हईन्याची म्हावर बरं का। सगळ्यांना वाटलं की आता सकीचं बरं झालं. एक तर पोराचं पोट भाईर पडलं व दिसरं तर वरीस सहा म्हईन्याचे पैसे उचलून सकीला घराचं काही तरी बगता येतंय. अस साऱ्याला वाटलं. मी आज परेंद अस नौकरी न्हाईलो न्हवतो. दोनचार दिवस बर वाटलं. कारण उनाळ्याचे दिवस व्हते. तेवडं काम बी न्हवतं व तेयची लई मिन मिन नव्हती. खायाला बी चांगळं वंगळ मिळायचं. चांगळवंगळ म्हंजे दिसर काई नुस्त भाजी

भाकरी. जरा फोडणी फिडणी दिलेली एवडाच काय त्याचा आरत. कारन भईनीच्यात कवा भाकर म्हंजे रोटी मिळायची तर कवा भरपूर मिळायचीच न्हाई. थोडी रोटी व जास्त आंबाडचाची भाजी. सुगीत वाळून ठिवलेली खावून पोट भरावं लागायचं. नसता उंबराच्या दोंडचाची भाजी निट मिट बीट नसताना खाव लागायचं. म्हणून मला किसंड्रा बापूच्याइतलं जेवन चांगळवंगळं वाटायचं आन म्हणुनशीनी मजं मन रमायचं. पण ते लोक मला वतलाजवळच्या मोरीजवळ तर कदी हुडव्याच्या जवळ नसता कणगीच्या जवळ बसवून जेवू वाडू लागले. मला अमंगळ वाटायचं व मन नसताना कामाला जावं लागतंय म्हणून खावून घेयाचो, व पळून जावं कुठं तरी वाटायचे. पण चांगलं गुंतलो व्हतो व भिकोरा व्हता मजा सबाब. वाटायचं बरी व्हती शाळा खाया मिळंना तर हरकत नव्हती. आता काय गडचा खाया मिळतेय पण कुटंबी लेकरं हागतात तित बसून जेवावं लागतंय. लई वाईट वाटायचं. पण गेलो अेक्यादिवशी खोपाडचाच्या शेतातून कडबा आणायला. लई धांडाळ व्हता कडबा. मला किती येणार. लई कुतून कुतून आनलं तर दोन कवा तीन पेंडचा आगोदरच वारं सुटलं व्हतं. मी कडबा बांधलो तर चांगली गाट बसलीच नाई. निसतं बिळबिळ वाटू लागलं. जे वारं म्होरुन सुटलं काई केल्या जाऊ देईना. काई लोक वाटतले म्हणायचे,

'कायरं परल्या। तू नौकर न्हायलास कार बापू' काई पोरा सारखे, पोरगेले चिडवून म्हणायचे,

'आर शाळा बाळली का आता र, किसंड्रा पाटलाच्या ईत नौकरीला हाईस व्हईरं' मुकाट्यानं बसायचो. व लई लोक बोलले की शब्द न काढता हं हं म्हणायचो तसं म्हणतांना मज्या मनात कसंतरी वाटायचं पण म्हणतात ना 'आडला नारायण'. तसं झालं मजं म्हणून धरलो व्हतो नौकरी. नाईलाज व्हता म्हणून भईनीच तसं मन नव्हतं बिचारीच पण तिच्या घरची राखरांगोळ झाली व्हती व तेवी भईनीच्या कोण निगण्यानं म्हणून लोक तिला चिडवायचे म्हणून आक्का मला म्हणायची 'अरं बापू नवकरी जरा चांगलं मन लावून कर तू बाबा. व्हईल जाळभाज घराची.'

मला वाटायचं मजेच जर मायवाप असते तर तेयनी बाईचं बाळातपण केलं असतं व अक्काला अशी पाळी आली नसती. पण काय करावं मायबाप आदोगरच देवाघरी गेलते. कुणास ठाऊक हामाला भिवून. देव जाणे. मला किसंड्रा बापूच्या ईतले लोक लई काम सांगू लाले, मजा पडला न्हनगा जीव, मला हे सारं झेपेना गेलं. मग पावसाचे दिवस झाले की दाजी आक्कावर रागात आले व म्हणू

लाले, 'आपलं कसं का व्हईनां. त्याला का चाकरी ठिवलीस. राहारं परलाद घरी, आण जा तुज तू शाळत.' मला बरं वाटलं. मी बसलो घरी. पण उद्या आले किसंड्रावापू. ज्जरा रागातच व म्हणू लाले.

'अरं परलाद्या। काय झालं तुला दुदग्या. चांगलं खाल्ल्या घरचे वासे मोजायलाईच तू. का बसलास घरी.'

तेयनी भईनीला इच्यारलं व म्हणू लाले.

'अगं सके कुटं गेलाय घोंड्या

दाजी आले भाईर व म्हणू लाले काय की बापू त्यानं व त्याची भईन जानं मला कायबी म्हाईत न्हाई, म्हावर आणकी उचललो नव्हतो म्हणून बरं झालं. खानं पिनं व काम बराबरी झालं. असं म्हणूनशीनी चाकरीवून बसलो कदीमचा घरी. किसंडाबापु तोऱ्यातच गेले. ते पुना फिरून मज्याबडं फायलेच न्हाईत. सगळे लोक म्हणू लाले. 'अरं परदिशा पोरा, सकीचं घर तुज्या परत-भावामुळं जळालं. कारं तू चाकरी सोडलास. मी ऐकायचो व कदी कदी चिडा-यचो बी. पण ते लोक मोठे न्हायचे. म्हणूनशीन भईन मला दाबून ठिवायची मग जरा आवघड वाटलं की रडायचो. व कुणाच्या बी वळणी वस्तरी बसायचो. तर कदी कदी कुणाच्या तरी शेताबितात रूसून जायाचो व तेथच काय बी काम करायचो. व तेयनी जे दिलं ते शिळपाळं खायचो. कदी कदी काई नसलं की ते लोक म्हणायचे.

'खारं हुरडा जरा दोन चार कणसं होरपळून' कदी कदी खायाचो तर कदी तसाच बसायचो कारन कदी कदी लोक मजी परक्षा बगायचे व म्हणायचे, 'अरं खावं म्हनलं की खावंच कारं तू शाळत जात व्हतास. तुला समजत न्हाई. कदी येईल तुला अक्कल बिक्कल.

जर का कदी तेयनी लई खा खा म्हणून आलुलकी केली की खायचो व गळागळा पाणी पियाचो. तर व्हयाचं दिसरच. दाणे जे फुगाचे ते पोट घळघळ तर कधी घर् घर् करायचं व टोचल्यावनी करायचं व लगेच भरारी लागायची मग वाटायचं उगच तर खाल्लो ईच्या मायला.

आता झालं काय चेऱ्याला अक्काची लई कंगाल इस्तती झाली व शाळा बी गावात नव्हती व निव्वळ बसून आयता खाऊ लाला पोरगा वाटू लालं तिला. व तिच्या घरच्यायला. माज मन रमना गेलं. मग मला एकदा जगळपूरच्या दाज़ीनं बोलविलं व म्हणू लाले की,

काय रं, परलाद, रहातूस का तू मज्याईतं. तुला दुकान करून देतो. बरी धा वरीष रहावं लागल तुला. आदिच बोल ठाक ठोक. म्हागून लोक कायी म्हणतील. धा वरीस न्हाईलास तर तुजं लगीन करून देतो. तमाम खरच मीच करतो.'

मला लगनाची हवूस वाटली न्हाई पण दुकानात तरी न्हावून जरा हुपार व्हईन वाटलं. म्हन्शीनी केलो कबूल. चेन्यावून मजी पाटी एक पुस्तक घेऊन गेलो जगदळपुरला. ईकडं अक्का व आत म्हणतच व्हती की "बाबा रहा रं इंतच. किसन्या भाडच्या लई दलाल. कावळ्यावनी हाय. तो तो काय देयालाय तुला दुकान करून." पण मी ऐकलोच न्हाई. दुकानाच्या आशेनं गेलो पण दाजीनं जुपलं खुरपायला, आप्पारावच्या माळाला. आप्पारावाचा माळ म्हंजे तेयनं कबजा केल्यालं शेत. जरा काई घोळाचं व्हतं शेत. मला तितकं म्हाईत नव्हतं पन ते घरचंबी नव्हतं शेत. पन मला काय करायचं. मी पोटाचा मारला व्हतो, त्या शेतात निसता नागरमोता व्हता. सगळं चवाळी लागून गेलं व्हतं. पिवळ्याचे एक दोन पिवळे चुटूक घाट दिसत व्हते. व त्यात जरा कुटं तरी ढांगा वर कुट कासऱ्यावर एक उडदाच घाट दिसायचं. मी रोज चालो माळाला, खुरपं घेऊन बरका. मज्यानं तिवडं रान व्हयाच न्हाई पण मन लावून बारीक मट्टचक निंदायची. पिवळा तर गेलाच व्हता. काई उडदाचे ढाळे थोडेसे आले हवा खेळल्यावुर. कारण ईतकं गवत दाटलं व्हतं की पुस्तागत न्हाई. निसता कुंदा, नागरमोता ठिलून व्हता. वाटायचं की त्याच्यात काय बी पेरलं नाही तितं येयाचे खूप लोकायचे ढोरगुरं. येऊ देऊ नको. म्हणून दाजी मला सांगायचा. पण मला नवाड्याला कोनबी एकायचं न्हाई व बऱ्याच लोकायला म्हाईत व्हतं की मी परदिसा हाय म्हणून.

तितंच येत व्हत्या कायी पोरी म्हैशी घेऊन चारायला बरं. त्याबी म्हारोड्यातल्याच असायच्या. व तितंच चारवायच्या व बाजूला जरा जरा पाण्याच्या डबक्यांत बसवायच्या. पानी कमी पण निसतं बेंदाड असायचं व चाटू माशा त्यात. मला वाटायचं, खायच्या माशाच हाईत म्हणून उडी कुनं टाकली की धरायला बगायचो. तर काय चाटूच चाटू येयाच्या हातात. व पोरी म्हैशीला उटवू नको म्हणून शिव्या देयाच्या. काई म्हनायच्या. काकूचा भावू का पडलाय माय ईतं. लई गुणाचा दिसतोय म्हैशी उटवायालाया. जरा दिसऱ्या आळीच्या म्हणायच्या, कोण हायग तो, तर काई म्हणायच्या, 'आग त्यांनं हाय त्या वरलाकडच्या किसनदाच्या मुगताबाईचा भाऊ.' एकदा तर तेयच्या म्हैशी वावराजवळ आल्या. म्हणूनशीन हानायला गेलो तर तेयनं जे

शिव्या सुरू केल्या तोबाहल. तेयनं तेवढच केलं न्हाई तर एक काटक्या कुटक्याची ताटी केली व त्यावर चिक्लाची एक मुरुत करून मेल्यावानी ठिवली. मज्या नांवान बरं का !

असं व्हता व्हता चाले दिवस निगून. जरा जरा साऱ्याच्या वळकी व्हवू लाल्या. तितले गावातले काही पोरं हडोळतीला शिकायाला जात व्हते. मी वाटंवर त्या आप्पारावाच्या माळावर न्हायचो व ईचारायचो की, 'बाबा पाचवीला लई भारी कोरस असतंय का म्हणून ?' पोरं बोलायचेच न्हाईत. कारण सगळे वाण्याचे, जगमाचे व बामणाचे न्हायाचे. ते लई फुगुन गेल्यावनी करायचे. ते लई ईटाळ मानायचे. मजा जीव लिव्हण्यापायी तुळतुळ तुटायचा. व्हता तेयच्यात एक कोळचाचा ईटल. तो व्हता बाराहळीकडचा पण व्हता तो सोयऱ्याच्याईतं जगळपूरला लिव्हायला म्हणून. त्याची झाली वळक तो जरा समद्या जातीपक्षा हलक्या जातीचा व्हता. व परगावचा म्हणून तो एकटाच न्हायचा. झाली मजी त्याची वळक. मी रोज ते वावर निंदित असताना ईचारायचो. 'आंग्रजी लई आवगड हायका जी' तो म्हणायचा 'अरं जरा हाय' काई आवगड न्हाई पण तू येतोयाच कुटं. कशाला ईच्यारतूस मला. गणित व आंग्रजी जरा आवघड हाईत व ईज्ञानाचा मास्तर बी लई खराब हाय' म्हणायचा तो. मला वाटायचं चेऱ्यावून जमलं न्हाई तर न्हाई ईतून जवळ हाय हडोळती व दाजी दुकान कर म्हनन्यापक्षा शाळंत का जा म्हणंना गडचा ? पण तो कसा जाऊ देईल. त्याला पैसा पैसा गोळा करण्याची हावूस व्हती. त्याला मानसाची कदर कुटली ? त्याला आगास पातळ एक झालं व्हतं. काई खाली दिसत नव्हतं. मला वाटायचं चेऱ्याचा दाजी व भईन जरी गरीब असले तरी हाजार पटीनं चांगले गडचा ? उगंच आलो ईतं. पळून जावं वाटायचं. पण कसं जाऊ. आलतो तितून नको नको म्हणाले तेयनी तरी. व ईतं हेयच्या पेचात सापडलो व्हतो. कसा कुण्या तोंडानं पळून जाऊ वाटू लागलं. अस करू तर कसं व्हईल. तसं करू तर कसं व्हईल. ईकडं आड तिकडं हीर. आगीतून उटून फोफाट्यात पडल्यावनी वाटू लालं पण वाटायचं की बाबा, जातील हे बी दिवस.

○ ○

दोन प्राणी उंट आणि मी

होता होता असे झाले की मी जरा मोठा होत चालो तर मग दाजीनं पातीन राकायचा उंट वळायला जा म्हणायला सुरूं केलं. मला जरा वर बसून टैलत फिरता येतंय म्हणून जरा वरं वाटायचं पण आंदरून धुकूडपुकूड केल्यावाणी वाटायच कारण म्या अशा कितीक गोष्टी उंटानी माणसांना चावून फोडून काढ-ल्याच्या ऐकल्या व्हत्या. नुसत्या अैकल्याच नव्हत्या तर माझ्या अेका चुलत भावाला चावून पिट पिट केल्यामुळे तो मरता मरता वर्षा दोन वर्षानी खितपून खितपून कसातरी बरा झाला. हे मी सोता डोळ्यानी बगल व्हतं. नंतर दाजीच्या बी हातच बोट फोडून काढलेलं मी पायल व्हतं. आणि म्हणून उंट राकायला जा दुसऱ्या पोरायसंग असं दाजीनं सांगितल की जरा भिती तर वाटायची पण नुसत मुकमूक करायचं पण नाईलाज म्हणून मला तो राकायला रानात जावा लागायचा.

तसं मला कधी उंटान चावलफिवल नाही. परंतु उंटाने मज्यावर वचपा मातर दोन तीन वेळा काढल्याचे आजूनही आठवतंय. कधी एकदम नकेलीला न जुमानता अेखाद्या काटेरी जाळीत घुसून तर कधी माझा पोराचा आवाज वळकून जास्त जोरात पळून व मला खाली पाडून टाकून. तरी मी त्यातून सही-सलामत सुटलो कारण मज्यावर दुसरे जरा हुषार पोरं राहायाचे.

रानात चारायला जाताना दाजी सारं करून देयाचा. कजावा लावून देण्यापासून ते मला वर बसवून नकेल उजव्या किंवा डाव्या कानाच्या फटीतून घेवून मज्या हातात देण्यापर्यंत व दिसऱ्या मुलायला म्होरी हाण म्हणून मला त्यांच्या मागे न्हेयाला सांगेपर्यंत.

कधी कधी दाजी उंट उभा असतानाच दुसऱ्या पोरायसारखं बैस वर पायावरून म्हणायचा. मानेवरून चढून पण लई भिव वाटायचं. मग ते उंट तर खाली बसवायचे. मला वर बसवण्यासाठी नसता तेच मला वर चढवून देयाचे

व म्हणायचे आर परलाद तू लई भेकोरा यार गांडू हैस. अशान नाही जमतर माय, माणसानं हरेक हुन्नर शिकावं, निसतं लेव्हण्यानं भागत नाही.

मला वर बसवून दिल्यावर एखाद्या दगडा बिगडाला उंटाचा पाय अडकला की मग उंट एकदम मोठी भारी ठोकर खावून सरकन पुढे सरकायचा. मग मला एकदम गचका बसायचा व मलां दाजीला सांगावं वाटायचं की मी जात नाही म्हणून. पण नाही कसं म्हणणार ? कारण मी होतो ना हुकमाचा ताबेदार. जणू काय वतनदार वलुतेदार. त्याला सारेच हक्क. फक्त हक्क नाही, नाही होय म्हणण्याचा. दाजी दुसऱ्याचा गुलाम तर मी त्याचा. पर्यायाने मी गुलामाचा गुलाम. हेच तर काय म्हणता येईल तसं वागण्याला.

हे झालं मी दाजी व उंटाचं परंतु मी आता सांगतो थोडं फार उंट व माझ्या सहवासाचं व त्याच्या सवयी खोडी संबंधी व त्याच्याशी संवाद करते-वेळेसचे वापरायचे शब्द, त्याला असलेले आयब– बट्टा किंवा रोग त्यापैकी काही जन्मताच तर कांही नंतरचे. जसं ईतरात घडते नतर हळू हळू जशी जशी ताकद कमी होते तशी.

तसं गायी म्हशी व कमीजास्त बैलं वळून मला माहित व्हतं व त्यातील कोणालाही जरासं का व्हईना जवळ केलं किंवा जीव लावल्यारखं वाटलं की ते अगदी जवळ येयाचे व तोंड किंवा जवडा अगदि मयेखातर आपल्या हाताकडे करावचे व जिभीने आपल्या अंगास चाटायचे. अर्थात माणसाचे शरीर जास्त खारट असते म्हणून ती चाटत असतील. परंतु शेवटी अर्थ एकच होतो की खारट म्हणजे प्रेमळ व सत्त्व व जिव्हाळा असलेले. पण माझ्याएवढ्या दांडग्या सहवासात उंटाने कधी मला काही केल्याचे आठवत नाही.

उंट हा फार रागीट प्राणी व मोठा खुनशी वृत्तीचा. जसा अेखादा खुनशी माणूस जे मनात असेल ते न दाखवता हळूच मनात सलणाऱ्या गोष्टीचा काटा काढतो तसाच उंट पण काढणार. अगदि वेळ काळ आडरान गाठून. म्हणून मी सहसा अेकदा दाजीन वर बसवून हातात नकेल दिली की मग सारा दिवस पोरायसंग जिकडे नेले तिकडे उंट नेयाचो व दिवसभर तहान लागली तरी खाली उतरायचो नाही. पाणी पिण्याला मग ते पोरच कधी कधी दुरण लावून मला पाणी वर देतासत. मला जरास जास्त भेव वाटायच कारण म्हणजे मी लिव्हणारा पोरगा व मध्येच कांही झाल तर मग दाजी म्हणेल की दे शाळा सोडून व लाग मज्याबर उंट राकायला म्हणून भी लईकरुन भितसे.

उंट तसे सहसा आनन्रोकन असल्यामुळे बरेचसे मस्तीवान, माजलेले व कितीही वज त्याच्या पाठीवर लादले तरी त्याच्यातली मस्ती जिरत नसते. हिवाळ्याच्या तोंडापातून ते माळेगांवची जत्रा व्हईजतूर सारखी बडबड (तोंडातून फेसाचा बुडबुडा काढणे) व पटपट (मुतून त्याला शेपूट मारते.) चालते, बऱ्याच वेळेला अन्न सोडूनच देतो. खाली पाणी मातर पित रहातो. व पाणीही दिले नाही तरी चालते. पण आंदरून सारखी गरमीची मस्ती असल्यामुळे तो पाणी पितो. तशावेळी तो सारखे दांत करकर खात रहातो व त्याला कुणाला तरी चावून फोडून टाकावे वाटते. कुणास ठावूक त्याला जरा ऑऊटलेट मिळून त्याचे कँथारसीस झाल्यासारखे वाटतासेल. बहुतेक तसाच तो प्रकार. तो सारखा रागाने तुंबलेला असतो. म्हणून त्याला मुंगस घालतात व पाणी पितेवेळेस व चारा खातेवेळेस तात्पुरते ते मुंगस काढतात. जमेल तिथं तो मुंगस आपटून शेपूट मारून राग व्यक्त करतो. त्या मोसमात तर तो अगदी बारीक होवून जातो. परंतु तो कशालाही शिवत नाही. त्याच्या मानेच्या मागील गड्ड्यातून सारखं वंगणासारखी तेलकट मस्ती पाझरत असते. ह्याचा अर्थ असाच की त्याला कुठंच ऑऊटलेट नसल्यामुळे त्याच्यातील मस्ती सारीकून बाहेर पडते. मग थोडी थोडी त्याची जिरते जशी ईतरांची जिरते.

उंटवाल्याजवळ साधारणत: अेक वेळूची काठी, उंटाचे व त्याचे लाचकन, अेक पोत्याची पिशवी व त्यात अेक जरमलची परात व लोटा व आयडीनची अेखादी कुपी व उंटाला पाणी पिण्यासाठी अेखादी बादली ह्या वस्तू असतात.

मी सहसा रोज उंटाच्या जवळच झाडून लोटू करून लेंड्या भरून उकिरड्यावर टाकायचो पण कधी कधी उंटाच्या पायाखाली व पोटाकडे लेंड्या गेलेल्या रहायच्या तर ते धेत नव्हतो व उंट ईकडं तिकडं हलला किंवा उठून आजुबाजूला झाला की मग भीत भीतच ते झाडून घेयाचो व दाजी काही म्हणू नये म्हणून सोचे ठेवायचो.

माळेगांवला गेले अन दाजी उंटाच्या सौदेबाजीत गुंगले की मग आम्ही सारे पोरं गावांकडून आणलेल्या रोट्यांचे झालेले शिळे वाळलेखनिक असे कुटके घेवून सागोतीच्या व्हटलात घुसायचो व पाण्याच्या वासानेवासाने टोबून खायचो. खूप मजा वाटायची कारण येरवी खेड्यात तसे व्हटेल तर नसते व असला बी तर मध्ये कोणी येवू देत नाही म्हणून दाजीच्या शिव्या खावूनही व्हटलात खायाला जायाचो. व्हटेल तरी चांगले थोडेच असायचे. ते फक्त वाटायचे कुठं तरी बारदाणे लावलेले

उंटाला अनेक रोग–आयब–बट्टे (खोडी) असतात. त्यापैकी कांही

व म्हणायचे आर परलाद तू लई भेकोरा यार गांडू हैस. अशान नाही जमतर माय, माणसानं हरेक हुन्नर शिकावं, निसतं लेव्हण्यानं भागत नाही.

मला वर बसवून दिल्यावर एखाद्या दगडा बिगडाला उंटाचा पाय अडकला की मग उंट एकदम मोठी भारी ठोकर खावून सरकन पुढे सरकायचा. मग मला एकदम गचका बसायचा व मलां दाजीला सांगावं वाटायचं की मी जात नाही म्हणून. पण नाही कसं म्हणणार ? कारण मी होतो ना हुकमाचा तावेदार. जणू काय वतनदार वलुतेदार. त्याला सारेच हक्क. फक्त हक्क नाही, नाही होय म्हणण्याचा. दाजी दुसऱ्याचा गुलाम तर मी त्याचा. पर्यायाने मी गुलामाचा गुलाम. हेच तर काय म्हणता येईल तसं वागण्याला.

हे झालं मी दाजी व उंटाचं परंतु मी आता सांगतो थोडं फार उंट व माझ्या सहवासाचं व त्याच्या सवयी खोडी संबंधी व त्याच्याशी संवाद करते-वेळेसचे वापरायचे शब्द, त्याला असलेले आयब– बट्टा किंवा रोग त्यापैकी काही जन्मताच तर कांही नंतरचे. जसं ईतरात घडते नतर हळू हळू जशी जशी ताकद कमी होते तशी.

तसं गायी म्हशी व कमीजास्त बैलं वळून मला माहित व्हतं व त्यातील कोणालाही जरासं का व्हईना जवळ केलं किंवा जीव लावल्यारखं वाटलं की ते अगदी जवळ येयाचे व तोंड किंवा जवडा अगदि मयेखातर आपल्या हाताकडे करावचे व जिभीने आपल्या अंगास चाटायचे. अर्थात माणसाचे शरीर जास्त खारट असते म्हणून ती चाटत असतील. परंतु शेवटी अर्थ एकच होतो की खारट म्हणजे प्रेमळ व सत्त्व व जिव्हाळा असलेले. पण माझ्याएवढ्या दांडग्या सहवासात उंटाने कधी मला काही केल्याचे आठवत नाही.

उंट हा फार रागीट प्राणी व मोठा खुनशी वृत्तीचा. जसा अेखादा खुनशी माणूस जे मनात असेल ते न दाखवता हळूच मनात सलणाऱ्या गोष्टीचा काटा काढतो तसाच उंट पण काढणार. अगदि वेळ काळ आडरान गाठून. म्हणून मी सहसा अेकदा दाजीन वर वसवून हातात नकेल दिली की मग सारा दिवस पोरायसंग जिकडे नेले तिकडे उंट नेयाचो व दिवसभर तहान लागली तरी खाली उतरायचो नाही. पाणी पिण्याला मग ते पोरच कधी कधी दुरण लावून मला पाणी वर देतासत. मला जरास जास्त भेव वाटायच कारण म्हणजे मी लिव्हणारा पोरगा व मध्येच कांही झाल तर मग दाजी म्हणेल की दे शाळा सोडून व लाग मज्याबर उंट राकायला म्हणून भी लईकरुन भितसे.

उंट तसे सहसा आनव्रोकन असल्यामुळे बरेचसे मस्तीवान, माजलेले व कितीही वज त्याच्या पाठीवर लादले तरी त्याच्यातली मस्ती जिरत नसते. हिवाळचाच्या तोंडापातून ते माळेगांवची जत्रा व्हईजतूर सारखी बडबड (तोंडातून फेसाचा बुडबुडा काढणे) व पटपट (मुतून त्याला शेपूट मारते.) चालते, बऱ्याच वेळेला अन्न सोडूनच देतो. खाली पाणी मातर पित रहातो. व पाणीही दिले नाही तरी चालते. पण आंदरून सारखी गरमीची मस्ती असल्यामुळे तो पाणी पितो. तशावेळी तो सारखे दांत करकर खात रहातो व त्याला कुणाला तरी चावून फोडून टाकावे वाटते. कुणास ठावूक त्याला जरा ऑऊटलेट मिळून त्याचे कँथारसीस झाल्यासारखे वाटतासेल. बहुतेक तसाच तो प्रकार. तो सारखा रागाने तुंबलेला असतो. म्हणून त्याला मुंगस घालतात व पाणी पितेवेळेस व चारा खातेवेळेस तात्पुरते ते मुंगस काढतात. जमेल तिथं तो मुंगस आपटून शेपूट मारून राग व्यक्त करतो. त्या मोसमात तर तो अगदी बारीक होवून जातो. परंतु तो कशालाही शिवत नाही. त्याच्या मानेच्या मागील गड्ड्यातून सारखं वंगणासारखी तेलकट मस्ती पाझरत असते. ह्याचा अर्थ असाच की त्याला कुठंच ऑऊटलेट नसल्यामुळे त्याच्यातील मस्ती सारीकून बाहेर पडते. मग थोडी थोडी त्याची जिरते जशी ईतरांची जिरते.

उंटवाल्याजवळ साधारणत: अेक वेळूची काठी, उंटाचे व त्याचे लाचकन, अेक पोत्याची पिशवी व त्यात अेक जरमलची परात व लोटा व आयडीनची अेखादी कुपी व उंटाला पाणी पिण्यासाठी अेखादी बादली ह्या वस्तू असतात.

मी सहसा रोज उंटाच्या जवळच झाडून लोटू करून लेंड्या भरून उकिरड्यावर टाकायचो पण कधी कधी उंटाच्या पायाखाली व पोटाकडे लेंड्या गेलेल्या रहायच्या तर ते धेत नव्हतो व उंट ईकडं तिकडं हलला किंवा उठून आजुबाजूला झाला की मग भीत भीतच ते झाडून घेयाचो व दाजी काही म्हणू नये म्हणून सोचे ठेवायचो.

माळेगांवला गेले अन दाजी उंटाच्या सौदेबाजीत गुंगले की मग आम्ही सारे पोरं गावांकडून आणलेल्या रोटचांचे झालेले शिळे वाळलेखनिक असे कुटके घेवून सागोतीच्या व्हटलात घुसायचो व पाण्याच्या वासानेवासाने टोबून खायचो. खूप मजा वाटायची कारण येरवी खेडचात तसे व्हटेल तर नसते व असला बी तर मध्ये कोणी येवू देत नाही म्हणून दाजीच्या शिव्या खावूनही व्हटलात खायाला जायाचो. व्हटेल तरी चांगले थोडेच असायचे. ते फक्त वाटायचे कुठं तरी बारदाणे लावलेले

उंटाला अनेक रोग–आयब–बट्टे (खोडी) असतात. त्यापैकी कांही

ठळक असे. पोटाखाली भली मोठी वीट असते व तिच्या सहायाने राग येवून माणसाला खाली पाडून रगडायचे काम करतो व तिची थोडी फार बाजू वाढलेली असते. तिला रापा असे म्हणतात व त्याच्या बाजुलाच पुढच्या पायाच्या बगलेत थोड कमी जास्त झोळ झोळ कातड झालेलं असत. त्याचा रंग काळसर तांबूस असतो. त्याला घशी म्हणतात व बसते वेळेस बरेच उंट थरथर करून बसतात. परंतु जे उंट अतिशय जास्त थरथर करून जरा धन्याने मारले की आरडून ओरडून खूप वेळाने तोंड जमिनीवर टेकून आपटून बसतात. त्याला कंबरी म्हणतात. कंबरीमुळे कसलाही चांगला दिसणारा उंट लोकांच्या मनातून उतरतो. या साऱ्या आयबात रापा जास्त महत्त्वाचा म्हणजे कमी किंमत करणारा व नंतर घशी व नंतर कंबरी असा ह्या आयबांचा साधारणतः नंबर लागेल.

उंट राकतेवेळेस वापरण्याचे काही कोडवर्ड खालीलप्रमाणे असतात.— उंट चालत असताना पुढे किंवा तळव्याखाली काही दगड वगैरे येतासेल तर ठोकर बेटा म्हणायचे. बाजुआजूला झाडझुडूप असेल तर धक्का बेटा म्हणायचे व बगल दे बेटाही म्हणायचे. घसरती वाट असेल व जास्त स्लोप असेल तर दमसे बेटा किंवा संबालके बेटा म्हणायचे. जरा रस्ता पाऊल वाट असेल तर व बाजूला गेला असता रस्ता ले बेटा. रस्ता चालता चालता एकदम छोटासा खड्डा आला तर गोची ले बेटा व झाडाच्या जवळ पाल्यासाठी नेयाचे असेल तर भिड बेटा व झाडापासून मागे करायचे असेल तर पिछे हाट बेटा म्हणायचे.

उंट अनेक प्रकारचे पाले खातो. बाभळीचा पाला, बोरीचा पाला, टाकळीचा पाला, चिंचेचा पाला, शेंगा, हिवराचा पाला, खैराचा पाल, कारीचा पाला, चारीचा पाला, नागफण्याचा पाला, भुईमुगाचे वेल, मुगाचे वेल, उडदाचे व मुगीचे वेल, आवाऱ्याचा वेल, निवडंग, शेरी, येरमुणाचा वेल, मव्हाचा पाला, वागाटचाचा वेल, आंब्याचा पाला, पिवळणीचा वेल, पिचोंडीचा वेल, गोण्णीचा पाला, सागाचा पाला, घावंडचाचा पाला, नाय, तुरीची किंवा भुईमुगाची गुळी, जेवढं म्हणून काटेरी व कडू असेल ते उंट खातो व कसलेही काटेरी झाडझूड फराफर वरपून कांटचासहीत खातो.

कधी कधी खुराक म्हणून सरकी व पेंडही उंटाला देतात. त्यामुळे त्याची लेंडी ईतकी गच्च व निबर होते व वाळल्यानंतर तर फुटतच नाही. चुलीत व वतलात जाळायला लई चांगली असते. एक तर विस्तू जास्त वेळ रहातो व त्या वासाने चिरट वगैरे निघून जातात. बाळांतणीच्या बाजखाली

शेगडी तर फारच चांगली होते. उंटाच्या लेंड्यांची अतिशय गरम व उबदार बराच वेळ उब येते. बरबडा, कुरूड व पातर ही त्याची आवडती खाद्य.

त्याचे मुख्य खाद्य म्हणजे लिंबाचा पाला. ईतरखाद्य चव बदलावे म्हणून खाल्यासारखे. म्हणून उंटाला सहसा रोग होत नाही. त्याला उन्हाळचात सहसा गांवाबाहेरील झाडाखाली बांधतात व पावसाळचात मातर कसलाच सहारा नसतो. चळकधार पावसात तो बाहेर रहातो. फक्त त्याच्यावरील कजाबा किंवा काठी कोरडचा जागी ठेवतात. कजावा अगदि मजबूत करतात व त्यावर सलिता लावतात व त्यात लिंबाचा पाला दररोज टच भरून आणतात.

उट साधारणतः बैलगाडीच्या अर्धवज व माणूस त्यावर व सलित्यात पाला गच्च भरून न कचरता नेतो. तसं त्याला काहीच व्हत नाही. फक्त चार-सहा महिन्यांनी त्याला शेरभर किंवा दोनशेर तूप, शेंदीलोण, आंबेहळद व व तुरटी सारं मिळून दिलं पायजे. तसा दुसरा काहीच खर्च नाही. पावसाळचात मातर उंटाला फार जपून हाणावे लागते नसता झडीत जर पाय घसरला की मग ताकद असणारा जरा सावरतो. नसता जरा बिनताकतीचा किंवा डंगरा तर जिथे पडला तिथच पाय खोरून मरतो. कारण घसरल्यावर पाय ईतके दूर जातात की ताकतीशिवाय जवळ येणे मोठे मुस्कील.

नांदेड जिल्ह्यातील माळेगांवला दरवर्षी खंडोबाची जत्रा भरतासते. ती रानसुटचाच्या वेळेस. त्या जत्रेला हवसे, नवसे व गवसे जातात असे लोक म्हणतात व ती जत्रा खास करून खंडोबाचे भक्त असणारे वाघ्या व मुरळचा यांची पण आता तिथं लुबाडणारे चोर खिसेकापूच जास्त दिसतात येताना.

तिथे देवाची स्वारी निघते व एकीकडे गाढवं, घोडे व उंटाची रेस चालते. दुसरीकडे चांगले बल, गायी ईनामासाठी असतात. ईकडे वारूं भंडार उधळत म्हणतात ' माळेगांव मांळावरी तिथं नांदतो मल्हारी, ' वाघ्या मुरळी नाचती जिभंग कवडचा वेचती.'

असे भाळेगांव गजबजलेले असते साऱ्यासाऱ्यांनी. उंटाला पाणी पाजते वेळेस ले बेटा ले म्हणून तुब्र तुब्र, त्बुर त्बुर (म्हणायचे ते लिहीता येत नाही)– म्हणावे लागते व त्या वेळेस पाण्यात थोडे फार मीठ टाकावे म्हणजे तो जास्त पण थांबून थांबून घागरी दोन घागरी एका दमानिशी फस्त करतो. असा हा अजास्त्र, अगडबंब व रागीट माजोरी व जमेल तिथे चावा घेणारा प्राणी–उंट तरी रात्री इतरी व एकटदुककटं उंटवाल्याला आडरानात गांठून बऱ्याच वेळा

उंटला लोक लुटतात व उंटवाल्याला बोंबल्याशिवाय व दाब दिला कीत्याला व उंटाला गप्प करण्याशिवाय मार्गच उरत नाही. उंट फायला की न्हनगे लेकरं म्हणायचे 'उंटाच्या पायाखाली वाटी, वरल्या बावाची ताटी. उंटाच्या पायाखाली सुपारी, वरला बावा भिकारी,

उंट तसा वालुकामय प्रदेशातील प्राणी. त्यांचा वापर ओझे वहाण्यासाठी. विशेषतः ईतर साधणे नसल्यामुळे करतात. उंटाचा नि माझा ईतका जवळचा संबंध आलता परंतु ईतर जनावरासारखे आम्ही जवळ कधीच आलो नाही. हे मला अजूनही आठवते व मनात तिच भिती अजूनही घर करुन है.

कुपाटी

मी व्हतो चवतींत चेऱ्याच्या साळेत. तवा व्हते गीरराव मास्तर शिकवायला. ते व्हते जरा ठेंगू बांध्याचे. त्यांनी सांगितलं की, पोरहो । जरा लाकडं घेऊन या बरं. आमी गेलो. मी नि दाजीचा राम. गेलो भावकीच्या शेताजवळ. तितं व्हती कुपाटी. चांगली लावलेली. माजा जीव धजंना. पन राम जरा तापडच व्हता. त्यानं उपसलं एक फरळ, त्या कुपाचं. ते कूप व्हतं पोलीस पाटलाचं. पन व्हतं केलं शेत कोळ्याच्या शामराव जमादारानं. तितं व्हता त्यांचा ल्योक. त्याचं नांव गनेशा. भयंकर तापड व खराब पोरगा, त्यानं फायलं की आलाच तो कातावून आमच्यावर. आमाला सुटलं कापरं. गणेशानं जे आमाला तंग केलं. काई केल्या जाऊ देईचना. तो मोटा व्हता. आमी व्हतो लहान व सापडलो गुंन्ह्यात. आनखी म्हंजे आमी म्हाराचे पोरं. त्यात मी परदेशी. त्याला जरा पअुर आला. आमाला न्हेलं त्यानं. एका पडक्या हिरीवर त्यानं जे त्यातलं वंगळ पानी आमच्या अंगावर टाकायला सुरू केलं की तोबाहल. तो जाऊच देना. आमाला वाकायला लावलं. व पाटींवर थंडगार पानी ओतुलाला. काकडून हुडहूड भरली. कारण हिवाळ्याचे व्हते ते दिवस. मी जे रडू लागलो. आवरंना गेलं रडू. अण्णा, अण्णा म्हणून ओरडू लागलो. त्यानं सोडलं. आमी गेलो घरी. पन मास्तर काय म्हनील की म्हणून जरा भीवच वाटत व्हतं. मास्तरला सगळं सांगलं. तो बसला बिचारा. काय बी न म्हनता.

झालं काय एकदा. तर मी गेलो व्हतो बिबाडीत. वांजखाडच्याच्या रानात. बिबे आनावं म्हणूण लई मिळाले बिबे. आलो घेऊन कुंचीत. खूप लाल हिल्ल्याळ व्हते काई. मला लागली व्हती भुक लई. आलो चेऱ्याच्या रानात. व्हत एक वावर शेंगाचं. डोकळ्याचा पुंडलीत पाटील व्हता त्याचा मालक. वावरात कायबी नव्हतं. दोनदा शेंगा काडून न्हेल्या व्हत्या व नंतर कुळव घरला व्हताजुन. जरा दोन शेंगा मला दिसल्या. मी वंगळ मन करून त्याला हात लावलो. खाल्लोही नाही तर आली परयागबाई शेताची मालकीन, आली ती

चवताळून मज्या अंगावर. कारन शेंगाचं निमित्त सापडलं तिला. पन लाल हिल्ल्याळ बिबे तिला देखवंना गेले. व मजे बिबे तिनं उगच्या उगंच हिसकून घेतले. तितं व्हता मांगाचा गनू. त्यानं सारं फायलं व चू चू करू लागला व म्हणू-लाला की, 'आर। चल तिला पोरच न्हायत म्हनून तिला म्हारामांगाचे पोरं शिकल्याले बरं वाटत न्हाईत' ती बाई नुसते बिबे घेऊनच थांबली न्हाई तर 'परदिसे मांगा म्हाराचे' म्हनून शिव्या देऊ लाली. घरी आलो तर भईन रानात गेली व्हती. तसंच दिवसभर तळमळत रहावं लागलं. न्हायलो चुंबींत नाईलाज म्हणून कुनाच्याबी घराकडं टकमक बघायचो. पन कोण देत माज्यासारख्याला. आदीच म्हनायचे परदिस पडलंय ते पडलंय आन शाळा शिकालंय.

व्हता व्हता असं झालं की मी सोडली हडोळतीची शाळा व गेलो लातुरच्या शाळंत. सार्तीफिकीट मी चेऱ्याचाच म्हनून न्हलो व्हतो व चेऱ्याचा व्हेता तालुका अमहपूर. लोक त्याला राजूर वरवाळ म्हनायचे. लातुरला सरीक झालो. लागला नंबर बोर्डीगला बी पन जेवन काई भेटंनाच गेलं. असं कळलं की बोर्डीग १५–२० दिवसानं व्हईल सुरू म्हणून. मग कसं करावं काय नाही हेच ध्यानामनात येऊ लालं. मग नुसती शाळा कशी करावं वाटू लालं. मग मी हडोळतीचा मोतीराम व शिवराम जे लातुरवून पायी अंदारात, रातरी निगालो घराला जावं म्हनून. लई आंदार पडला. वाटंत भेटला चेऱ्याचा सखाराम पातरड. लई आट्टल चोर व्हता तो. मजी जरा होती वळक पन बोलू का नको वाटू लालं. तरी बोललो जरा. तो म्हनाला, 'अरं चला मोटारीत बसून. मी सांगतो डायवरला. पन आमचा विश्वास बसंना गेला. त्यानं गेला मोटारीनं मग आमी तसंच नीट सडकनं रातरबर चलत आलो. झीमझीम झड लागल्यावनी पानीबी व्हतं. लई भूक लागली व्हती. पन करावं काय. कोन देतंय तितं. जवळ जवळपाटाच्या सबोर आलो, शिरूर, ताजबंदला. मग आला जरा धीर वाटंनं गांव कुटुंबी जवळ लागायचंच नाही. जर लागलं तर वाटंवून लई दूर दिसायचं. शिरूरहुन गेलो हडोळतीला. मग मोतीरामच्या इतं हात पाय धिवलो. पन भाकरी बिकरीची काई पताच लागना गेला. मोतीराम बिचारा कटाळून फौजात गेलाय. मग मी तसंच चेऱ्याला गेलो तर सुमार व्हता ९–१० चा सकाळी. मग कुटं तितं आक्काच्या इत शिळं पाकं खाऊन जरा मावूर झालो. मग तेयला सारी कैफत दिलो.

ठरलं लगीन शिरीधर मास्तराचं लोक नवल करायचे त्याचं. चवदावी शिकलेला मास्तर लई मोटा म्हनून. लगन व्हतं राजूरच्या भावसाव वकीलाच्या इतं. मला वाटलं आपूनबी जावं गड्या. दत्ता मास्तरबी व्हते संग. मी गेलो

जेवाया मिळंल म्हनून. दिवस मावळला. गेलो राजूरला. झाल्या भेटी गाटी सरकारी दवाखान्याजवळ. मला वाटू लाल की सरत का नाही गड्या ह्या बामन लोकाचं मिनगळ. गेलो सगळे घरी. जरा केलो बैलाच्या पुढी चारा. बसल्या पंगती म्हारामांगाला दुर मोरीजवळ बसवलं. तिथं व्हतं खिडर. निट बसायना. पन बसले सारे. दुसरे म्हारेमांग जरा कामाचे म्हणून पवरतच बसले. मी दबतच बसलो. का काई वाडायचं व्हत. लगेच आला वळसंगीचा धोंडिबा व म्हणाला, ' अर चल, परल्या, चल जल्दी गाडी चालीया. नसता बग तुला कोनी घेनार न्हाई लातुरच्या बोर्डीगीत. ' नंतर मी म्हणू लालो, मजा नंबर लागलाय तो लईच म्हनाला. मजा जीव घजंना झाला. दोनीकडं जीव व्हता. अेक तर जेवनाकडं व दुसरा लातुरकडं. सारं सोडून तसंच ते बांदून घेऊन गेलो लातुरला. धोंडिबा जरा घडधाकट मोटा व्हता. केलं त्यानं सारं झालं जेवन सुरू.

व्हते एक नस वडनारे मास्तर. तेयच नाव सरदेशमुख. ते व्हते बोर्डींगचे संचालक. मी चेऱ्यावून जाताना नारायण माळच्याच्या मळ्यातून जरा चांगली बगुन लिबं न्हेली व्हती. ती मी तेयला दिलो. ते लई खुष झाले. पन देन्यादी मला वाटायचं कोन बगल तर गड्या. बगंल तर कोन काय म्हनील, पन दिलो एकदाचा वाटेवर. जरा लाजतच बरं का. ते म्हनले, ' अरं जा आजपासून घे जेवन. पन आता उशीर झालाय आतां काई उरल नसंल. तरी खा जा जे देतील ते. मिरची फिरची लई खाऊ नको. आता पावसाचे दिस हैत." असं ते गुरुजी म्हणले. मला लई चांगलं वाटलं. पयल्या वेळी नुसतं फक्की मिरचू मिळालं. तरी मला मनातल्या मनात लई चांगलं झालं गड्या. सादलं आता लई वाटू लालं.

असंच खाल्लो काई दिवस बोर्डीगीचं शाळंत जाऊं लालो. मला आठवी ' ड ' वर्गात सरीक केलं. तो म्हंजे नुसता अित्यास घेनाऱ्याचा वर्ग. त्याचे क्लासटिचर व्हते पाटील गुरूजी. तयचं नांव व्हत. तिरमुकराव. तयचं नांव ऐकून मला चेऱ्याच्या तिरमुबापूची घ्यान यायची. गुरूजी व्हते शिकवित अंकगणित. मजी लई हावस असायची की बाबा उच्चगणित घेव म्हनून. पन वाटायचं जमतं का नहाई बाबा. न्हाई जमल तर नाफास व्हवं लागल. मग शाळा सुटंल. मन घट करून चिंतकुटे गुरुजीला विचारलो. लोक सांगायचे की फार रागीट हैत म्हनून. व तेयनी गणिताच्या सुतराचं एक पुस्तकबी छापलई. तेयला लई भाव है म्हनायचे पोरं. मी विचारलो की, ' गुरुजी मला तुमच्या वर्गात घेता का ' तर ते मला ' नको ' किवा ' बरं ' म्हनन्या खेरीज म्हन्लाले. " पाय धू म्हटलं तर लोंबतय काय " येवढंच बोलून थांबले नाहीत. ' अर चल, चल तिकडं जा. कशाला विचारतोस. लई हुशार हाईस. गाडव कुठला. ' मी गप्पच बसलो. मी पुना तेहच्या वाटंला गेलोच नाही.

असं झालं हे शाळंच. पण आली आता बोर्डींगची पाळी. व्हते एक आपले पुडारी. तेयला लोक म्हणायचे सुरवशा वकील. तेयनी जे राजूरच्या पोरायला रागायला सुरू केलं. नुसतं रागवलंच नाही तर आमच्या पाठीमागे हात धिवून लागलं. व म्हणू लाले की, 'दुसऱ्या तालुक्याचे पोर इतं जगतात व आमच्या तालुक्याच्या पोरायला बोर्डींग मिळत नाही.' जिकडं तिकडं तोच प्रश्न झाला. आमी सारे राजूरचे जमून गेलो. हेडमास्तरच्या घरी. तेथचं नाव व्हतं अनुरूल्लासाब. ते व्हते म्हतारे. तेथचा एक पोरगा आमच्याबर शिकत व्हता. तो एका हातानं खुळा व्हता. तेयला आमाला फावून दया आली पन म्हनू लाले. 'मुझे तो य बात सूरवसेसाब की ठीक नहीं लगती लेकीन देखो तुमारे लिडर है वो तो सुनो क्या करते तो.' आमी आलो बोर्डींगीत. इकडे उदगीरचे पोरं मजेत व्हते. मला वाटायचं की मी बी पण उदगीरचाच का सांगलो नाही गड्या. पण मज्याजवळ अमदपूर तालुक्याचा म्हणून सर्टिफिकट व्हत. कसा सांगू मी उदगीरचा म्हनून वाटू लालं. उदगीरला तवा बोर्डींग नव्हती व राजूरला बंद पडलेली पुना सुरू झाली व्हती. दोन महिन्यानंतर आमाला चळकधार पाण्यात सुरवसे वकिलानं बाहीर काडलं व राजूरचा रस्ता धरायला लावलं. आलो राजूरला. झाली तपासणी. कोण कोणत्या गावचा म्हणून. तसील कचेरीत बरं का ? कारण तसीलदार व्हते बोर्डींगचे सभासद. मजीबी पाळी आली. मी चेऱ्याचा सांगू का सुल्लाळीचा सांगू तर काय म्हनतील वाटू लालं. शेवटी सर्तिफिकट चेऱ्याचचं व्हतं. म्हनून मन घट्ट करून चेऱ्याचा म्हणून. पन मनात धुकुड पुकूड करीतच व्हतो. मज्या अगोदर तेयनी एका पोराला विचारलं की, 'कारं संबा, तू कोळेगावचा खरं का सांग. बरं तुझ्या पाटलाचं नाव काय ?' तर संबा व्हता अंतरवेलीचा–मोमीनाबाद तालुक्याचा. पन व्हता तो काळेगावला मामाच्या घरी. त्यानं भिवू लाला व तसंच सांगलं तेयना. मजा जीव घजंचना. तरी सांगलो. मला विचारले, 'कोण रे तू?' मी जातीनं ग्हार साहेब' मी म्हणालो, 'तुजा बाप काय करतोय ? तर मी म्हणालो, 'मजा बाप मेलाय साहेब' 'बरं सांग, तुज्या गावचे पाटील कोण ? मी लई दिस भइनीच्या गावी व्हतो म्हणून मला सगळ्याचे नाव माहीत व्हते. म्हनून मी बिनचूक सांगलो. पन वाटायचं बाबाजवळच्या गावचे पोरं सांगतील की हा चेऱ्याचा न्हवं. म्हनून पन कोनबी सांगलं न्हाई.

राजूरची बोर्डिगबी भेटली. खायला मिळू लालं. पण मी लई दडून कानाकोपऱ्यातच बसायचो, की बाबा कदी काय व्हतं की म्हनून. बोर्डिगीत व्हता शेषराव तलवारे. तो व्हता उदगीरचा व दुसरा व्हता भालकीचा. त्याचं नांव व्हतं रावण. तो व्हता जरा सगळ्यात मोटा. आमी त्याला 'रावणदादा'

म्हनायचो. तेयला दोगाला शिफारसीनं घेतलं व्हतं तितं. मला वाटायची आपुलकी. सगळं बोलायचो व वळकी पाळकी काडायचो. ते म्हणायचे,' तुमाला कसं काय म्हाईत गड्या ' मी म्हनायचो, ' वळख है जरा जरा '. मला सांगूच वाटत नव्हतं की मी सुल्लाळीचा म्हनून. कारण बोर्डिगीत मी चेऱ्याचा म्हनून लागलो व्हतो. असं हे सारं.

व्हते बोर्डिगीचे संचालक हडोळतीचे गवूळकर शामी. ते गेले व आले वडवळचे लक्ष्मीकांतराव. लई धिप्पाड मानूस गड्या. बगताच पोरं भियाचे. ड्रोक्यावरचे वरेच केस निगून गेलते तेयच्या. ते पान लई खायाचे व गानंबी म्हनायचे. कदी कदी येयाचे बोर्डिगीत संध्याकाळी. मी रोज शाळंत जायचो. कदी बुडवायचो नाही. शाळंतलं लिव्हनं पुसनं करायचो. मला गनित तितकं जमायचं नाही. इंग्रजी मातर जरा जमायच, मला लई जल्दी झोप येयाची.

एकदा आले लक्ष्मीकांतराव व फायलं तेयनी मला. जे मज्या थोबाडीत तेयनं लगावलं. मला बोलायलाच येयना झालं. बोलावं तर काय करतो की बाबा वाटू लागलं व तो रडू बी देईना झाला. म्हनाला, ' गप्प बैस पल्या, का देऊ अजून एक कानसुल्यात.' येवडा मोटा मानूस झापचा झाप व मी आटवीचा पोरगा व तेही नेमी रोगेला. सगळे पोरं चूं चूं करू लाले व म्हनाले की, ' गुरुजी परलादची इतकी इंग्रजी चांगली है की आवल मदतगार गणपतराव गुरुजीसुदा त्याच्यावर बेहद खुप हतं.' गणपतराव गुरुजीसुदा म्हनजे जरा इंग्रजीसाटी नवाजलेलेच मास्तर व्हतं बर. मजी तेवडी कळख नव्हती. मॅट्रिकीत गेल्यावर लई झाली, लक्ष्मीकांतराव बिचारे हिरमुसले झाले व म्हन्लाले ' कारे बाबा, तुला लई लागलं का. तू हुषार हैस म्हने ' मला मग जास्त रडू येऊलाल तवापासून बोर्डिगीचे मास्तर मला जवळ करू लागले. पण मी तेयची माया खरी धरायचोच नाही. ते व्हते सातवी पास पयलची. म्हणून मला थट्टेचानं म्हनायचे, अरं परलू मला इंग्रजी शिकवत जा. ' मी नुसता लाजायचो त्येयला समजलं की मला मायबाप नाहीत म्हणून. मग तर ते रोज म्हणायचे, ' उगचेंच जोरात मारलो बिचाऱ्या पल्याला. येरं बापु तुला सावनफिबन लागलं तर मागत जा ' असं ते हमेशा म्हणायचे. पण मज मनंच धजत नव्हतं. जसं म्हणतात ना ' दूध पोळल्यावर मानूस ताकवी फुकून पितो. ' तसंच मज झालं व्हतं.

बोर्डींगीतला सयपाकी बायाला मला मारल्यालं समजलं. तेयला लय हळहळ वाटूलाली मजी. कारण मी पोरं जेवले की सगळं झाडायचो. व हमेशा त्येयच्या संग भाजीपाला कापू लागायचो. दळणातले खडे वेचू लागायचो. म्हणून

मी तेयला लई आवडायचो. चू चू करूलाल्या बिचाऱ्या. मास्तराला शिव्या मनातच पुटपुट देऊ लाल्या. जोऱ्यात कसं म्हणतील. त्याबी नौकर बिचाऱ्या.

राजूरच्याच शाळेंत मला झाला कवूळ. तेबी भयंकर रूप झालं त्याचं. लोक म्हनायचे, अरं आता परलाद लई हळदीवनी पिवळचुटुक झालाय. व्हतोय का नाही की दुरूस्त पतपानी करूलालो. बोर्डीगीत कदी आळणी दाळ बिन फोडनीची ठिवायच्या तर कदीं ध्यान विसरून जायाच्या बाया. गंगामाय, काळुबाई (केशवची माय) व दुसरी व्हती जेमनाबाई. सगळ्या बाया मज्याकडं बघून बिचाऱ्या तुळतुळ करायच्या. काळूबाईचं कायबी चलत नव्हतं. जमनाबाईला पोरं बरं बघत नव्हते. गंगामाय जरा आरदकांडी व्हती व तिला बोर्डीगची माहिती व्हती. म्हणून पोरं जरा तिला मान देत व्हते तीच मला बीनतेलाची दाळ काडून ठिवायची मी हमेशा फोडनीपासून जरा दूर बसायचो. व साऱ्याचे जेवन झाल्यावर कुटतरी कोपऱ्यात बसून मुचूमुचू खायाचो. कारन घट्ट सपक दाळ बगून पोर मजी दाळ लुबाडून खायाला बगायचें.

मला नुसता कवूळच झाला नव्हता तर लागली व्हती खरजबी. सगळं अंग फिद फिद झाल व्हतं. लई करून हाताचे बोटं व सार ढुंगण भरून गेल व्हतं. नीट बसता येयाचच नाही. कवूळ झाला व्हता. तवा मी लई जपायचे. कारन मला भईन सांगायची की, कवूळ व्हवून–कामीनी झालती. व पांतरी व्हून पोटात उतरली व्हती. व तू मरता मरता वाचलास बाबा, लहानपनी म्हणून मला भीव वाटायच.

मी रोज बाकी नदीला जायाचो व आंगोळ करायचो व सकाळी पानीच पानी हमेशा रहायतं. मग मी भिजून येयाचो व दुसरे कपडे नसायचे. मग तेच पिळून तसेच वलेचिब, कदी कदी अंबट वले अंगात घालून शाळंत जायाचो. मला वाटायचं की बाबा वारं बी है थोडं, थोडी अंगातली गरमी. साऱ्यानं कापड वाळतील वाटायचं. पन भेगी वाळायचेच नाही कारन वरून झड व कपडे मजे मजेदार. कितीबी ठिगळ लावलेले. मी बेंचावर जाऊन बसायचो. थंडीवाऱ्यानं पडसं खोकलं व नंतर कवूळ कामिनी व्हयाची. नेहमीच बरं का.

वरी सांगल्यापरमानं झाला कवूळ. वा बी पडल्या. अंगावर कपड्यावर, मजा व कुडता व नयकल ठिगळाचे असल्यामुळे त्या दिसायच्याच नाहीत. नुसत्या बुळबुळ करायच्या. पनं करावं काय. बाहीर रानात जायाची व उनात कुडता काडून ठिवायचो. मग उनानं कुडत्यातील वा अंगावरल्याबी दिसायच्या. मी मारायचो कदी कदी. नखानं मारताना पिच करून उडायचं तर ते कदी कदी व्हटावर पडायचं. पण करनार काय नाईलाज व्हता माजा. मदीच लागली

खरज. सारं अंग नासून. शाळेत बेंचावर बसावं तर टीर चिकटतीया वाटायचं व उबं रहावं तर पोरं हासतील वाटायचं. नीट चलता बी येत नव्हतं. बरं लई जपुन कोनाला न कळू देता हलक हलकं चलायचो. बेंचवरून उठते वेळेस हलक इकडं तिकडं करून हळू उटायचो. नसता दुकाची खिपली जर निगाली तर लई दुकायचं. हमेशा खाजवावं वाटायचं व खाजवावं तर खिपली निगंल वाटायचं. कदी कदी तसं व्हायाचं. लई तरास व्हयाचा. एकदाच तीन रोग लागले मला. एक तर कवूळ दुसरा वा व तिसरा खरज. लई वाईट वाटायचं. नकानं खाजवून मळ साचायचा व पू काडायचो व त्याच हातानं बांबाळ, बांबाळ हात धुवल्यासारका करून जेवायचोबी. मग तो नकांतला मळ पोटात जायचा. त्या रोगानं मला लई सतावलं. काई केल्या जाईचना. मज्याभवती नुसत्या माशा गों गो करायच्या. जेवताना भाजीत पडायच्या. काढून टाकून तसंच खायचो. पण न खावं व फैकून देवं तर कुटली सपक दाळ मिळते. पुना. पोरं मला छि तू दूर दूर करायचे. कितीही साप रहायला गेलो तरी नुसता वास बाजूला घुमायचा कारण मला साबन माहीतच नव्हत. लोक सांगायचे पन मी धुयाचो नाही. एक तर पैसे नसायचे व असले कदी कुन चार दोन आने दिले तर व्हतील वाटायच कशालाबी कागदा बिगदाला.

एकदा व्हती महिनेवारी परीक्षा. व्हता सायन्सचा पेपर, व्हते नांदापूरकर गुरूजी शिकवायला. ठेंगणे पन गुटगुटीत व लई तिखट व्हते. त्याला सायन्स सगळं मुकपाट व्हतं. पन बी अेस. सी. आजून निगालेच नाहीत. १९४७ सालापासून बरंका. मी बेंचावर बसलो व्हतो. तर नयकंल चिटकंल त्याला म्हणन मी इकडं तिकडं जरा हलल्यासारकं केलो तर त्याला वाटल की हा कापी करतोय. म्हनून त्यानं मला जे डस्टर फेकून मारलं. ते मला लागलंच नाही. थेट गेलं ते पाटीच्या भितीपरयंत. है का नाही बाबा वेता मजी व कता त्या मास्तराची.

मी असा खरजेला तिस्टून गेलो की वाटू लालं कसं तरी करून ही बरी व्हवं पन कशी व्हईल मग मी दवाखान्यातून जरा औषीद आनलं व्हतं. मग व्हता तितं एक वळसंगीचा सोपान. त्याला जरा कमी व्हती खरज. त्यानं व मी ठरवलो व ते औषीध व त्यात जरा मीट घातलो व खोबऱ्याच्या तेलात कालविली व रात्री बराच आंदार पडल्यावर नगरपालिकेच्या वाचनालयाच्या जवळ जाऊन आंगावरचे सारे कापड काडून जे व्हईल ते व्हईल म्हनून जे साऱ्या आंगाला लावलो. सारी तगमग सुटली अंगात. अंगातून, खरजेतून पानी तोरंबासारक येऊ लालं. रडू आवरना गेलं. इतकी आग व्हत व्हती की पुसता

गत नाही. बराच वेळ नुसता रडत व उड्या मारत तसंच चुंबीत वसावं लागलं कारण खरज निट व्हवं येवढंच वाटत व्हतं. अुगंच कोन सुकासुकी तकलीब घियाला. मग जरा थंड झाल्यांवनी वाटंल. रातरीचे बारा एक वाजले. सार राजूर सामसूम झालं व्हेतं. पोलीस कचरीत घंटा वाजता व्हती व गस्तही पोलीस घालीत असायचे. आम.ला भिती वाटू लागली. रातरभर तगमग व्हतंच व्हती, तवापासून जे खरज गेली आनकी झाली नाही बरं.

कवळासाठी जिकडं तिकडं फिरलो पन कोनी काई चांगलं सांगायचंच नाही. कुनाचंबी ऐकायचो. मग मी रोज बोर्डींगीत भायाची मूळ उगाळून पियाचो. पण काई काई फरक पडना. म्हनून गेलो आजमसोड्याला. तितला बाबुराजबा मज्यासंग. त्याच्या घरी गेलो व सकाळी दावलं तितल्या माणसाला त्यानं गरम छत्रीच्या काडीनं जोरात डागलं. बरीच तगमग झाली. लई खोल जाई परंत त्यानं डागलं. हळदीच्या खोंबानवी डागलं. हिवाळ्याचे दिवस व्हते मग जे ते डागलेले वण चिडले घान पानी येयाचं त्याच्यातून लोक म्हनायचे त्याला औषीद बिवसीद लावसील बग, जाऊ दे पानी. मग त्याच्यावर कवळाचा रंग निगून जाईल.' मी ऐकायचो. पन काई नीट व्हईना.

मग आली दिवाळीची सुट्टी. आलो चेऱ्याला. आक्कानं बगलं, तिला मज सगळं बगून लई वाईट वाटलं. लोकांनी सांगितलं की 'बाबा तू येरंडीच्या पाल्याचा रस काडून गाईच्या दुदात पित जा म्हणून.' मग मी बरं म्हटलो. पन गाईचं दुद आनायचं कुटून. तर सावूबाईनं देयाचं कबूल केलं. बिचारीनं. जरा फरक पडला पन मला पतपानी करून इतके दिवस जाले व्हते की, आता करूनी वाटू लालं. म्हणून थोड्या शेंगा खाल्लो. व तेलकट भाजीबी खाल्लो. तर वेगळच झालं पुना.

शिकार

मी व्हतो आडबांगडा नि व्हतो रहात एका मळ्यात हमेशा. शाळा सुटली किंवा सुटी असली त्या मळ्यांत गेल्याबिना करमायचच नाही. मळ्याच्या भवती फेरी मारणे ढोरबिर लोकांचे कुपाटीला असतील हणाचो व पाटलाला येऊन सांगायचो. हे सगळं करण्यामागे हेतु मात्र येवढाच व्हता की त्यांनी मला जरा बर म्हणाव भाकरीबिकरी द्याव मळ्यात येऊ द्याव. कारण कुणाच्याही मळ्यात तसं कुणास सहज जाता येत नसे.

एक दिवस उजाडला. उजाडला तो जरा वेगळाच. वेगळा म्हणजे झालं काय तर तेथे व्हता एक कुत्रा. तो व्हता एका अेलमचा तिकडे त्या लोकांना कारभारी म्हणतात. तो इतका माजोरी नि हराम तो दिसताच माणसाची घबराट व्हायाची, त्याच्या धान्याच घर व्हतं बिलकूल वाटेवर नि तो सारखा वाटेवरच बसलेला असायचा. कदी बिदी नजर चुकीने तो मध्ये असला तर लोक गपकन वाट चालती व्हायचे. तिकडून न जाता घराच्या पाठीमागून हगनदरीनेच लोक नाकाला पदर लावून व पाय ढांगा टाकीत चालते व्हायचे. पदर लावून ढांगा टाकीत व्हते यासाठीच म्हटले आहे की तेव्हा कुठ व्हत्या आजच्या सारख्या ग्रामपंचायती देखरेख करायला रस्त्याची. सगळी पांदनच बुरटा चढल्यासारखी दिसायची व ढोरं पांदीणीन जाताच विशेषतः म्हसर्ड जाताच जिकडे तिकडे शितोडे पडून कितीही टांगा टाकल्या तरी मी म्हणणाऱ्याचाही पाय बरबटल्याशिवाय राहायाचा नाही नि सगळा रस्ता बुरसटल्यासारखा करण्याचं काम मातर उतीम लोकांच्या सोचे सोचे म्हणणाऱ्या व जादा बाहेर न जाणाऱ्या बायाच करायच्या बरका.

ज्या मळ्यात मी रहात व्हतो तो व्हता जरा गावाजवळच म्हंजे ईनामच म्हणा ना. थोडंस गांवकुसाबाहेर परंतु मालक माणसं मातर व्हती कुणब्याची. गावकुसाबाहेरची नव्हे. कुत्र्याच्या मालकाचे घर व मळ्यातलं अंतर फार कमी म्हणून तो कुत्रा सारखा मळ्यातच येयचा कारण त्याच्या मालकाचे

पण शेत जरा लागूनच व्हते. पण तो तिथे जास्त न रहाता मळ्यातच जास्त फिरायचा कारण मळ्याच्या भवती जरा झाडीबिडी व्हती व ससेबिसे निघण्याचे व कदीकदी बकऱ्या बिकऱ्याची पिले चरायला आल्यामुळे चुकून रहाण्याची दाट शक्यता असायची. त्या कुत्र्याचा सगळ्या गावाला दरारा व्हता. कारण तो माणसापासून ते ढोरा गुरं, म्हसाड व लहानसान बंटर, वासरं वा बकऱ्यांना सादलं की चावल्याशिवाय रहायचा नाही व लहानसहान शेळ्याची पिले तर नरडं सोडून मारूनच खायचा. सारे लोक त्याला कंटाळून गेले व्हते. तो भुंकायचा मातर कदी नाही. हळूच चटकन नजर चुकून व कदीकदी तसाच यायचा व माणसाला चावा घ्यायचा. येलमाला सांगितले तर येलम म्हणायचो, तुम्ही काही करा. मी त्याला मारणार नाही कारण मुकं जनावर ह. त्यानं काय पाप केलय असा तो येलम त्याचा मालक उतर देयाचा व तस उतर देयाचं मूळ कारण म्हणजे त्या मालकाचं घर होतं बिलकूल गावाच्या शेवटी. पांदणीलाच म्हणानां व जरा होता बी बरा. दारातच वळदबिळद भरलेले असायचे दाण्याचे.

एकदां काय झालं तर मी होतो मळ्यात, हमेशाप्रमाणे तो कुत्रा हमेशा मळ्यात येयाचा व सर्वांच्या भवती फिरायचा. मळेवाले जरा भाकरी–बिकरी व जरा खातवणी लोक असल्यामुळे मांस-बिस टाकायचे त्याला. तो जरा त्याच्यासाठी चावायची सवलत देत होता म्हणांना. तो माज्याजवळ पण कदीबिदी येयाचा. ते लोक म्हणायचे नको भिवू. तो काही करत नाही. पण मी आंतमधून घाबरायचो व वरून लोक जरा धीर देतात म्हणून वरवर न घाबरल्यासारखं करायचो. जरा न घाबरल्यासारखं मुखवटाच चढवायला बघायचो. पण माझा सबाबच मुळातच वर एक व आतून एक असा नव्हता व नाही. आत बाहेर एकच. जरा घाबरलो की त्या लोकांना कळायचे व ते मज्याजवळ येयाचे व कुत्रा वास घेतास्तानाच त्याला कसली तरी लालूच दाखवून थोडंफार लांब न्यायचे. मला जरा सुटका झाल्यासारखं वाटायचं पण कुत्रा मळ्यातून बाहेर गेल्याशिवाय मनाला धिरावाच यायचा नाही. कदी कदी तर असं व्हायचं की तो कुत्रा वाटतच दिसायचा व घबराट सुटायची व लोक सांगायचे म्हणून मी गपकन् खाली बलायचो कारण जमीनीवर खाली बसलं की कुत्रा चावत नसतो असं म्हणतात.

एक दिवस असा व्हता की त्या दिवशी त्या कुत्र्यानं तोंडात धरून बरचसं कांही तरी लोंबकळत आणल. तेही शेंगाच्या वावरात. शेंगाचं वावर शेंगा काढल्यावर मोकळफट झाल होत. मी जरा कुपाटाजवळ व्हतो. कुत्र्यानं तोंडात लोंबकळत आणलेले मला दिसल व माझ मन त्याच्यावर गेलं व तोंडाला सुटलं

पाणी. मला वाटलं की जमल तर जमलं म्हणून मी त्या कुत्र्याकडे जायला लागलो पण जवळ जायला मन धजत नव्हते. जरी मनांत सारख वाटत व्हतं की ते लोंबकळत असलेलं मला मिळावं म्हणून मो थोडा फार जवळ जायला धजलो कारण तो कुत्रा जरी महामोर चावका असला तरी आतापर्यंत तसा मला अनभव नव्हता. म्हणून मी त्याच्या जरास जवळ जावून म्हंजे कासरा दोन कासऱ्या वरून म्हणांना मी हाड हाड म्हणायला लागलो. पण धोंडा मारायची मजी कांही छाती व्हईना कारण जरा मनात वाटत व्हते की ते सगळ मांस मला मिळावं पण सारखी भिती वाटत होती ती त्या कुत्र्याची व त्याच्या चावण्याची.

एकदाचं कुत्र्याच्या जरा जवळ गेलो व हाड हाड म्हणू लालो तर कुत्रा गुरुगुरूलाला व थोडा फार रागात येवून मज्याकडे बघू लागला पण कांही केल्या त्याच्या तोंडातला मासांचा लोंबकळता तुकडा सोडना गेला. मला खूप वाटूलाल की आता शिकार सादतीया गडचा आपण घरी नेवून चांगले खांड करून मोकळसक करून खावू पण झालं निराळाच. तो मासाचा तुकडा म्हणजे बहुतेक सशाचा किंवा हरणाच्या लहान पिल्याचा असावा. तसं न्याहाळून जवळून पहाता आलं नाही मला. कारण कुत्रा जरा कासरा दोन कासरे दूरच होता. पण तो सश्याचा किंवा हरणाचा तुकडा नसून वासराचा फरा होता. मी भितच का होईना पण मन जरा घट्ट करून जरा कुत्र्याच्या जवळ गेलो व हाडर म्हणून एक धोंडा हिबाळला त्याच्याकडे तो गुर गुर करत जे आला तोच माझ्या आंगावर चवताळून, खासकून खिक्कसून पांढरे सिपठ सुळे दात पुढे काढून. माझी खूपच घाबरगुंडी झाली. तिथे सोडवायला बी कोणी नव्हतं. तो कुत्रा जे आंगावर आला तोच त्याने तीन चारदा माझ्या पायाला चावले व पाय फोडून काढला. रगत बंबाळ केलं. मी अगदी भितीनं चिंतातूर होवून खूपस रडलो. मी रडलेलं ऐकून येण्यास तिथं कोणीच नव्हतं. कुत्रा सारखा रागाने चिडून जावून माझ्याकडे धावू धावून यायचाच व मला त्याच्याशी सामना देण कठीण व्हायच. लोकांनी सांगितले होते की कितीही कुत्रा आरकट असला तरी तो चावतासताना जर का माणूस जमींनीवर खाली बसला किंवा निजला तर कुत्रा चावत नसतो. ते आठवून मी खाली बसलो. परंतु ते लोकाचे म्हणणे बहुतेक खोटे ठरले कारण बसण्या अगोदर दोन दांत मारले होते कुत्र्याने व बसल्यावरही आंगावू दातं मारले. थोड्या वेळानंतर मी गपचीप रडतासताना कुत्रा आपली शिकार घेऊन मज्याकडे बघत व गुरगुरतच जरा दूर निघून गेला. पण माझ्या पदरात मातर शिकार पडली ती त्या कुत्र्याच्या चावण्याची. म्हणजे त्या कुत्र्याने मारून आणलेली शिकार माझे मन त्यावर जावून तोंडास पाणी सुटले म्हणून मी ती मिळ-

विण्याचा ईरादा केलता पण ईरादा फसला व आला तो मज्याच मुळावर. त्या कुत्र्याची तीन सुळे दांत रुतलेली वर्ण अजूनही आहेत. दुरुस्त होण्यास बराच वेळ लागला कारण ती खोलवर गेली व्हती. एक गोष्ट व दुसरी गोष्ट म्हणजे डाव्या पायाच्या मांडीतच. मला नीट चालता येयाचं नाही, ती चावलेली जखम दुरूस्त व्हावी म्हणून लोकांनी सांगितले की त्या जखमेला बिबे लाव तर मी त्यानुसार काकुलतीने केले. लोकांचा हेतु कसा व्हता हे काही मला तेव्हां समजले नाही. दिवस थोडे फार रानसुटचाचे व्हते व थोडी फार थंडी व्हतीच व थंडीच्या दिवसात तर कोणतीही जखम जरा चिडतेच व त्यात बिबे लावल्या-वर जास्त चिडणार जनु काय दुधात साखर पडली. मग कांही लोकांनी सांगितले को तूं त्या जखमेला लिंबाची साल उगाळून लावत जा, मग ती जखम बरी व्हईल. ते ऐकण मी तसे केले. त्या लिंबाच्या सालीमुळे जखम जास्तच तिड-कायची व लई इंजा व्हायची पण करणार काय नाईलाज व्हता. काकलूत येवढीच व्हती की जखम बरी व्हावी. कांही दिवस गेल्यावर रान सुटचाचे दिवस सरून थंडी वसरून कडक ऊन पडू लागले व उनाच्या कडाक्याने ती जखम बरी होत चालली, व काही दिवसानंतर तर अगदी चांगली झाली. चांगली झाली याचा अर्थ म्हणजे दुरूस्त झाली तसं म्हंजे जखम चांगली झाली म्हणजे चांगली जास्त आठवण येण्याजोगी झाली. आता एक दोन वणं जरा मांस आल्यामुळे बुजल्यात पण दोन वणं आणखी बूड धरून आहेतच. मला हमेशा वाटते की ते कसे बुजतील. ते हमेशा रहातील आठवण करून देण्यासाठी. मला नेहमी वाटतं की शिकार मिळवावी म्हणून जर गेलो नसतो तर पुढचा पेच प्रसंग आला नसता पण म्हणतात ना होणारी ती काही केल्या टळणार नसते व जे जे व्हईल ते ते माणसाने बघितले पाहिजे त्याला टाळता येत नाही. मला नेहमी वाटत आलेलं आहे की शिकार करायला गेलो नि शिकार होवून आलो. मी कोंडलवाडीला गेलो नाही की चौदा इंजेक्सन्स घेतले नाहीत. तसाच बसलो चुंबीत नीट व्हईजेतूर.

O O

चेलमा

एकदा काय झालं तर मी चालतो एका बहिणीकडून दुसरीकडे म्हणजे अेकीच्या गावावरून दुसरीकडे. दोन्ही बहिणी सख्ख्या मावस जावा. त्यांचे गावही जवळच. अगदी शिवशेजारीच म्हणजे शिवभाऊच म्हणाना. खरं म्हणजे तिथं इतके गाव जवळ जवळ आहेत की पुसतागत नाही. कारण एका शिवावर जावं तर तिथं साऱ्याच आजुबाजुच्या गावची शिव सुरू होते. म्हणजे पाचसहा गावची माणसे शेताच्या किवा मजूर कामाच्या निमितानं रोजच भेटतात म्हटले तरी काही वावगं नाही.

मी लहानपणापासूनच म्हणजे मायबापाच्या परभारी मोठचा बहिणीकडे राहात असे. बिचारीची पारिस्थिची अगदीच हलाकीची तरी तिचा माझ्यावर लई जीव. कारण मी जरा वेळ दिसना गेलो की मट तिला हूरहूर वाटायचं. अधूनमधून खूप शिव्या हसडायची पण लगेच मयेनं जवळ करायची. तिच्याकडून मी लहान बहिणीच्याकडे जात होतो. तर झालं काय दिवाळी भावईचे दिवस होते. तिकडच्या जमिनी जरा माळरानाच्या असल्यामुळे लवकरच पीक पोटरा धरून निसवायला लागतात. तसाच मोसम होता. वाटेतच मला तहान लागली व तेथे मोठाली पिकं असल्यामुळे अेकटे जायला जरा भीतीच वाटत होती. रस्त्यावर होता एक थोडा फार गोल खोदलेला व बाहेरून दगडाचा गोल कठ्ठा करून घेतलेला खड्डा. त्यात उन्हाळचात जरी नसेल तरी पावसाळचात रानसुटचा लागेपर्यंत तरी पाणी असतंय. त्या खड्डयाला आमच्याकडे चेलमा म्हणतात. मला वाटले आता वाटेतच चेलमा है व पाणी बी काळभोर दिसतंय व उतीम लोक कोणीबी दिसत नाही तर पिऊन घ्याव पाणी व चालतं व्हावं. पुढे बऱ्याच अंतरावर पाणी होतं पण तितक्या लांब जाण्यापेक्षा इथंच प्यावं पाणी असं वाटू लागलं. कारण त्या चेलम्यात हमेशा कुणब्याचे माणसं तर पाणी पित नाहीत. पण त्यांचे ढोरंगुरं मातर जरूर पितात हे मी त्या रस्त्याने जातासताना व काही दिवस भावाच्याऐवजी जनावरं वळताना पाहिलं होतं. अर्थात मी ढोरं वळण्यासाठी नोकर नव्हतो असे मुळीच नाही. परंतु मी ती ढोरं वळण्याची चाकरी जलदीच सोडून देऊन शाळकरी मुलगा झालतो.

एकीकडे मन म्हणायचे की अरे पाणी पिऊन घे व चालता हो, कोण काय करणार वाटायचं मुशाफराला. पण दुसरीकडे असे वाटायचे की जर कोणी कुणब्या–फिणब्यानी फायलं तर उगोच बला येईल कारण खेड्यात लोक लई जलदी वळकतात कोण कोणत्या जातीचा है म्हणून.

मी मन धुकूड पुकूड करीत असतांनाही ओंजळीने पाणी पिवू लागलो तरच आजुबाजूनं झाडाझुडपाचा आवाज येऊ लाला. जसं म्हणतात नं चोराच्या मनात चांदणं पण मी थोडीच कुणाची चोरी करीत होतो. फक्त तहान लागली म्हणून पिढचानपिढचा रस्त्यावर असलेल्या रानातील चेलम्याचे पाणी पीत होतो.

तितक्यात आला एक झुपकेदार मिशावाला बारका माणूस. दिसायला मटा काटकुळा बारीक पण आवाज मटा भारी. व त्यातच भर म्हणजे तो पाटलाच्या भावकीचा व जरा जंतर मंतर करणेवाला. त्याला लोक तसे मटे टरकतात. मला तसं अनभाव नव्हता पण त्याच्या नावाची वर्दी होती. तो चेलम्यावर बैल घेऊन आला तरी मी चालता होत होतो कारण छाती धडधड करीत होती. कारण एक तर महार पोरगा व दुसरं तर परदिसा म्हणून जरा लवून चोपून राहायची सवय झालती. तो माणूस आला जवळ चेलम्याच्या व म्हणाला, अरं पोरा थांब जरा. चालास कुठे ' मी म्हणालो, ' मला गावाला जायचंय ' तर तो म्हणाला, ' अरं थांबना ' मी थोडं म्होरी गेलतो पण परत आलो. तर तो माणूस म्हणाला, अरं गाडीच्या तुला कळत नाही का हा चेलमा हमचा उत्तीम लोकाचा है म्हणून ' मी गप्पच झालो कारण बोलावं तर एक तर तो जास्त बोलायला लागला. गनिमत त्यानं मला मारलं फिरलं नाही कारण त्याला माहित होतं मी एक परदिसा पोरगा है व लईच मर्जीनं गावात रहातोव म्हणून. त्यानं म्हटलं, हे बघ. आता खबरदार असं पाणी पियाचं नाही. कदी आलाच तर ह्या वाटेनं. नाही तर पाय देऊन चिरून टाकीन. बेटचा मी म्हणालो, ' नाहीजी बापू आता करणार नाही. मी असं कधीच करीत नाही परंतु लईच तहान लागली होती म्हणून पिलो. नसता पिलो नसतो त्याच्या रागीट टवकारणाऱ्या डोळ्याकडे बघूनच मी घाबरलो. तो म्हणाला ' जार आता. पण आता येशील कधी तर याद राख सजना. ' मी नाही नाही म्हणून बहिणीच्या गावाकडे निघालो. अर्थात मला खूप वाटले की एका बहिणीचं घर मागे तर दुसरीचं म्होरी. तेही खूप लांबवर व ह्या शिवंवर आडरानात. त्यानं जर मला मारल असतं. तर कोण असतं तिथं मजा जीव वाचवायला. त्या माणसाने माझ्या देखतच पाच ओंजळी पाणी फेकून दिले व घागरीने पाणी काढून बैलाला पाजले. मी तसाच दचकत दचकत बहिणीचे गाव गाठले. नि बेंधडक बहिणीच्या घराकडे न जाता भीतीच्या पोटी बसलो

समोरच्या मऱ्याईच्या देवळात. कारण एकदम जायला मन कधीच धजत नव्हते कारण तिचा नवरा म्हणजे मजा दाजी मटा गमतीदार नि मटा डोळे वटारायचा म्हणून त्याच्या भीतीनं हमेशाच मऱ्याईच्या देवळात बसतासे तसाच आताही बसलो. एकदा देवळात गेलो की, मऱ्याईचे देऊळ साफसूफ केल्याशिवाय मला करमायचे नाही. मी ते देऊळ साफसूफ करून बसलो.

तिथं खूप लहान-लहान पोरं-पोरी खेळायच्या. घरी जाताना कोणी तरी बहिणीला सांगायचे की, 'काकू काकू परलादमामा आलाय.' काकू म्हणायचे कारण. म्हणजे मजी बहिण तितल्या सर्व भावकीत लहान भावाची बायको. सगळ्यात लहान चुलता पडतासलेल्या माणसाच्या बायकोला लई करून काकु किंवा ताई म्हणतात. तसं गल्लीतले सारे लहान पोरं मज्या बहिणीला काकू म्हणायचे. जसा हमेशा घडायचा प्रकार तसाच घडला आताबी. तर झालं काय तर दोनचार पोरं मऱ्याईच्या देवळात खेळून झाल्यावर ज्याच्या त्याच्या घरी निघून गेले व वाटेतच बहिणीला सांगितले की, 'आये काकू तुझा धाकटा भाऊ आलाय. आये खरच आलाय परलादमामा. मरूमायची शपत,' कदीकदी बहिणीला खरंच वाटायचं नाही. जरा बहिणीला येण्यास उशीर झाला की मी तिच्या वाटेकडेच हूरहूर नजर लावून टकमक बघत असे. एकदाची आली बाई व तिनं मला फायलं व मी फायलो नेहमीप्रमाणे. म्हणाली, 'आरं बापू का बसलास इथं. घरी 'चलमा' म्हणत मला नेहमीप्रमाणे म्हणालो. तिला मला फायल्यावर आंदरून खुप मया वाटायची पण तिला तिच्या नवऱ्याचा व जरा करड्या नजरेनं बघणाऱ्या म्हाताऱ्या सासऱ्याचे भीव वाटायचं. तरी मज्यासाठी तिचा जीव तुळतुळ तुटायचा. ती पुढेपुढे मी आंधळ्यासारखा तिकडं बघत खाली मुंडी घालून तिच्या घरी गेलो. हमेशासारखा एका कोपऱ्यात दडून बसलो. दाजी घरी नसला तर थोडसं मन मोकळं वाटायचं व आलारं माय घरी की मजा जीव धुकुड पुकूड करायचा. कारण मला तर बोलेलच पण बिचाऱ्या भोळ्या गरीब बहिणीस बोलेल वाटायचं व मला वाईट वाटतंय म्हणून तो कधी मजी कदर न करता बहिणीला खूप बोलायचा मज्या देखत. बहीण बिचारी खूप डोळे पुसत रडायची. व तसेच त्याने दाब दिल्यावर काम करायची. तसंच झालं आताबी. मला वाटले तहान लागल्यावर चेलम्यावर पाणी पिण्याला गेलो तर तसं व बहिणीने 'चलमा' म्हणून घरी आणल्यावर असं व राहून राहून वाटू लालं की आपल्यात आणि तुपल्यात काही फरक नाही गडचा. असा घडला तो प्रकार त्या चेलम्याचे पाणी पिण्याचा व बहिणीच्या 'चलमा' म्हणण्याचा.

○ ○

आठवणींचे पक्षी

असं झालं ते. मी होतो गावाहून दूर. दूर म्हणजे वहिणीच्या घरी. म्हणजे घरी नसून दारीच म्हणाना थोडक्यांत. मी लहान पण, कुणाचेही काम करायचो. जो तो मला सांगाचा असे होता होता आला एक दिवस. मला दाजीनं उंट राखण्यास रानांत पाठविलं. लहान मी व जनावर भले मोठे. माझे डोळे गरागर फिरू लागले. पण नाईलाजाला बेईलाज म्हणतात त्याप्रमाणे मला जाव लागलं रानांत. गेलो काटेऱ्या वनात. उंट शिरला आरपारांत. अेका वागाटचाच्या जाळीत त्यानं मुंडी खुपसली तर तो काही काढीचना. मी वरेच ओरडलो ' हट पिच्छे, हट पिच्छे, ले वेटा ले ' नकेल वरीच लांब होती. थोडी ढिली करावी व नंतर ओढावी. तर मग झाले काय ? तो उंट रागावला व माझा आवाज पोराचा वळखून मध्येच असा घुसला की सारे काटे माझ्या अंगाला बोकरल्यासारखे फरफटत गेले. मी ओरडलो. पण तेथे दाद कोणाला ? मला कसे तरी वाटले. आता निघाला उंट तर बरे नसता त्या आडरानांत दाद ना फिकीर. माझा दरवेश तसा होता, की आधीच फाटका व झिरझिर (मलमलीचा नव्हे तर जुनापाना बामणाच्या मैना माईने दिलेला. कारण तिथं मी होतो शेण काढीत वहिणीच्या वारचं, जुनेपाने जे ते देण्याचे तेच माझे लेण्याचे व जे काई थोडेसे शिळे तर थोडेसे कदी ताजे देयाचे. तेथेय कदी मुचमुचू खायचो, तर कदी अक्काच्या घरी घेऊन जायचो. तोंड धुवीपर्यंत तिचे बारके लेकरं खायला सुरवात करायचे मी बांवळ वांवळ तोंड धुवायचो व तसाच गटागटागट जे उरलेले ते गिळायला लागायचो.) त्यामुळे तो फाटला व रडू आलं की मला जलदी कोणबी घेऊन देत नाही की मैनामाय बी देत नाही. मग करावं कसं ?

असाच मी लहानचा मोठा होत चाललो. लोक चैनीत तर मी बेचैनीत. लोक मजेत तर मी सजेत लोक महडचा हवेल्यात तर मी दसकटाच्या, पळाटचाच्या वावरात. मला वाटायच वाईट, पण करावं काय, नाईलाज. जिकडे तिकडे दुःखच दुःख दिसायचं. मग कदी कदी झाडाखाली बसायचो व आतून

हंबरडा फोडायचो व वाटायचं की सगळेच लोक मजेत नाहीत. माझ्या सारखेही असतील कांही, पण तवा कुठला हा विचार. हमेशा वाटायचे की आपण थोडेसे भजन तरी करावं. मग थोडसं समाधान होई. मग म्हणायचो कदी तुकाराम तर कदी कबीर. कदी भारूड, तर कदी कलगीतुरा. सगळं गाणं कुठलई येयाचं नाही पण अुगीच तेवढी करमणूक व्होयाचा, व रात्री गावातील अुतीम लोकाच्या भजनास जायाचो व दूरच्यादूर न्हानी नसता मुत्रीजवळ बसायचो व भजन ऐकायचो व म्हणायचोही तेवढाच आनंद वाटायचा. कारण ते मला कदी वुका तर कदी खिरापत तर कदी शिरणी, नारोळ, तर कदी गूळ बीळ देयाचे. मी त्याच्यात खुष. माझी लई हावस असायची की मला बी मृदुंग व टाळ वाजवयला यावं पण कोण देईल मला. मी आछुत होतो. मी सगळं ऐकायचो व तोंडानेच मधल्या मधी करायला शिकायचो. नतर नंतर मी जवा आंबे राकायचो (हे सगळं शिकतासताना बरका) तेव्हां तोंडाने वाजवायचो व टिरीवर वडवायचो.

असच चालला माझा कार्यक्रम कोणी म्हणायचे की आता लई शिकलाय. लई पाटील व्हणार हे. पण जास्त करून मी लावूनच घेऊन राहायाचो. कदी कोणासंग मारामारी केली नाही. कुणी मारलं तरी कुणास सांगितलो नाही. सांगावं तर उद्या त्याच्याकडं काम पडणारच वाटायचं म्हणून लोक कदी कदी म्हणायचे जाऊ द्यारं परदेशी हे बिचारं, वनवासी. त्या गंगाबाईच्या महाराच्या भावाचं पोरग हाय. लई गुणाचं बिचारं. तसं गुण असतात बिचाऱ्याला. कुणाच्याही पोटात शिरून खातो. असे काई लोक तर काई म्हणायचे, ' लई आता उताना व्हयालाय शिकून.' ' आता महाराचं राज आलय. शिकायलाय म्हणून आमच्या वरोबरीचा झालाय का,' ' दुदग्या निघ निघ तिकडं.' ' अदिला पदी घु बडाला गादी. ' हे बघा. असं काई बाया म्हणायच्या. असं सांगायला बसलं तर लई इत्यास हाय पण सांगतो. एक घटका काय झालं ते. मला बरका

मी होतो लहान पण बहीण म्हणायची ' जा की र बाबा. कुटके व्हतील सांजला व तुझ्या न्याहारीलाही. जा बाबा.' दुसऱ्या पोरांच बघून मला कदी कदी नगं म्हणावं वाटायचं. पण बहीण म्हणायची ' खातूस आळगीला नि लोळतूस मळगोला.' त्याला दुसऱ्या नावाने खातूस कणगीला व गातूस इरल्याला; असही खेडचात हामच्या म्हणतात बगा.

मी नेमी जायाचो रोटी मागायला (बहीणीच्या भावकीची कोणाचीही पाळी असली की) पण संगं माझ्या कदी कदी आत रहायाची. कारण धनगर-

वाड्यात इतके माजलेले कुत्रे राहायचे की लई बदमास. ते भुकून मज्यावर पडायचे म्हणून मी त्या वाड्यात जातच नसे. पण दुसऱ्या पाटलाच्या चोपवरुन खाली खुळखुळ्याची काटी वाजवायचो. नाही जर वाजली तर मग बिघडलं. मग भीव वाटायचं. तसं असतानाही रोटी मागताना आवाज जोरात करावा लागायचा. कारण एक व्हती बाई. जरा आदरकांडी. तिचं नाव शावूबाई. ती म्हणायची की, "जोरात म्हण भाड्या. काय खालाच का नाही. आमचे पयलचे म्हार व्हते तर ते 'इयार' येवढ्या जोरात टाकीत की सुताराच्या माळाला घुमे तो. मग आता काय झालय रं तुला दुदग्या, चांगला आता जरा जेवान व्हयालाईच थोडा थोडा. मग म्हण पुना." मी म्हणायचो "इयार मायबाप रोटी वाडाजी" "जी" लांबून घेत जा जरा. लहान हैस जरा, जमेल पुडे पुडं आशी ती बिचारी म्हणायची. मला जरा बरं वाटायचं.

एकदा झालं काय. मी असा गेलो रोटी मागायला. एका वरटच्याच्या घरी. 'सात घानाची' भाकरी करुन भुरटा आल्याली रोटी मझ्या दुरडीत टाकली एका बाईनं. तिचा मनसुबा की तिच्या घरची कसारविसार सगळी मज्जावर जावी. पण मी आलो घरी तर आत्यानं बगला तो तुकडा. ती म्हणाली 'कायर बाबा कुणं दिला हा कुटका.' मी सांगितलीच नाही. पण आत म्हतारी सांग म्हणाली व म्हणाली की मज्या भावाचं लेकरूं किडूमिडूक येथे राहायलंय ते लोकांना बघवत नाही. मी सांगितलो तर म्हतारीस वाईट वाटले. तिनं गाबभर डांगोरा दिला. मी पुना एकवार त्या गल्लीत रोटी मागायला गेलो. तर ती बाई वरटच्याची चवताळूत मज्यावर आली व म्हणाली की 'परदिशाला असेच गुण असतात. कारं तू रोटीला येतूस की माझी बदनामी करायला येतूस.' मी घाबरून गेलो कारण ती बाई मोटीलट होती व मी कितीही केलो तर लहान व महाराचा पोरगा व तेही पोरका. दुसऱ्या गावी कंटणारा असं मला वाटलं व चालायला लागलो, पण ती बाई म्हणाली, 'ये कीरं बेटा। मज्या सजना. तुझे असे गुण. खबरदार येशील तर मज्या दारावर मागून.' मी डोळ्यात पाणी भरून आणलो व तसाच पुडी गेलो. पुडे धोंडे दगडास आडखळलो कारण खुळखुळ्याची काटी धोंड्यावरुन घसरली.

आता सांगतो दुसरा प्रसंग. ऐका ध्यान देऊन बरं का. झालं काय एकदा. मी व्हतो सातवीत हाडोळतीच्या साळत. आन लागची दिवाळीची सुट्टी. पयलं दिवाळीची सुट्टी म्हंजे दसऱ्यापासन ते दिवाळीपर्यंत एकूण बावीस दिवस राह्यची. एक व्हते गुरुजी. त्याचे नांव व्हते वासुदेवराव पिपळे. शिकवायचे इंग्रजी. ते व्हते बेकाम (नाफास) पण लईच उमदा मास्तर हुषार. त्यांनी सांगितलं की, 'पोरहो तुमी रोजनिशी आणा लिहून बरं का सुट्टीची.' मला

वाटले काय भानगड सांगतोय मास्तर गड्या. मला रानात जावं लागतंय. अन कशाची रोजनिशी ल्हावं. मी विचारलो, ते म्हणाले, 'जे काय तू करतोस ते लिही.'

मी एका पाटलाच्याकडे सकाळी उठून (चार पाच वाजता) शेण रस्त्यावरचे घरायला राहिलो. आंधारात उठायचो. कदी कदी माणसाचेही शेण घेयाचो हातात व दिसायचे नाही. मग नाकाजवळ हात गेला की घान वास येयाचा. मग वाईट वाटायचं. मग तसाच मातीत हात मिसळून घासायचो व बोटव्यासारखे हात चोळून काडतांना पडायचे. त्या पाटलाचे नांव व्हते वैजेनाथ पाटील. मी त्याला वैजेनात बापू म्हणत होतो. तो व्हता माळकरी नि मी शिळे कुटके पारकरी असं करून सुट्टी संपली.

मग त्याने एक कुडता घेतला मला. मी आगोदर बोलणं केलं नव्हतं. कारण मी कोणतीही गोष्ट ठरवत नव्हतो. मला वाटायचं देतील बाबा काई तरी पोटापाण्याला व तेना दया येईल पण लई बेकार ते लोक. तो जेवाय घरी नेयाचा पण बाया वाडायच्याच नाही, तसाच टकटक वाट वघत बसायचो. त्यानं घेतलेला कुडता इतका लहान की मला येईचना झाला. तो व्हता एक रुपयाचा नि मी सावतीचा पोरगा. तर मी नय म्हणालो घेत नाही. बावीस दिवस शेण गोळा केलो. रोजचे पाच सहा टोपले. आण मला एक रुपयाचा कुडता. तो म्हणाला निघ उट इतून. घेऊ बाटल तर घे नसता देईना थोबाडीत. मला रडू आवरेना गेलं. फुटफुटू झालो. त्यानी मज्या धीकटचा दाजीच्या अंगावर कुडता टाकला. मी तसाच हुंदकत हुंदकत गेलो. बहीण म्हणाली, 'कशाला गेलास बाबा ? घरी कर म्हटलं की तुझा जीव जातोय. असच करतूच तूं कधीही.'

मी ते सगळं डायरीत लिहायचो. ते पाहून शाळा उघडल्यावर ते गुरुजी इतके मज्यावर दया करू लागले की विचारा जात पात विसरून मला अंगाला शिवायचा. पण कदी कदी घरी जाऊन मला शिळं पाळं देयाचा व पाणी आंगोळीच्या ताब्यानं पी म्हणायचा. मला तेवडंच बरं वाटायचं. मी बिबे व बोरं न्हेऊन देयाचो. ती बाई (बायको त्याची) बोलायची नाही, नाक डोळं मोडायची. ही हाकीकत आहे. जिथे मी पायी चार मैल जाऊन शिकन होतो तिथली.

असाच कसा बसा झालो मॅट्रिक पास. याचा अर्थ नापास झालो असा नव्हे तर कदी गवत कापीत, कदी निंदायला जात, कदी दुकान सारवीत, कदी शेण धरीत, कदी आंबे राकीत, कदी शेंग काडीत कदी तर कदी कापूस वेचीत

कदी बागाटे आणीत चिचेचे फूल (चिगोर) आणून वायाला देत व वाढलेल्या भाकरी खात. तर कदी दसकटं वेचीत, तर कदी पळसाच्या पानाच्या पत्रवाळ्या लावीत. तर कदी लाकडे फोडीत. तर कदी येसकरी रोजनामा सही करून आणीत. कदी मेलेल्या मडचाची वातमी देत. तर कदी बोळायासंग उतमाच्या वाया आणाया जात. हाच काय तो त्याचा अर्थ.

झालो एकदाचा मॅट्रिक पास. करण्याऱ्हास (भुतांचा) आला उल्हास. एकोणीसे साठ सालास शेकंड क्लास. इंग्रजीत मार्क छप्पन्न. चास लोकांनी सांगितलं जा औरंगाबादास. तिथं सवलत लई भारी. दलितांचा कैवारी. त्यानं वांदलं कॉलेज खास.

लोकांनी दोन आणे, चार आणे, आठ आणे करून सतरा रुपये काही पैसे (पैसे लक्षात नाहीत नक्की) मला दिले व त्यातून आकाला (खायाला जवारी नव्हती म्हणून) रुपये ५ दिले. पण रडूच येऊ झाले. कारण मला अनेकांनी भीक द्यावी व त्यात वहीणीचा हिस्सा यावा. पण कोणास ठावून असं व्हायाचं व्हतं, म्हणूनच की काय हिस्सा वाटा मला समजला.

आलो सकाळी औरंगाबादला (खडकीला) पण कळेना. मग इकडं तिकडं बगितलं. तेथे भेटला जगळपुरच्या गुरूड्याचा मुलगा भानुदास त्याचं नाव. त्यानं सांगितलं 'बस रे येथे ह्या टांग्यात.' बसलो मी. आलो साईनाथ राईस प्लेट हॉटेलला तो उतरला. मीच पैसे दिलो. कारण त्याच्याजवळ चिल्लर खुर्दा नव्हता तो म्हणाला, मी नंतर पैसे देतो. फक्त आठ आणे (एक रुपया टांगा चार्ज) जा असाच नीट त्या गेटकडे. मी फिरलो फिरलो. आलो होतो सकाळी सातला औरंगाबादला. पण सुमार आला चारचा. शेवटी कॉलेज गवसलं. एकदम जीव माझा थक्क झाला. कॉलेच बघून, सारे पोरंच पोरं जिकडं तिकडं आबाबा! काही काही लई भारी दरवेशाचे. मग मला वाटलं आपला नंबर लातो का नाही. पण झाला कसं तरी लायनीत थांबून थांबून फारम घेतला पण कसा फारम भरावा म्हणन पोर भेटू लाले. पण ओळख कोण देतो. राजूरचे काही पोरं भेटले. पण ते चटाकपटाक होते. क्लासमेट पण 'थांबा जरा' असे म्हणू लागले.

बरं झालं काम कॉलेजातलं. आली पाळी बोर्डिगची कोणीतरी सांगितलं की, रेक्टरसाहेब आपल्या जिल्ह्याचे आहेत चल तिकडं मग मी व राजूरचा यादव गेलो त्यांच्या खोलीत. ते म्हणाले, 'कोण आहे रे.' आम्ही दबत दबत म्हणालो, 'अं अं, आम्ही. 'कोणरे? बरं तुम्ही असे ते उच्चारले. झालो आम्ही

हिरमुसलो पण लागला नंबरही. रोज खायला मिळू लागले. लईच मजा वाटली मला कारण मी तो पर्यंत असं कदीच पाहिलं नव्हतं की जवळ जवळ खाल्लच नव्हतं, म्हटलं तरी काही बावगं होणार नाही. पण लागली हागवण. मलाच नाही बरं का. जे जे नवीन त्यांना. दवाखाना सुरू झाला. लोकांचा बोंबाट झाला.

आता एकदा पहा काय झालं ते असं. संध्याकाळची गोष्ट. आले आमचे मोठे सर बोर्डीगांत. मोठे सर म्हणजे अदरणीय गुरूवर्य प्राचार्य म. ना. वानखडे. मी होतो माझ्या खोलीत सगळीकडे केरकचरा, चिमण्याचे खोपे व खिडक्याचे काच फुटलेले होते. व पोत्याचे बारदाने लावलेले. मी राहिलो. शेंडे महादेव व गणवीर राहिला. मी रोज खोली साफ करायचो. झाले काय. आले सर, आले तर आले रूबाबात. नि म्हणाले, ' काय हो । म्हणतच ' कायरे हे असं कसं तुझं ? माझ्याजवळ होती एक सतरंजी दिलेली एका मास्तरांनी राजूरच्या शाळेत ती ठिगळी सतरंजी व तो माझा बचकणारा स्वभाव व कपडे गमतीचे. व त्या सतरंजी खाली होते काय तर रेशनीग स्टोअर जवळ पडलेल्या एक एक हात फळ्या व ईतईत रुंद घेऊन पाठीखाली आंथरल्या होत्या मी. ते सरांनी पाहिले व म्हणाले, मोरे मामा होते आंड्याचे तेयनी मज्याबदल सरांना सांगल ' उचल बर ते ' मी भीत भितच उचलले. खाली दिसले. नुसते ठेकणच ठेकणं वळवळ वुळबुळ त्यांना काय वाटले कुणास ठाऊक. ते म्हणाले, ' उद्या सर्वाबरोगर अर्ज कर. माझ्या नावाने ' मी थरथरत उतरलो ' गादी घे एक १० रु. मिळतील. तुला ' पण मला वाटले ते वापस कसे करावे ? मनात खूप विचार आले. असे दिवस पाखरावानी निघून गेले. शिकलो सवरलो चांगली माणसं भेटली वाईटही भेटली. इंग्रजी शिकवायला आलेला प्रोफेसर लई हुशार मनावर त्यांचा खूप परिणाम झाला. वाटायचं ह्या माणसासारखं हुताईल का आपल्यास कधी कधी तसं स्वप्नही पडायचं पहाटी.

झालो एकदाचा एम. ए.. मुंबईहून कॉल आला. गेलो मुलाखतीला. मोठमोठी माणसं रोखून बघत हुती. काय काय विचारलं. खूप विचारलं. कुणी काही कुणी काही. मी लाजरा बुजरा पण तवा धीर कसा आला काही ठाऊक नाही. तोंडात आलं ते फाडफाड बोललो. चिप राहायचं नाही असं ठरवून गेलो होतो. डॉ. वानखडेसरांनीच इंग्रजीचे प्रश्न विचारले व मी लाजरा बुजरा असून फडाफड बोललो. मी मुंबई कदी फायली नव्हती व मी जरा खेडवळ म्हणून चुकल बिकल गडबडीत किंवा रस्ता क्रॉस करणे जमणार नाही म्हणून त्यांना दया येवून वानखेड सरांनी माझ्या हाताला धरून रस्ता क्रॉस केला जाताना

व येतानाही तरीही हाताला लोकल गाडीत जरासे खरचटलेच आम्ही सारे सिद्धार्थ विहार वडाळा होस्टेलला उतरलो होतो. मुलाखत संपली. नेहमी वाटायचं कसं होतं की बाबा । कसं होतं की ।

मुंबईहून गावाकडं परतायचं म्हणून स्टेशन गाठलं. गर्दी तोबा मन थोडकं बावरलं. गावात जत्रा पाहिली होती. पण हे घूड होतं. गाडीत बसलो नि गावाकडं निघालो. तई हरवल्यावणी झालं. अिंग्रजी शिकणाऱ्या प्रोफेसरासारखं आपणबी पोरामोहरच उभा राहयंच. फड फाड अिंग्रजी बोलयचं अशी चित्र डोळ्यापुढं आली नि कई झोप लागली समजलंच न्हाई.

O O

आजुनही आठवतात आंकडे २५, २६ मिळून ५१

१९६० ची ही गोष्ट, मॅट्रिक झाल्यासालची ही गोष्ट. त्याच असं झाल की मी साऱ्यांनी चंदा करुन दिल्यावर तेव्हां अहमपूरला केंद्र नव्हतं म्हणून परीक्षेला उदगीरला गेलो साऱ्याबरोबर. मनात सारख धुकूडपुकूड चालू होत की नापास झालो तर लोक काय म्हणतील. ज्यांनी परीक्षेसाठी खास चंदा करुन दिला ते काय म्हणतील व नापास झाल्यावर माझ काय होईल हे नि असे अनेक भाराबर प्रश्न माझ्या मनात सारखे येवून जात.

मी साऱ्यांच्यावर अेका तात्पुरत्या करुन दिलेल्या खोलीत राहिलो व साऱ्याबरोबरच जेवणही घेत होतो, अेका मागून अेक दिवस चालले. अेका एक पेपर संपू लागला. रोज तीच तीच धडकी कस होतं काय नाही, सारेजन थोडेफार जागायचे पण मला जागणे जमायचेच नाही. कारण एकतर लहानपणापासून जवळपास सारेच दिवस आतार्यतचे लोकांनी दिलेलं शिळपाळ खावून गेल्याले व हमेशाकरीता हा ना तो रोग माझ्या मागेच रहायचा म्हणजे मी एक 'सदा रोगी' होतो व त्यातल्या त्यात मला सारखा कवूळ, पांथरी याचेच रोग होत असत किंवा त्याला कामिनी व नळगुज असेही म्हणत असत. त्यामुळे मी सारखा कमजोर असायचो म्हणून थोडसं काही खाल्लं की सुरसूर करुन मला गुंगी येतासे म्हणून न जागता ईच्छा नसताही झोपावेच लागत असे.

झाले सारे पेपर्स. संपली परीक्षाच सारी. मनात अनेक विचार येत असूनही आता कांही करू शकत नव्हतो. कारण पेपर्स म्हणजे पर्चे तर हातातून गेलेत आगोदरच. आता हातात कांही नसल्यामुळे निकालाची वाट पहाण्या पल्याड माझ्याकडे कांहीच नव्हते.

परीक्षा संपल्यावर उदगीर अहमदपूरपेक्षा जरा मोठं गांव म्हणून सगळे उदगीर पाहिले सगळचांच्याबरोबर. तिथल्या कापसाच्या गिरण्या व जुना किल्लाही पाहिला. त्यात खूप मोठी एक विहीर काळजंबूळ पाणी असलेली.

पाण्याकडे पाहिले की डोळे गरगरा फिरायचे. तिचे पाणी किल्ल्याच्या तटातून बाहेर काढून दिलेले होते. कांही आडदांड पोरांनी नको म्हणताही विहीरीजवळ जावून तिचे पाणी पिले पण माझ्यासारख्यांनी मात्र झुळझूळ वहाणाऱ्या तटातुन जाणाऱ्या पाटाचेच पाणी पिवून तुडुंब पोट भरुन घेतले.

असे ते परीक्षा देण्याचे नि उदगीर पाहाण्याचे. उदगीर म्हणजे तालुक्याचे गांव. येवढेच काय माझ्या गांवचा तो तालुका पण मी पहिल्यांदाच तोही परीक्षेच्या निमीतान पाहिला. त्यापूर्वी उदगीरबद्दल फक्त ऐकून व वाचून होतो की ते अेक ईतिहास प्रसिद्ध गांव आहे व तिथे त्याच पाहिलेल्या किल्ल्यात १७६१ मध्ये लढाई झाली.

परीक्षा आटोपून व उदगीर पाहून झाल्यावर परीक्षेचा डोक्यावरील भाराचा तान थोडाफार दूर ठेवून पुन्हा अहमदपूर गाठले व बोर्डिगातले तांब्या ताट आंथरुन पांघरुन जे दिले असेल ते वापस करून जसे अनेक मुलं आपापल्या आईवडिलांच्या गांवी गेले तसाच गेलो मी बहिणीच्या गांवी. लहानपणापासून जिथं रहात होतो तिथं. आईवडील नसल्यामुळे.

आलो एकदाचा परीक्षेचा तान जरासा खाली करुन बहिणीच्याकडे तर झाला दुसरा तान ईकडे. रोजच्या जगण्याच्या बहिणीच्या घरी. बहिणीला तात्पुरतं बरं वाटलं परीक्षा तेही मॅट्रीकची दिली परंतु तिच सुरू झालं बुरबूर जस आज पावसाच होतं (मोठा पाऊस न पडता) किंवा सासुरा सुनेलाबुर-बूर केल्याशिवाय चैनच पडत नाही तस. ती म्हणायची आज इथं कामाला जा. उद्या तिथं दसकटा पळाटचाला जा. आज इकडून पानं घेवून ये तिकडूव लाकडं घेवून ये व ह्या पाटलीनमायीच्यात टाक त्या पाटलीनमायीच्यात टाक. तिच्या म्हणण्याप्रमाणेच मी करतासे कारण मला जगायचे होते.

बऱ्याच वेळा शाळेतले पोरं खेळतात, कुदतात व काही मला चिडव-तात म्हणून काम करत नाही असे म्हणावे वाटत असे पण ते तसे वाटणे फक्त मनातच रहायचे. कारण मनात काय चालले हे बहिणीला समजायचे नाही म्हणून मनातील भावना चेहऱ्यावर बऱ्याचदा उमटताना दिसतात. पण तिला बिचारीला काम, कष्ट व पोट भरणे याशिवाय काय कळणार.

मला सारखं वाटायचं की माझ्याच वर्गातले सारे पोरं मॅट्रिकची परीक्षा दिली म्हणून मोठे पौरत खात पीत असतील. मग पुढे पास नापास होवो ह्याची त्यांना तमा नसेल असे वाटायचे व मला रोज हे ना ते काम केल्याशिवाय व

तेही कोणाच्या तरी वाडचात तोंड वेंगाडावे लागायचे पण याशिवाय काही ईलाजच नव्हता.

हे सारं परीक्षा देण्याचं व परीक्षा झाल्यावर घरी आल्यावर काम करायचं. आता झालं काय तर निकालाची तारीख येत चालली. मनात काम करताना व रात्री ईतरी तेच सारखं येयाचं की आपलं काय होतं की म्हणून पेपर्स तसे बऱ्यापैकी सोडवले होते. परंतु ही पहिलीच वेळ होती मॅट्रिक बोर्डाची परीक्षा देण्याची तेही दुसऱ्या गावी.

लोक वेगवेगळच सांगायचे की निकाल आज आहे उद्या आहे. कारण वहिणीच्या गावी तेव्हा काही पेपेर (वर्तमानपत्र) येत नव्हता आताच्यासारखे अगोदरच जाहीरही कोणी करत नसे व केव्हां आहे निकाल व उशीर का झाला असेही कोणी निचारीत नसे.

ज्या दिवसाची आतुरतेने वाट पाहात होतो तो दिवस एकदाचा उजाडला व लोक सांगू लागले की मॅट्रिकचा निकाल कालच लागला. मग मी दुसऱ्या दिवशी हडोळतीला चार मैल चालून गेलो व तिथे खूप विचारपूस केली. कोणीही सांगेना. हडोळती ठाण्याचं व सातवीपर्यंत शाळा असलेलं जरा मोठ गाव म्हणून मोठ आशेने आलो होतो. परंतु ओळखीचे कोणी भेटेचना. कोणी भेटला तरी आपल्याच तोऱ्यात जरा मोठचा गांवचा म्हणून. मग तिथेच खाटिकखान्याच्याजवळ असलेल्या महारवाडचातील मुलांनी मला सांगितले की कालच मॅट्रिकचा निकाल लागला. परंतु आमच्याकडे वर्तमानपत्र आहे. बघु चला. सांगा तुमचा नंबर. तर मी सांगितलो. ५४५५.

तो मुलगा माझा तसा अवतार बघून सुरुवात केली थर्डक्लासकडून बघायला व शेवटी सांगितले की नाही. कुठेच सापडत नाही तुझा नंबर. मग मी खूप नाराज झालो व पुन्हा दुसरीकडे कुठतरी पहा म्हणालो तर त्याने कुरकुरतच पाहिले तर माझा नंबर सेकंड क्लासमध्ये सांपडला. पण त्या पोराचा विश्वास बसेनाच व म्हणाला निग बे आमच्यातल्या एकाही मुलाचा नंबर नुसत्या पासमध्ये आला नाही मग तुझा कसा येईल. मी पेपर पाहून घेतला व मनान विश्वास घट्ट केला की आपण व्दितीय श्रेणीत पास झालो म्हणून. खूप आनंद झाला कारण आंघळा अेक डोळा मागत होता तर दोन मिळाले. मग किती आनंद त्याला असेच झाले माझे.

घरी आलो. सर्वांना सांगितले. लोकांना आनंद झाला. कारण मी सर्वांनाच लावून घेवून वागत होतो. साऱ्यानांच आनंद झाला व बामणाच्या घरी

जिथं मी शेणपाणी करत होतो तिथेही समजल्यावर आनंद झाला. आता जसा कोणी पुढे गेला किंवा कुणाचे बरे झाले की दुसऱ्याचा जळफळाट होतो तसं त्यावेळी होत नव्हतं.

झालो एकदाचा मॅट्रिक तेही शेकंड क्लासमध्ये पास. मग सारखा ध्यास लागला की आयला काय करादे पुढे म्हणून. माझ्या बरोबरीचे ईतर खेड्या-पाड्याचे मुलं कोणी कुठं कोणी कुठें जावयाचे ठरवत होते. मीहीं मनात खूप विचार करीत होती पण विचार बाहेर येत नव्हता. मध्येच असे कळले की मास्तरकीची नोकरी लागते पण हजेरीवर १९ वर्षे वय पाहिजेत. मग माझी मोठी पंचाईत झाली. एक होते गुरुजी, त्यांना हाताने लिहिता येत नव्हते. कारण त्यांचे दोन्हीहो हात लकव्यामुळे थरथरत होते. ते म्हणाले मी १५ रुपये देतो. माझे लिहायचे काम करत जा. मी होकार पण देणार होतो पण मध्येच काहीनी गांवात चंदा करण्याचे ठरविले. सगळचा गांवाभर फिरलो. झाला चंदा गोळा व कॉलेजला येण्याची तयारी (मनाची) झाली. दोनचार दिवसात कॉलेज-साठी औरंगाबादला अहमदपूरमार्गे सर्वांना भटून निघणार तोच एका दिवशी दुपारी सहजच विचार सुचला व दोन्ही पाय खूप स्वच्छ धुवून कादले. अगदी घोसून पुसून येरवी ह्या ना त्या कामात गुंतल्यामुळे कधी येवढा विचारच केला नव्हता व दुखलं तरी फक्त रात्री पण सकाळी उठून तेच काम तेच रोजचे रडगाणे. पाय स्वच्छ धुतल्यावर पहातो तर काय जिकडे तिकडे काळेच काळे वण. कुठे अगदि गांठी घरलेले तर कुठे गांठी नसलेले.

एका मागून एक मन लावून काळे डाग कोरलो तर अगदि एका पायात २५ कांठे लहानमोठे कुरूप किरूप घरून. दुसऱ्या पायात २६ कांटे असे दोन पायातील मिळून ५१ काटे निघाले. कांटे कुरूप कोरून उकरून काढल्यावर कुठे जिभाळ लागल्यावर रक्त निघाल्यामुळे तर कुठे खड्डे पडल्यामुळे दोनही पाय दुखायला लागले.

ईतके दिवस मात्र सारा सरावच पडला होता. याचा अर्थ हाच की मी मॅट्रिक पास होईपर्यंत चप्पल किंवा जोडा म्हणायची वस्तु पाहिलीच नाही व कधी कांटा बोचला तरी कधी काढावे तर कधी तसेच दुर्लक्ष करावे याच्यातून शेवटी ५१ काटचांचे माहेर म्हणजे माझे पाय बनले होते बक तेळले धुवूनपुसून घेतल्यावर व उकरून काढल्यावर नसता येरवी त्याकडे लक्ष कशासाठी जाणार,

मी पहिली चप्पल पाहिली ती फक्त औरंगाबादला मिलिंद महाविद्या-लयात प्रवेश घेतल्यावर व सारेच मोठे लेबाशात पाहून मित्रांनी घे कशी तरी

कपटाफिकटाची निभवण्यापुरती म्हटल्यावर. चप्पल घेतल्यावर थोडस वेगळ चालण झालं कारण चप्पल कितीही म्हटल तर उंचच व आतापर्यंत पायात कांही न घालता चालायची संवय होती. कांही दिवस खूप कुतुहल व नवल वाटत राहिलं. व माझ्या मनालाच जरा टैलत चालल्यासारखं वाटल पण कसची टैल नि थाट. मधून सार खपट असल्यामुळे व आत सारे मसुरी मोळे ठोकले असल्यामुळे ते टोचायला लागले.व टोचला म्हणून चप्पल काढून पहायला गेलो की पुन्हा तो दिसायचाच नाही. कारण वरच जाड खपट वापरल होतं व पायाचं वजन पडल की तो टोचायचा व आधीच कांटे काढल्यामुळे व खड्डे झाल्यामुळे पाय दुखायचे म्हणून मी कधी कधी मोळे रुततात म्हणून तसाच चप्पल न घालता कॉलेजला व इतरही ठिकाणी जात असे. ती अशी पहिलीच टोचणारी चप्पल. ती होती दोन रुपयांची. मग मला वाटायचे दोन रुपयांच्या चप्पलेने टोचण्याशिवाय करावे तरी काय. काय चुकते त्या चपलेचे, तिला तयार करणाऱ्याचे व तिला लेवणाऱ्याचेही. सगळ्याच गोष्टी नाईलाज म्हणून झालेल्या.

असे ते दोन पायातील २५ + २६ मिळून ५१ कांटे व पहिल्या चप्पलष्तले कांटयापेक्षा ताठ असलेले व काटयांची आठवण करून देणारे मसुरी मोळे. सारच आठवतं अजूनही जखमा झाल्यामुळे.

देखणीर आधार सुधाकर.

हुरडा

चारी बाजूंनी सुंदर असा निसर्गाचा परिसर. मधेच रानातली पिके बहारदार छाती फुगवून माना डोलावत होती. काही तारुण्य टाईप दिसत होती तर काही तारुण्य असतानाही ताठ नव्हती नि हे सगळीकडेच असतं का गड्या असं मला हळूच वाटून जात व मी थोडा फार विचार करायला लागतो. परंतु मध्येच चोहीकडे निसर्ग हिरवागार बहारलेला दिसतो व त्यातच पक्षी सारखा कर्ण मधुर असा आवाज करतात. तोच मी दोन गोष्टीतील अंतर याचा विचार करणे तात्पुरता सोडून निसर्गात रममाण होण्याचा प्रयत्न करतो. खरं म्हणजे निसर्गाकडे पाहिल्यानंतर एखाद्याचे मन तसेच फुलून भुलून जाते परंतु माझे तसे होईना नि याचे कारण काय तर एकीकडे काही झाडं झुडपं व काही पिकांची दाट अगदी मजेत मुसमुसल्यागत तर दुसरीकडे त्याचीच भांवडे झाडं झुडपे व पिकांची घाट मरगळीत. फिकट होऊन कसा तरी जीवन श्वास घेतासलेली व मरण येत नाही म्हणून जगतासलेली. नि हे सर्व पाहून कोणालाही वाटेल तसेच माझे पण झाले की या ईथं पण की जिथं निसर्गाची मोठा महिमा वर्णन केला जातो तिथही तेच जे कपडे घातलेल्या प्राण्यात दिसते.

असच पाहात राहिलो तर तितक्यातच असे ठरले की आपण ह्या आंब्याच्या झाडाखाली हुरडा खावू म्हणून. मी ज्याच्यावर गेलतो त्या बामण मास्तरांनी म्हणजे गुरूजीनी बोलावले त्या माळचाला जो की त्यांचे शेत बटावूने करतासे. मालकाने सांगितल्यावर त्याला ऐकावे लागणारच व तेही बामणाची मोठी माणसं व तेही बाहेरगावी रहाणारी शाळकरी जरा जास्तच नाजूक व नवलाईची मंडळी म्हणून त्या माळचाने जरा नवलाईचा हुरडा खावू घालण्याचे ठरवले व गेला त्या पुढच्या वावरात मटा दिमाखानं पिकाच्या पानाचा आवाज करत व आणली त्याने घाटासगट मोळीभर कणसं ती घाटं ईतके गोड की हुरडा भाजेपर्यन्त आम्ही ती घाटच चगळून खालो. कारण मामच्याकडे तेवढी गुराळ उसाचे मळे नाहीत. मग बसलो हुरड्याच्या नादाने बाता मारीत व टकमका एकमेकाकडे काम नसताना बघत. काही विषय नसला तरी उगीचच

हा ना तो मुद्दा उकरून काढत कारण रिकाम्या डोक्यात असे गोंधळ करणारे विचारे विचार काय कमी असतात का व तेही बामण लोकाच्या संगतीत.

अेकदाची पेटवली आंगठी त्या माळ्याने तिला शिलगायला जरा वेळच लागणार तो तिने घेतला व मग विस्तू लाल हिल्ल्याळ दिसू लागला. खरं म्हणजे आगठीत सारा जाळ लावून खूप विस्त्याचे लाल हिल्ल्याळ इंगळं साचले की मग त्यात खूपसून खूपसून कणसं ठेवली जातात व कणसं अगदी मकाच्या भुट्या जशा चटपटचटपट कराव्या तो ती कणसं पटपट आवाज करत पटपट भाजली जातात व तो हुरडा खायाला चांगला लागतो. परंतु अेक तर तशी गच्च बियाची टपोरी कणसं नव्हती कारण ती होती थोडीसी झिपरी, जिला की थोडासा जाळ पुरेसा असतो व दुसरी गोष्ट म्हणजे संगची बामण संडळी कसा दम धरणार खाण्यासाठी. मठी हापापलेली मंडळी.

भाजले कणसं. अंथरली काळी घोंगडी त्या माळ्यानी. बसली सगळी मंडळी घोंगड्याच्या बाजूने व बिचारा माळी त्याची स्वत:ची घोंगडी असूनही बसला अेका बाजूवर भाजलेली कणस दगडाने चोळू लाला. मग भळाभळा त्यातून गरम हुरड्याचे दाणे निघू लागले. आमचे साऱ्याचे लक्ष त्या हुरड्याच्या ढिगाकडेच. माळी चोळणे झाले की समोर लोटून लावू लाला व खायाला लागली मंडळी हुरड्याचो टपोरी दाणी. मी जरा बसा म्हटले तरी मनात कचरतच होतो कारण मास्तर लोक शिकलेले हैत पण ईतर त्यांचे लोक आतून वेगळेच. मग शेवटी बसलो अेका बाजूला घोंगड्यापासून थोडाशा अंतरावर. ते म्हणायचे अरे जवळ येणारे अेक मास्तर मला लहानवणी पल्या म्हणायचा पण आता मी कॉलेजात शिकत होतो. म्हणून जरा लाजून आहो घ्या हो व मधूनच त्यातला माझ्याबद्दलच लाड उफाळून येण्याचा व मध्येच म्हणायचा अरे का घेत नाहीस. घेना जरा रे बेटा जवळ ये. मग ते मुठीने माझ्या फडक्यात टाकायचे. बराच वेळ गेला.

असे करता करता मग सारे कस का होईना विनवतात म्हणून गेलो घोंगड्याच्या काठवर जसे की सारे बसले होते, तर झाल काय त्या माळ्याने जे अगोदरच नाक मुरडण सुरू केल होतं त्यात भर पडून तो डोळे वटारून कोणास न कळत माझ्याकडे बघायचा व नाक ईतका मुरडायचा की जणू त्याच्या नाकाला फणसी वगैरे झालती, सगळं झाल्यावर मध्येच तो म्हणाला दिवांजीसाहेब तुम्ही काही म्हणा हा परल्या काई शिकला तर उतीम लोकाच्या बर पंगतीला बसण बरं नाही. त्याला हे घातक है कारण त्याने आपल्या पायरीनेच वागावं.

त्यानी मास्तरांनी सांगितलं म्हणून हुरडा भाजून दिला कारण बामण मास्तर म्हणजे गावचे पटवारी व पाटील यांचा गावात दरारा असतो म्हणून व तो त्यांचा बटावूदार होता म्हणून त्यानी तसेच ते काम चुबीत केले परंतु शेवटी त्यातला उतीमपणा नसून कुणबीपणा जागा झाला व त्याने माझ मन बेधडक मास्तराचे दडपन असतानाही दुखवलेच कारण त्याला कसं बसू देणार त्यातला कुणबीपणा व दुसर कारण म्हणजे मी लहानपणी त्याच्याच भावकीच्या घरी शेण काढण्याचे व मळचातले सारे दार धरण्यापासून ते निंदण्या खुरपण्याचे काम करायचो.

मला वाटायला लागले की महात्मा फुलेनी मानव जातीला न उचलण्या येवढे उपकार करून ठेवलेत व त्याच वंशाचा माळी माणूस ईकडे अज्ञानाच्या गर्तेत गुरफटलेला आहे. म्हणजे कुठेही जा मग माणसात असो की निसर्गात तिथे तुमची जात येणारच. माळी, बामण व मी सगळे एका धरतीची लेकरे आज वर आहोत उद्या तिच्याखाली (उदरात) जाणार आहोत व तेथे कोण कोठे याचा पत्ताही लागणार नाही. परंतु हे सगळे नखरे वर असेपर्यंतच.

आठवण छावणीची

अेकदा काय झाल तर आम्ही छावणीच्या अेका कोपऱ्यात रहात होतो. रहात घर अगदी बोळात व घाणपाणी वाहणाऱ्या नाल्याजवळ. पण लोक त्याला वाडा म्हणत. आम्ही तिथ तिन्हीही शाखेचे विद्यार्थी रहात होतो. जणू काय पूर्वीचे मिलिंद महाविद्यालयच होते तिथे.

हमेशाप्रमाणे त्या वेळेसही शिमगा झाला व दुसऱ्या दिवशी त्याची कर आली. शिमग्याच्या दुसऱ्या दिवसाला आमच्याकडं कर म्हणतात व काही लोक धुळवंडीही म्हणतात. कर किंवा धुळवंडीचा दिवस म्हणजे साऱ्या लोकांचा अर्थात गोर गरीबांचा खाऊन पिवून हसून खेळून वेडेवाकडे अचकट विचकट बडबडून अगदी मजा मारण्याचा. खेडयात तर शिमग्याच्या करीला विशेषत: जास्तच मजा येते. कारण आमच्या लहाणपणी बघितलेल अगदी चांगलं आठवतय की गरीब व खातवणी लोक जे मिळेल ते मासकंड खाऊन शिंदी, दारू पिवून नाचतात. अगदी हालकीच्या तालावर व कसल्याही घाण गटारात-डूबकाडात लोळतात व सारे अंग बेंदाडात भरून घेतात व घरोघर वाजत गाजत जावून कांही पैसे, धान्य मागून घेतात. व तसे करण्यात त्यांना खूप आनंद व मजा वाटते. अर्थात त्यांना तवा वर्षभराचा थकवा घालवल्यासारखं वाटतासेल कारण येरवी काबाडकष्टाशिवाय दुसरे काय असते त्यांच्यापुढे.

खेडयात तसं म्हंटल तर लोक रंगबिग तेवढं खेळत नाहीत. जर खेळलाही जातो तर थोडीशी रंगाईतकी ऐपत असणारे रंगरावच त्या फंदात पडतात. गरीब फक्त वरील प्रकार करून अेक दिवस कसा का होईना जलसा लुटल्यासारखे करतात.

अलीकडे शहरात धुळवंडी म्हणजे लोक अगदी शिकले सवरलेले, बारीक मोठे सरास रंग खेळतात व गरीबाच्याच पण वेगळ्या फॅशनचा सगळा शौक करताना दिसतात. सारेसारेच शिकणाऱ्यापासून ते शिकविणाऱ्यापर्यंतचे. काही अर्थ कळत नसला तरी रंगात बेभान झालेले दिसतात.

तसेच झाले एकदा. आम्ही छावणीच्या एका बोळात असलेल्या घरात रहात असताना. मला वाटते ते घर बाहेरून वाडा दिसायचं पण आंदरून साऱ्या बारक्या बारक्याच खोल्या किरायाच्या हेतूने केलेल्या दिसायच्या. तिथं अनेकजन रहात होते. काही नोकरीवालेही होते. शिकणाऱ्यांपैकी नोकरीवाले तेव्हा नसायचे. कारण आजच्यासारखे शिकणारे तेवढे नोकरीमागे रहात नसत.

आम्ही काही लोक अगदी एकमेकांना चांगले ओळखणारे व जिवाभावाला होणारे व माझ्यासारख्याला कदीबिदी हसविणारे रहात होतो. त्यात मला आठवतय श्रीधर कस्तुरे, मुरलीधर तुरूकमाने, नामदेव डोंगरदिवे, नासिकचे दोन निकम, एक जरा बोबडा तर दुसरा पहिलवान, दोन जगताप रहात असत. त्यापैकी एक कॉमर्स कॉलेजचा तर दुसरा सायन्सचा. एस्. जी. घंडागळे व कचरू झिणे, तिथेच पण बाजूला रहात म्हणून हमेशा गाठभेट पडायची.

वरील सारे वेगळ्या खोलीत वेगळ्या कॉलेजात व वेगळ्या वर्गात होते तरी माझा वेगळा आवतार व सबाब व त्यातल्या त्यान इंग्रजीचा नाद असल्यामुळे माझ्याकडे वळले. मी मात्र जगन अहिरेबरोबर रहात असे. तो मोठा संसारी व हरहुन्नरी. तेव्हापासून त्याने नोकरी धरली व कॉलेजात येणं सोडून दिलं. मी तो नोकरीला लागलाय म्हणून जरा मदत मिळेल म्हणून त्याच्याकडे राहिलो पण झालं ते वेगळंच. अगदि माझ्याकडून इंग्रजी व सारा कोर्स शिकवून मागायचा व आमाउंट कधी आहे म्हणून वर्दी बी दे म्हणायचा व त्याचा नातलग मधु बस्ते मला जावू दे रे. हे चालणारच म्हणून घराबाहेर घेवून जायचा.

वसतिगृहात मी चांगला रहात होतो पण त्याने तुझा किराया भरतो व तुला दुसरी मदत करतो म्हटल्याने मी त्याच्यावरोबर रहाण्याचे कबूल केले होते. अेकदा तर त्याने आमाऊंटची वर्दी देण्यास उशीर झाल्याने मला मदत सोडून देवून उलट मलाच किराया भरायला लावून चिडून मला एक चापट मारली पण होती. मला खूप राग आला पण करणार–काय ? मुळमूळ रडण्यापल्याड माझ्यापुढे काही उपाय नव्हता. कारण अेक तर तो जरा मोठा होता व जरा घरचा बी बरा व नोकरीवर.

मुरलीधर तुरुकमाने, कस्तुरे व डोंगरदिवे माझा सबाब व गरीबी पाहून मला जरा जीव लावायचे. तुरुकमाने तेव्हां एन्. सी. सी. च्या ऑफिसरच्या मर्जीतला होता. बहुतेक Under officer असावा असे मला वाटते.

जसा नेहमी येतो तसा आला शिमगा. तेव्हा ही पोरं जरा कोर्स संपल्यामुळे लागले होते अभ्यासाला व पुस्तक आजूबाजूला–पोटावर व डोक्याखाली घेऊन दुपारी घुरायलाही. दुसऱ्या दिवशी कर आली. रंगपंचमी किंवा

धुळवंडी– आजचे धुळीवंदन. दोन निकम व दोन जगताप यांनी खूप अेकमेकांना भरवून घेऊन दुसऱ्यांना भरवायला फिरु लागले. जगताप जास्तच रंग खेळणारा व बडेजावी करणारा. त्याला खूप कपडे असायचे व तो तेव्हांच खूप चांगली घडचाळ वापरायचा व कपडे अगदी टापटीप ठेवायचा.

साऱ्यांचे लक्ष रंग खेळून मजा मारण्याकडे पण माझे मन है रंग खेळल्यानंतर भरलेले कपडे कुठे टाकतात ह्याकडेचं मला तेवढे कधीच तसल असल आवडायच नाही. आणि माणसे पण खुमासदार कोण व कोण नाही हे ओळखूनच करतात सारे.

तसे साऱ्यांनी खेळ खेळून झाल्यावर दुपारी तीन चारच्या सुमारास पाणी सुटल्यावर सारे भरलेले मुद्दाम घातलेले फाटके फुटके कपडे जवळ असलेल्या एका पडक्या हौदात कचऱ्यावर टाकून दिले व अंगाला साबण लावून आंगोळ करून मोकळेसक झाले. त्यांना मजा लुटल्याचा आनंद तर मला फक्त त्या टाकून दिलेल्या कपड्याकडे बघण्याचा आनंद व सारे आंघोळ करून मध्ये गेले की आपण त्यातले चांगले कपडे काढून घ्यावे वाटायचे.

तसे मी केले सायन्सच्या जगतापचा खमीज व पायजामा खूप चांगले चांगले होते. मी पाहिलेला पहिला ओपन शर्ट तो. मी दुसऱ्या दिवशी पोरं बाहेर गेल्यावर खूप चांगले धुवून ते घेतले व काही दिवसांनी लेवायला काढले. कोंणास तेवढे ओळखू येत नसे पण पोरांनी अंदाजा लावला. हा असे ओपन शर्ट व एवढा चांगला पायजमा (चोळणा) वापरत नाही. हे कुठून आले कपडे ? जगताप तुरूकमाने जरा चत्रेच पोर होते. त्यांनी म्हटले हे जरूर रंगलेले कपडे ह्यांनी घेतलेत मी नाही हो म्हणत 'हो' म्हणालो त्यांना हे सार पाहून वाईट तर वाटलच पण चांगले धुवून घेवून वापरतोय म्हणून बरेही वाटले. तेव्हापासून ते माझ्या आणखी जवळ आले व मला केव्हाही काही नसले की देयाला लागले.

त्या वाडचात राहणाऱ्यापैकी जवळपास प्रत्येकजन आपापल्या परीने कष्ट करून पदवीधर होवून चांगले जीवन जगताहे. पण ज्या माणसांचे मी चांगले भरलेले, टाकून दिलेले धुवून कपडे वापरले व माझी इज्जत झाकली तो मला पदवीधर न होता तेव्हां मजा मारल्यामूळे का कोणास ठावूक आता प्राथमिक शाळेत चाकरी करताना काल परवाला भेटल्यामुळे बडचा गिरणीजवळ भेटल्याचा आनंद झाला पण तेवढेच वाईटही वाटले त्याला तसे पाहून. याचा अर्थ असा नव्हे की मी फार मोठा झालोय व त्याला कमी लेखतो पण मित्र थोडासा पुढे जायाला हवा होता येवढेच काय ते वाटते.

O O

उंटावरचा प्रवास

काल परवाची गोष्ट आहे ही. कालपरवा म्हणजे नव्हेंबरच्या १ तारखेला गावाकडे जाण्याचा बेत केला नि निघालो जायाला. रात्री औरंगाबाद ते उदगीर एस. टी. ने.

जवळ जवळ महाराष्ट्रभर निदान मराठवाडयात तर पावसाचा थेंब नव्हता, गेल्या दोन तीन महिन्यांपासून, गाडी शहागड ते अंबडला येताच थोडा फार पाऊस पडला. आणि आम्हाला खूपसा आनंद झाला. आमची कल्पनाशक्ती औरंगाबादच्या हरसूल तलावाची पातळी वाढवू लागली. बीड सोडताच गाडीचा ब्रेक डाऊन झाला. तब्बल दोन तास. नंतर आंबेजोगाई ओलांडून निघाली अहमदपूराकडे व अहमदपूरला जवळ जवळ दोन अडीचच्या दरम्यानं आली व थोडावेळ थांवली. मी तेव्हा इकडे तिकडे नजर फिरविली तर त्या काळोखातही बराचसा फरक दिसून येत होता.

अहमदपूरबद्दल मला आकर्षण वाटतं याच कारण म्हणजे मी तेथे त्या सरकारी शाळेचा विद्यार्थी होतो आज त्याला जवळ जवळ बारा वर्षे लोटाताहेत त्यावेळेसचे अहमदपूर व आजचे अहमदपूर ह्यांमधील चमत्कारिक अंतर पाहून मनाला थोडा विस्मयच वाटला, तेव्हा काहीच नव्हतं. आता तिथे मोठमोठ्या आधुनिक इमारती, दुरुस्त अशा सडका. रस्ते, आडत दुकाने, कॉलेज व एस, टी. चे भव्य नसले तरी टुमदार असे बसस्थानक. हे सारे काही नवीनच.

हं हं म्हणता अहमदपूर ओलांडून गाडी शिरूर ताजबंद सोडून केव्हा उदगीरच्या रस्त्याला लागली हे काही कळलेच नाही कारण रात्रभरची झोप व सारखा अधून मधून अहमदपूरचाच विचार. लेट झालेली गाडी मेकप करून कशी का व्हईना आली एकदाची उदगीरला. अगदी सकाळी सहाला, बसस्थानकाकडे न जाता अलीकडे लोक उतरू लागले. काही लोक सूतगीरणीजवळ तर काही आर्यनिवास हॉटेलजवळ उतरले. आम्हीही बसस्थानकाकडे जाण्याचा

विचार सोडून उतरलो जनरल हॉस्पिटलच्याजवळ. कुटे जावे हा विचार मनात होताच. पण ताडकन विचार सुचला नि घेतली रिक्षा व गेलो माधव भुताळेच्या घरी. रेल्वेस्टेशनाजवळ लिबाच्या झाडाजवळ रिक्षा थांबली. माधवाचा भाऊ आला पुढे व आई पण आली मागून व ओझे ओटचावर ठेवलेले सामान घेतले त्यांनी व ठेवले घरात. झाली वळक पाळक बायका बायाची. माधवच्या आईनं म्हटलं ही कोण आहे बाई. मी उतरले तुझी सुनबाई. तिला बरं वाटलं.

थोड्या वेळाने मी तोंड धुवून झाल्यावर अेखादा उंट बिट पाहून आणावा गावाला जाण्यासाठी म्हणून, गावात आडत दुकानाकडे गेलो व सारी आडत दुकाने धुंडाळली पण कुठेच ठिकाणा लागेना. सर्वप्रथम विचारपूस केली मी मरसांगवीच्या पाटलाच्या आडतवर पण तेथे कोणी नीट बोलेना व नंतर म्हणाले आज मरसांगवीचे ऊंट येणार नाहीत. का बरं तुम्ही कोणत्या गावचे. मी सांगितले सुल्लाळीचा म्हटल्याबरोबर नाक मुरडायला लागला. कारण त्यांना समजलं की मी महाराचा हौ म्हणून. कारण त्यांना माहित होतं की सुल्लाळीला जाणारा एक तर लातूरला वकिली करणारा पाटलांचा पोरगा किंवा औरंगाबादला असणारा म्हणजे महाराचा पोरगा असणार असं त्यांनी ओळख नसतानाही ताडल. तरी तेथे तो दुकानवाला आडतदार पाटील नव्हता कारण एकदा असे मी विचारपूस केली व्हती उंटाची तर तो निट बोलेना व आतमध्ये या (ये) सुद्धा म्हणाना. आणि त्यांच कारण म्हणजे तो श्रीमंत व पाटील व मी कितीही शिकलो सवरले व चांगला लेबाशात असलो तरी महाराचा पोरगा असच तिकडच्या सगळ्या लोकांना वाटतं. मरसावंगीच्या आडातावरून निघालो व साऱ्या आडत्या फिरल्या- पण उंट सापडेना व एका ठिकाणी दोन उंट दिसले पण ते नुकतेच तेथे आले व्हते व ते दुसऱ्या वाटेचे असल्यामुळे आमच्या गावाला जाण्यासाठी तवाच्या तवा तयार व्हत नव्हते. तेथून निघालो व आलो एका आडतावर की जेथे आमच्या गावचा एक पाटलाच्या भावकीतला माणूस दिसला तो जरा घोंगत पांघबसल्यासारखा थंडीत कुडकुडत बसला होता. त्याचे बरोबर दुसरे दोन माणसे व्हती. त्यांनी मला प्रथम ओळखलंच न्हाई कारण मी लहानपणापासून बहिणोच्या गावी असल्यामुळे गावच्या लोकांची तेवढी माझो ओळख नाही म्हणा नसता मी जरा कोटाबिटात असल्यामुळे त्याला ओळखू आलो नसेल नसता आलो तरी टाळण्यासाठी त्यांनी मला ओळख दिली नसावी. मी ओळख सांगितली व गावचे उंट केव्हा येणार असे विचारताच त्याने सांगितले की उद्या आज नाही. मला वाटले आता रहावे लागते मुक्कामाला. उदगोरलाच म्हणून मी पुढे चालता झालो अेका दुसऱ्या आडतवर नऊ साडे नऊच्या सुमारास उंट दिसला म्हणून त्याच्याकडे गेलो. तो उंटवाला

म्हणाला साहेब मी आमच्या गावच्या चेअरमन साहेबासाठी वार बघताहे. ते अकराच्या गाडीने येणार आहेत. जर अकराला आले तर मी दिवाळीची साखर घेवून जाणार नसतां नाही आले तर मी जरूर तुमचा किराया धरतो. अकराच्या गाडीने येणार आहेत. पण मला अकराच्या नंतर भेटा असं तो उंटवाला म्हणाला म्हणून मी स्टेशनावर जाण्यास निघालो तर तितक्यात भेटला आमच्या गावाशेजारचा पण औरंगाबादला असतांना झालेला मित्र ज्ञानोबा तो म्हणाला कांही चिंता करु नका मी मिळवून देतो उंट. जर तो मिळाला नाही तर नसता माझ्या घरी रहा आजच्या दिवस असं तो म्हणाला. मला जरासा धीर आला नको नको म्हणतासताना सूद्धा त्याने मला चहा पाजला व नंतर गेलो त्याला घेऊनच त्या चेअरमनच्या उंटवाल्याकडे व विचारपूस केली तर तो म्हणाला जरी चेअरमन आले नाही तरी त्यांनी मला रात्रभर रहायला सांगितलयंय मी येवू शकत नाही. आगोदर म्हणत होता की जर अकराला नाही आले चेअरमन तर जरुर किराया धरतो पण तो आता फितुर झाल्यासारखा वाटला कारण त्या उंटवाल्याच्या जवळ आमच्या गावचा माणूस थांबला होता. मला दाट शंका वाटते की त्या आमच्या गावच्या माणसाने त्या उंटवाल्याला मी महाराचा पोरगा हाव म्हणुन जरुर सांगितलं असेल.

जरासं मन नाराज झालं व लगेच वाटलं नाराज व्हवून कुणाच काम हंत कां तसंच तोंड द्यावं लागत परंतु सारखं मनात वाटायच की उगीच आलो गडच्या गावाकडे. अेक तर मोटारगाडच्या नाहीत व जातवादामुळे लोक उंट व बैलगाडच्या पण देत नाहीत. पण आणखी हेही वाटायचं की भाऊ बहिणी आहेत त्यांना भेटून गाठून जावं व कदी कदी त्यांना भेटलं म्हणजे त्यांनाही बरं वाटत व दिलासा येतो म्हणून मन न खचून जाता तसाच पुढे चालता झालो. तर पुढे भेटले औरंगाबादचे मित्र तिथल्या शिवाजी कॉलेजात असणारे प्रा. भगवान येंगडे. त्यांनीही खूप धीर दिला.

स्टेशनकडे आलो तेव्हा सौ. कुमुद व बेबी अगदी सकाळपासूनच्या ओळखीमुळे त्या बायात गप्प रंगविण्यात गुंग झालेल्या दिसल्या. त्यांचे जेवण अगोदरच उरकले होते. मला पण माधवाच्या आईने आग्रह केला व म्हाताऱ्या माणसाचे कशाला मोडावे म्हणून जरा दाळभात खाल्ला.

तितक्यात आला ज्ञानोबा सोमवंशी तोच उंट मिळाल्याची बातमी दिली त्याने पण म्हणाला उटवाला आठ रुपये मागतोय. मी म्हणालो येरवी

पाच रुपये देतात लोक पण गरज आहे मग करणार काय. घेवू द्या आठ रुपये तयार करा त्याला व तुम्ही पुढे चला असे मी म्हटले.

मी सुटकेस घेतली व ज्ञानोबानी पिशवी. ऊंटवाला म्हणाला की चला चला अंधार पडतोय नसता माझ्याच्यानं येणं होत नाही बाबा. सुटकेस ठेवली उंटाच्या सलीत्यात अेका बाजुच्या व दुसऱ्या बाजुच्यात ठेवली दुसरी कपडयाची पिशवी म्हणजे प्लॅस्टीकची बॅग. बसलो उंटावर आम्ही. बेबी सारखी खाली खाली म्हणत होती. नंतर ती थांबली लगेच तो उंटवाला पोरगा म्हणाला बघा साहेब आठ रुपये बोलणं केलय ह्यांनी. मी म्हणालो काही हरकत नाही. अेक-दीडचा सुमार झाला निघायला. आम्हाला वाटू लागल की, सांच्यापर्यंत जातो की नाही गावाला गडचा कारण ऊंट जरा म्हाताराच व खटचा खटचा चालणारा होता. तो उंटवाला म्हणाला तुम्हाला काय करायच साहेब मी तुम्हाला दिवसां नेवून सोडलं तर झालं की नाही तुम्हाला सोडून पुढे माझ्या येकुरक गावाला जातो.

उंटावर बसून निघाल्यावर सारे लोक बघत होते कारण त्या दिवशी उदगीरचा बाजार होता. लोकांना शिकले सवरलेले लोक असून सुद्धा मोटरमध्ये न जाता उंटावर बसताहेत असे वाटत असाव व आम्हाला पण थोडं नंवलच वाटत होतं की लोक सारखे बघतात म्हणून. बघणाऱ्यात होते मराठवाडा विद्या-पिठातले प्रा. डॉ. एस्. डी. कल्याणकर जे माझे मिलिंदचे शिक्षक. ते तिथे विद्यापीठाच्या परीक्षेच्या निमित्ताने आलते ते मला नंतर कळले. तसं उंट म्हणजे मला काही नवीन नव्हता नवीन व्हता तो माझ्या पत्नीला.

खटचा खटचा उंट आला पिंप्रीजवळ तिथे एक भेटला म्हातारा तो होता त्या उंटवाल्याच्या गावचा व सोईर संबंधातलाच. नो गेलता लेकीला आणायला म्हणे पण त्याने लेकीला मोटरीने दुसऱ्या रस्त्याने पाठवून त्याला मोटार सहन व्हत नाही म्हणून तो पिंपरीच्या रस्त्याने निघाला होता पायी. त्या म्हाताऱ्याचा व उंटवाल्या पोराचं सुरू झालं भाषण. त्यान विचारलं की किती किराया घेतलाईच. इसेनाथ. कोणत्या गावचे होत साहेब. आठ रुपये म्हणजे सादल किरं तुझं ते दोघेजन सारखं इकडंच तिकडंच बोलू लागले व नंतर म्हातारा लागला मला बोलायला. साहेब लेकराला उन लागतय जरा पांघरा आमची पोरगी काही केल्या पांघरून राहू देईना. मध्येच ती झोपी जायाची व झुकांडचा खायाची मला माझी लेकराची, बायको कधी उंटावर बसलेली नाही म्हणून तिची काळजी व्यावी लागायची व हातात लेकरू असूनहि उंटाची नकेल धरावी लागायची मध्येच म्हाताऱ्यानं विचारलं आपून कोणता धंदा करतात व

लगेच म्हणाला महावर काय मिळतोया साहेब मी म्हणालो जवळपास सातसेएक रुपये तो म्हणाला लई भारी हाव साहेब तुम्ही शिक्षण बी लई असच तुमचं. मी म्हणालो शहरात काही केल्या महावर पुरतच नाही. सगळं ईकरीच घ्यावं लागतय. त्या म्हाताऱ्याचा विश्वास बसेना तो म्हणाला लई बंका भरतासाल साहेब.

त्या म्हाताऱ्याचा रस्ता फुटण्यास आला तरी त्या उंटवाल्याने त्याला जावूच दिले नाही. बोलत बोलत तसाच म्हातारा आला आमच्या बरोबर. मी मध्ये म्हणालो काय हो बाबा आपल्या गावाकडे काही सडका मोटारी होतात की नाही. मी पुढे म्हणालो सर्व काही बदलत आहे देशात सुधारणा होताहेत मग आपल कसं. तर तो म्हातारा म्हणाला कसली आलिया सुधारणा बिदारणा साहेब. कायबी नाही कारण आपला कोणी एमेल्या नाही की कोणी मंत्री नाही. खर म्हणजे वालीच कोणी नाही. तो म्हणाला जशा नद्या, नाले. झाडे झुडपे. डोंगर कडया तसेच आम्हीही राहणार बदल होणारच नाही बघा साहेब असं म्हणून लागला तो पोरगा नि म्हातारा हातावर बांधून आणलेल्या भाकरी खायला. आमची बेबी भाकर मागत व्हती. म्हणून आमच्या बेबीला थोडासा तुकडा दिला. नंतर तो म्हातारा माणूस विचारू लागला. औरंगाबादला पाणी पाऊस कसा है साहेब मी सर्व परिस्थिती सांगितली तो म्हणाला साहेब तुमचं वतन कोणतं. मी म्हणालो सुल्लाळी. तो म्हणाला मायबाप हैतका साहेब मी म्हणालो नाहीत फक्त भाऊ बहिणी आहेत, तो म्हणाला भेटून या साहेब भावा बहिणीला तेनलाबी बर वाटेल. मध्येच म्हातारा म्हणाला आपून कोण जातीचे हाव साहेब. मी जरा लक्ष न दिल्यासारखं करून म्हटलं काय हो बाबा तर म्हातारा म्हणाला आपली जात कोणती साहेब. मी महाराचा आहे कारण बुद्ध फिद्ध म्हटलं की महारचना मग असं म्हणतात व खेडयातले लोक म्हणून मी बेधडक म्हटलो मी महाराचा आहे. म्हणून काही वेळेस लोकांचा कपडे बघून विश्वास बसत नाही पण हा म्हातारा पुन्हा बोलेचना गेला. मी विचारलो. आपण कोणत्या जातीचे तर तो म्हणाला आही दोघं बी वंजारी है त्याचे नाव इसेनाथ व माझे नाव महादराव है. वळख पाळख झाल्यावर त्याने साहेबही म्हणणं सोडून दिलं व बोलनाबी झाला. जणू काय दातकीळ बसली त्या बुढ्याची. मी मध्ये म्हाताऱ्याला म्हणालो, बोलाना बाबा आणखी काही सांगा नवं जुणं तर तो काही केल्या बोलेचना. मला एकदम त्या उंटाबरोबर चालणाऱ्या म्हाताऱ्याचे शब्द आठवले व मी म्हटले की डोंगर, रस्ते, झाडेझुडूप दऱ्या खोरे नद्या नाले, तसेच राहतोल. आम्ही पण तसेच राहू मी त्याला म्हटलं तुम्ही सारे असेच राहणार तुमच्यात बदल मात्र मुळीच होणार नाही कारण

बदल तुम्हाला नकोचना तितक्यात आली नळगीर व तिच्या अलीकडूनच त्या म्हाताऱ्याचा रस्ता फुटला.

हे सगळे कळल्यावर तो तरणा उंटवाला पोरगा पण बोलना झाला व एकदाच म्हटला त्या गुड्सूरच्या महाराच्या पोराची कशी काय ओळख. मी म्हटलो आम्ही औरंगाबादला एकाजागीच शिकायला व्हतो, त्या पोराने जे तोंडाला कुलुप घातलं ते थेट गाव आल्यावरच घरी आल्यावर उंटावरून उतरल्यावर पैसे मागण्यासाठी उघडले. मी म्हणालो आता जरा अंधार पडताहे तुम्ही व तुमचा उंट थकला असाल तर रात्रीच राहून सकाळी जा. तो म्हणाला मी जेवण वेळपर्यंत जातो म्हणून चालता झाला.

इकडं आमचं मात्र अंग बिलकूल मदड. म्हातारा उंट असल्यामुळे मुक्का मार दिल्यासारखा सुजून जाऊन दुखू लागला, कजावा रुतून तर ढुंगणाला अगदी बेंडच्या बेंड आले जणू ॲक्सीडंट झाल्यावर किवा हातपाय मोडल्यावर प्लॉस्टर करतात व नंतर काढून टाकतात तसेच ढोपराचे सालपट निघून पडले व मांडचा पण चारपाच दिवसाचा लट्ठेपणा संपल्यावर पुन्हा जैसे थे झाल्या.

O O

कथा आणि व्यथा

एकोणीशे बाहत्तर सालची गोष्ट. महाराष्ट्रात चारी बाजूंनी कोरडा दुष्काळ व खेड्यापाड्यात तर भलताच. मी दिवाळीस म्हणून गावाला गेलो. संग होती माझी बायको व मुलगी तर झालं काय तर तितल्या एका पाटलाच्या भावकीच्या पोरानं माझी वळक करून घेतली मांगाच्या एका पोराकरवी. थोडी फार बोलाचाल झाली व लगच तो म्हणाला सर आपण आमच्याकडं याल वर. मी मागचा पुढचा विचार करून म्हटलो नको.

असाच सोमार उजाडला. सकाळी नऊ साडेनऊच्या दरम्यान आला रमाकांत व मला म्हणाला की आमच्या वाड्यात चला. वाडा म्हंजे त्याचं घर. मी म्हणालो कशाला तर तो म्हणाला चला ना जरा बसू या. मी म्हणालो थोडं थांबा येतो म्हणून घराकडे वळलो. तरच तो म्हणाला की मिसेसना पण घेऊन चला. मी म्हणालो कशाला. तर तो म्हणाला की सगळेच चला आई वडील बोलावतात. मी होकार दिला व म्हणालो की, आर्ध्यातासानंतर जरा आंगोळ बिंगोळ करून येतोच.

आम्ही आंगोळी केल्या व सौ. कुमूद नको म्हणतासतानासुद्धा आम्ही सर्वजन तयार झालो. तितक्यात आला रमाकांत व पुढे चला आम्ही आलोच म्हटल्यावर तो गेला व आम्ही त्याच्या मागोमाग गेलो. मनात अनेक विचार डोकावत होते कारण मला माहित होते की, आमचे गाव आक्काच्या गावापक्षा लई शिवाशिव पाळतय म्हणून कारण तिथं सगळे वाणी लोकच होते.

रमाकांतानं बसायला सांगितले. सर्व बघू लागले खेड्यात जरा नवलच वाटत व्हते कारण मी व कुमूद व आमची मुलगी जरा लेवाशातच असल्याचे बगून. समोरच्या पत्रात एक खुर्ची व छोटासा लाकडी फळ्यांचा पलंग व्हता. आम्ही बसा म्हंटल्याबर बसलो. खुर्चीवर न बसता कशाला जागा आडवून ठेवावं म्हणून पलंगावरच दोघे तिघे बसलो. रमाकांत व त्याचा एक मित्र बसले

एका जवळच असलेल्या करकुंई करणाऱ्या बाकावर परंतु तो बाक लागन नव्हता. कारण उतीम लोक महाराच्या पंगतीला कसे बसतील.

रमाकांताचे मायबाप जरा महातारे. ते व त्याची बहीण आमच्याशी बोलले. मला थोडसं बरं वाटलं व्हतं यासाठीच की पूर्वी तर आमच्या गावात काहीच चालायचं नाही.

तितक्यातच रमाकांताने आणले कागदं जरासे पाटकोरे असलेले. मी म्हटलो कशाला तर तो म्हणाला जरा फराळ करा. मी म्हणालो आम्ही जेवून आलोत आणि खरोखरच ते लोक काहीतरी खा म्हणतील व थोडी वेगळी वागणूक देतील म्हणूनच आम्ही जेवून गेलतो. परंतु सगळ्यांचा मनदुःखवणारा का होईना पण आग्रह मोडवेना म्हणून झालो तयार.

प्रत्येकाला दिला एक एक बुंदीचा लाडू. आम्ही खाल्ला व रमाकांत व त्याच्या मित्राने पण खाल्ले व मध्येच आमच्या बबीला म्हणून दुसरा एक नको नको म्हणतानाही दिला बेबीने तो फोडून टाकला.

त्याच्या बहीणीने काढले ठेवणीचे प्लॅस्टीकचे लाल हिरवे गिलास व बतलाजवळ जावून जरा साबन लावून खंगाळले व लगेच त्यानीच पाणी पियाला दिले. आम्ही पाणी पिलो व एक मिनिट व्हताच त्यांनी त्याच गिलासा मध्ये चहा घ्या म्हंटले. मी म्हणालो आम्ही चहा घेत नाही. त्याचा वडील म्हणाला वर मग दूध घ्या. मग आतले दूध ईतके पातळ बिरीक ज्याच नाव ते. तेवढे पातळ तर शहरात पण नसेल. पाण्याचा दुष्काळ असतांनाही तेथे नदी असल्यामुळे दूधात पाणी व्हतं. त्याला फक्त पांढर पाणी म्हणता येईल. पण गोड असल्यामुळे आम्ही ते पिलो कारण त्याचा बाप साखरेचा चेअरमन है. म्हातारा चेअरमन मधेच संपादणी करू लागला व म्हणाला आमच्यात म्हशीचं दूध नाही. गाईचे दूध आहे. ते पातळच असतं.

असा झाला तो प्रकार पाणी पिणे व पांढरं पाणी पिण्याचा त्या रमाकांताच्या घरी वाडयात. मग निघालो तर त्याच्या चुलत्याच्या ईत बोलावले. आम्ही म्हणालो आता कशाला म्हातारे माणसं बोलावतात म्हणून गेलो व कुमूद बसली एका डगमगणाऱ्या मोडक्या खुर्चीवर जी की जरा वटचाच्याजवळ व्हती व मी बसलो स्टूलवर जो की, बैठकीच्या जवळ व्हता. ते लोक खाली बसून जरा अंतरावरच बोलले. चहा करणार व्हते पण म्हंटलो आता नको. त्यांनी मग दोन नागीलीचे पान करून दिले.

मध्येच आमची बेबी पापा (पाणी) म्हणून लागली व घरात चाललो सर ते लोक म्हणाले का, ती चांगली चालते. ती पडत नाही. एवढे बोलून मी त्यांच म्हणनं ताडल व तिला आवारलो.

तितक्यांत रमाकांताने त्याच्या घरचा रंगीत गिलास आणला व पाणी दिला. बेबीने पाणी पिले. तिला बिचारीला काय कळणार कारण आम्हाला. कळूनही नाही होय म्हणण्या पलीकड त्या आग्रहामुळे काहोच करू शकत नव्हतो.

आम्ही निघालो. सर्वांनी निरोप दिला व येत जारे वळकी पाळकी रहातात बाबा असे सर्व म्हणाले. मला जरा म्हतारे बाबा म्हणण्यापुरते का व्हईना सुधारल्यासारखे वाटले पण कसचे आंदरून तसेच कारण आम्ही एवढं शिकून सवरून गावी कितेक दिवसांनी गेलतो व त्यांनी बोलावले म्हणून त्यांच्या घरी गेलो तर तेथे तशी वागणूक दिली.

त्या दिवशीच आम्ही मरसंगीला गेलो एका मुसलमान पाटलाला भेटायला जो की, आमच्या बापाचा मटा जिगरी दोस्त कारण माझा बाप म्हंजे त्यावेळचा तिकडल्या टापूत मटा महामूर जांता. बाप मेल्यावरबी तो बिचारा माझ्या ईरनाक दोस्ताचे परदेशी पोरं म्हणून माझ्या भावांना व मलाही आतोनात जीव लावतोय व त्याची बायकोही बिचारी लईच मयाळू.

दिवळोच्या निमतानं माझा परतपाळ केलेली चेऱ्याची अक्का पण सुल्लाळीस आलती. तिला बिचारीला सनाला बोळाई म्हणून जाऊन कोणीही आतापर्यंत आणलं नव्हतं, पण तशीच मी औरंगाबाहून आलाव म्हणून बर्दी लागल्यानं आलती मला फावं म्हणून. आम्ही सारेच बहीण भाऊ मुसलमान पाटलाच्या घरी जावून ठेपलो. आम्हाला फावून त्या मुसलमान पाटलाला व त्याच्या बायकोला लई आनंद झाला व त्याची लहान पोरं विचारू लागली आपल्या खेडवळ मुसलमानीत. ये कोन है माँ वो कोन है गे माँ । त्या बाईने माझ्या बायकोची व मुलीची वळक करून दिली. खरं म्हंजे आम्हाला समोरच्या वसरीतच बसवले तरी आम्हाला ठीक वाटलं कारण मुसलमान लोक व त्यांची बसायची वसरी म्हंजे सगळ वागतं घरच.

आम्ही ईकड बात्याफित्या मारतच होतो तर त्या पाटलाच्या बायकोने चुलीवर बोटव्या व भात ठिवून ही दिला. तो डेचकी मध्ये रटरट करत व्हता तर आम्ही एका मागून एक गोष्टी पटपट बोलत होतो. आम्ही कल्पनाही केली नाही की, हे लोक येवढ्या कमी वेळात आमची सोय करतील व खावूपिवू

घालतील म्हणून पण लगेच त्या पाटलाची बायको म्हणाली की, उठारे हात धुवा व दोन दोन घास खा. आम्ही म्हणालो कशाला केलो हे सर्व माय तर ती बाई म्हणाली कशाला म्हंजे परलाद आणि त्याची बायको व मुलगी काय हमेशा येतात का आमच्या घरी-खानार दोन दोन घास जे असेल ते कारण गडबडीत तेवढं चांगल तर कांही करता येत नाही. ती पाटलीन (त्या गांवच्या पाटलाच्या भावकीचे म्हणून) कदी कदी मराठी तर कदी कदी मुसलमानीत बोलायची व म्हणायची परलादकू अबी हमारी बात आती हुंगी आणि मध्येच म्हणायची परलादने आच्छी छोरी (बायको) पकडलाया.

हे सर्व बोलणं झाल्यावर आम्ही हात धुतलो व जेवायला बसलो तर मोठमोठ्या जर्मलच्या पराती भात व बोटव्यानी भरून आमच्या समोर ठेवल्या. मुसलमान लोक एक तर जर्मन किंवा मातीच्या झाकण्यात लई करून खातात आम्ही अगोदरच धरून जेवून गेलतो व वापसा पण नव्हती पण तो त्यांचा आग्रह मोडवेना. आम्ही मजेशीर बाता मारत खालो. मी व माझी बायको जरा आगोदरच उठायला बघू लागलो कारण आता शिकल्या सवरल्यामुळे व शहरात राहून भूक मरून गेल्यामुळे तेवढं खेड्यांतील लोकासारखं ढकत नाही कारण मला तसा भरपूर अनुभव हैं उपास पोटी रहाण्याचा कारण गरीबीमुळे व बहीणीच्याईत बऱ्याच वेळा आर्धीचतकोर भाकरीवर दिवस कंठावा लागे व नंतर बोर्डींगातही दोनच वेळा तेही मिळेल तेवढे खावे लागे म्हणून आंतडे जास्त पचवू शकत नाहीत. आम्ही नाही होय म्हणता नाही त्यांनी बळजबरीने खायाला लावलेच. आमची बेबी मात्र खातसांडत सगळ्याना साथ देत राहीली.

जेवून सर्वजन उठलो. पराती पण त्या पाटलीनीनेच काढल्या. आम्हाला उचलू दिल्या नाहीत. जेवण आटोपल्यावर पाटलाने व त्यांच्या बायकोने मला येवढं सांगितल की, बेटा हमारा और तुमारे बापका बहोतही दोस्ताना था और हमारा बहोतही खाना पिना चलता था। तुमकू मालूम नही अब मेरा ईरनाक दोस्त होता तो परलाद का शिक्षान देखते कितना खुषी मनाता लेकीन क्या करना ये तो सब खुदाकी ओर हैं। असे बोलून तो एकदम मराठीत बोलायलां लागला.

आम्हाला खूप भारावून आल्यासारखं झालं कारण एक तर आपले वडील असते तर त्यांना किती आनंद झाला असता हे सर्व पाहून व दुसर तर वडलांच्या बाद सुद्धा हे मुसलमान लोक आम्हाला येवढा जीव लावतात हे

बघून व ते ही कुठलीच वाटाघाट न धरता. मग मला वाटते की, एकीकडे आम्ही ज्या गांवात जन्मलो तिथे कशी वाईट वागणूक दिली जाते. व दुसऱ्या गांवात कशी चांगली वागणूक दिली जाते. हे बघून कोणासही वाटेल की आमच्या गावचे वाणी व मरसंगीचे मुसलमान पाटील यात किती तफावत आहे म्हणून.

○ ○



REFBK-0022711